# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १५/२०१२** **दिनांक १५.०९.२०१२**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शनिवार दि.१५.०९.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-२६६८-२०१२, दिनांक १४ सप्टेंबर, २०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दि.१५.०९.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, सदस्य
०३. श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २९.०७.२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.७२२** **दिनांक २९.०७.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

---

**विषय नं.०२** **दिनांक २५.०८.२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.७२३** **दिनांक २५.०८.२०१२ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.**

**०१) निर्णय क्र.६८६ -**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.धनाजी जगन्नाथ बेडके, ऑडिओलॉजीस्ट, श्री साईनाथ रुग्णालय एम.ए.एस.एल.पी. या उच्च शिक्षणासाठी दि. ०१/०८/२०१२ ते दि. ३१/०७/२०१४ या दोन वर्षाचे कालावधीसाठी रजा मंजुर करण्यात यावी मात्र या कालावधीत दर आठवडयाला (रविवारी) श्री साईनाथ रुग्णालयात व्हीजीट देणेकरीता व्हीजीट फी मिळणेबाबतची विनंती अमान्य करणेत आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचन्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.धनाजी जगन्नाथ बेडके, ऑडिओलॉजीस्ट, श्री साईनाथ रुग्णालय एम.ए.एस.एल.पी. या उच्च शिक्षणासाठी दि. ०१/०८/२०१२ ते दि. ३१/०७/२०१४ या दोन वर्षाचे कालावधीसाठी रजा तसेच या कालावधीत दर आठवडयाला (रविवारी) श्री साईनाथ रुग्णालयात व्हीजीट देणेकरीता व्हीजीट फी मिळणेबाबतची विनंती अमान्य करणेत आली. तसेच कामाची पर्यायी व्यवस्था म्हणून अन्य व्हिजीटींग ऑडिओलॉजीस्टची नेमणूक करणेत यावी व संस्थान नियमाप्रमाणे त्यांना मोबदला देण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय न.०३** **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो विभागासाठी EEG (Electro Encephelogram) Machine with Video खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात डॉ. सुहास पाटील यांची इकडील पत्र क्रमांक २८५७ दि.१३/०९/२०११ अन्वये मानद न्युरो फिजीशियन म्हणून नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यानुसार सध्या ते दर शुक्रवारी श्री साईबाबा रुग्णालयात येऊन बाहयरुग्ण विभागात रुग्णांची तपासणी व उपचार करत असतात. रुग्णाची तपासणी केल्यानंतर त्या रुग्णाच्या मेंदुतील दोष शोधणेसाठी EEG (Electro Encephelogram) तपासणी करावी लागते. सदर तज्ञ डॉक्टर आपणाकडे नसल्यामुळे सदर मशिन आपणाकडे उपलब्ध नाही, त्यामुळे डॉ. सुहास पाटील यांनी दि.१०/०१/२०१२ रोजीचे पत्रान्वये एक नग EEG (Electro Encephelogram) Machine with Video (३२ Channel) ची मागणी केलेली आहे.

दि.१९/०२/२०१२ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. २०९ अन्वये उपरोक्त १ नग मशिन विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,८६,७१९/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ३०७ दि. २०/०४/२०१२ अन्वये एकुण १० अधिकृत विक्रेते / पुरवठा धारक यांचेकडून दि.३०/०४/२०१२ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. परंतु एकही कोटेशन प्राप्त न झाल्यामुळे इकडील पत्र क्र. १०४७ दि.२८/०५/२०१२ अन्वये पुन्हा सर्व अधिकृत विक्रेते / कोटेशनधारक यांना स्मरणपत्र पाठवून कोटेशन देणेकामी तगादा करण्यात आला. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत-

०१) M/s. Recorders & Medicare Systems (P) Ltd., Panchkula (Haryana) (रुग्णालय आवक विभागाकडून टपालामार्फत उघडून दि.३०/०६/२०१२ रोजी प्राप्त)

०२) M/s. Bio-Devices, Chandigarh (बंद कोटेशन प्राप्त दि. ११/०७/२०१२)

०३) कोटेशनधारकाचे नाव नसलेले कोटेशन (बंद कोटेशन प्राप्त दि. ११/०७/२०१२)

उपरोक्तपैकी अ.नं. २ व ३ या कोटेशनधारकांना कोटेशन मागणीपत्र नसताना त्यांनी स्वत:हून कोटेशन पाठविलेले आहे, तेंव्हा तुलनात्मक दर मिळणेच्या दृष्टीने ते विचारात घ्यावे तसेच अ.नं. १ M/s. Recorders & Medicare Systems (P) Ltd., Panchkula (Haryana) यांचे रुग्णालय आवक विभागाकडून टपालामार्फत उघडून मिळालेले कोटेशन देखील विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

तरी वरीलप्रमाणे अ.नं.२ व ३ यांचे प्राप्त बंद कोटेशन समक्ष उघडून प्राप्त तीनही कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे समक्ष बोलवून चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेस मान्यता असावी.

वरीलप्रमाणे २ बंद कोटेशन आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन त्याच वेळेस तीनही कोटेशनधारकांना चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते, परंतु सदरहू सभेकरीता एकही कोटेशनधारक उपस्थित नव्हते, त्यांनी दिलेल्या कोटेशनमधील दरांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Items | Qty | M/s. Recorders & Medicare Systems (P) Ltd., Panchkula (Haryana) | | | M/s. Bio-Devices, Chandigarh | | | Not named enevelop | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1 | EEG (Electro Encephelogram) Machine | 1 | Traveller 32 CH EEG Video PC Based | 294700.00 | | Bio-EEG - 32 | 289450.00 | | Opened today, it is same quotation of Bio-Devices, Chandigarh | | |
| | Total Amt. in Rs.- | | | 294700.00 | | | 289450.00 | | | | |
| | Warranty - | | 1 Year | | | 1 Year | | | | | |
| | Payment - | | 50% Advance & 50% after installation | | | 75% Advance & 25% on Delivery | | | | | |
| | Delivery - | | - | | | 10 to 12 weeks | | | | | |
| | AMC - | | Not Given | | | Not Given | | | | | |
| | CMC - | | Not Given | | | Not Given | | | | | |

**निर्णय क्र.७२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी वरील कोटेशनधारकांसह अजुन काही नामांकित कंपन्याकडून सविस्तर Technical Specification देऊन फेर कोटेशन मागविण्यात यावेत, असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय न.०४ श्री साईबाबा रुग्णालयातील विविध ऑपरेशन थिएटरकरीता वॉशिंग मशिन खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ओ. टी. विभागाने दि.१८/०१/२०१२, आर्थोपेडीक ओ.टी. विभागाने दि.१३/०१/२०१२ आणि कॅथलॅब विभागाने दि.०२/०१/२०१२ चे मागणी पत्रान्वये प्रत्येकी एक नग Fully Automatic Washing Machine (Heavy Duty) ची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे सध्या उपलब्ध असलेले मशिन हे व्यवस्थित काम देत नाही.

सदरचे मशिन हे तीनही ओ.टी. मध्ये दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. जास्तीत जास्त ११ किलो क्षमतेचे मशिनसाठी अंदाजे प्रती नग रु.३०,०००/- पर्यंत खर्च येणार आहे, त्याप्रमाणे तीन नग वॉशिंग मशिन खरेदीकामी अंदाजे एकुण रक्कम रु. ९०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.०६/०४/२०१२ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.२९५ नुसार वरीलप्रमाणे ३ नग वॉशिंग मशिन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार इकडील पत्र क्र.२१०६ दि.२३/०७/२०१२ अन्वये एकुण १२ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारकांकडून दि.०१/०८/२०१२ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनूसरुन सात कोटेशन प्राप्त झालेले आहेत, ते खालीलप्रमाणे-

१. M/s. R.T. Karachiwala, Ahmednagar. (प्रशासन शाखेकडून उघडून आलेले कोटेशन प्राप्त दि.३०/०७/२०१२)
२. M/s. Akshy Electriclas Shrirampur. (कोटेशन प्राप्त दि.०८/०८/२०१२)
३. M/s. Jeevan Radio House, Shrirampur. (कोटेशन प्राप्त दि.०८/०८/२०१२)
४. M/s. Jyoti Light House, Shrirampur. (कोटेशन प्राप्त दि.०८/०८/२०१२)
५. M/s. Kashiko Marketing, Kopargaon.(कोटेशन प्राप्त दि.०९/०८/२०१२)
६. M/s. Kothari Electronics, Kopargaon (कोटेशन प्राप्त दि.०९/०८/२०१२)
७. M/s. Prakash Agencies,, Kopargaon.(कोटेशन प्राप्त दि.०९/०८/२०१२)

उपरोक्त M/s. R.T. Karachiwala, Ahmednagar यांचे सिलबंद कोटेशन मुदतीत प्राप्त झालेले असून उर्वरीत सहा कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झालेले आहेत तर अ.नं. २ यांना कोटेशन मागणी पत्र दिलेले नसतांनी त्यांनी स्वत:हून कोटेशन दिलेले आहेत. तुलनात्मक दर मिळविण्याच्या दृष्टीने त्यांचा फायदा होऊ शकेल त्यामुळे सहाही कोटेशन विचारात घ्यावे असे मत आहे.

तरी वरीलप्रमाणे प्राप्त ०६ सिलबंद कोटेशन आजचे सभेपुढे समक्ष उघडून त्याच दिवशी सातही कोटशन धारकांशी चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेस विनंती.

वरीलप्रमाणे ६ सिलबंद कोटेशन आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात येऊन त्याच वेळेस सातही कोटेशनधारकांना चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. परंतु सदरील सभेकरिता एकही कोटेशनधारक उपस्थित नव्हते. त्यांनी दिलेल्या कोटेशनमधील दरांचा तपशील खालील प्रमाणे

| Sr. No. | Description | Make | Qty. | Make | Model | Warranty | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Fully Automatic Washing Machine 11Kg. Top Loading | LG | 3 | | | | | | |
| | M/s. R.T. Karachiwala, Ahmednagar | | | L.G 16 kg | T - 1103 Ade 5 | | 54990 | | |
| | | | | | | | T.C Extra Rs. 1000.00 | | |
| | M/s. Akshay Electricals Shrirampur. | | | Samsung | | | 28750 | | |
| | | | | 11 Kg | | | | | |
| | M/s. Jeevan Radio House, Shrirampur | | | Samsung | WA BWPM EN | | 28000 | | |
| | | | | 11 Kg | | | | | |
| | M/s. Jyoti Light House, Shrirampur | | | Samsung | 13 w PMEN | | 28500 | | |
| | | | | 11 Kg | | | | | |
| | M/s. Kashiko Marketing, Kopargaon | | | L.G | | | 54990 | | |
| | | | | 16 kg | | | | | |
| | M/s. Kothari Electronics, Kopargaon | | | L.G | T 110 3 ADE 5 | | 49500 | | |
| | | | | 16 Kg | | | | | |
| | M/s. Prakash Agencies, Kopargaon | | | L.G | T 110 3 ADE 5 | | 45800 | | |
| | | | | 16 kg | | | | | |
| | Total Amt. in Rs. | | | | | | | | |

**निर्णय क्र.७२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील कोटेशनधारकांनी दिलेल्या तांत्रीक बाबी मागणीप्रमाणे नसल्यामुळे व विशिष्ट कंपनीचा उल्लेख न करता जनरल Specification तयार करुन सर्व कंपन्यांकडुन / अधिकृत विक्रेत्यांकडुन ११ kg ऐवजी १६ kg करिता दर मागविण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. ०५** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये राजीव गांधी आरोग्य योजनेकामी इंटरनेट सुविधेकामी BSNL व कंपनीचे प्रतिनिधी समवेत वाटाघाटी करुन त्यांनी कळविलेले दर निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रूग्णालयामध्ये शासनाची राजीव गांधी आरोग्य योजनेकरीता मान्यता मिळाली आहे. सदर योजना ही पुर्णतः ऑन लाईन असल्यामुळे सदर योजनेकामी १० MBPS इंटरनेट लीज लाईन घेणेकामी दि.२५.०८.२०१२ चे सभेतील निर्णयानुसार BSNL व Reliance या कंपनीचे प्रतिनिधीना त्यांनी १० MBPS इंटरनेट लीज लाईन करीता त्यांनी कळविलेले दर वाटाघाटी करून निश्चित करणेकामी बोलविणेस व सदर कामी लागणारे हार्डवेअर हे बाहेरील पुरवठा धारंकाकडुन विहित पध्दतीने खरेदी करणेस संबधित हार्डवेअरचा मसुदा संस्थानचे वेब साईटवर प्रसिध्द करणेकामी दि.०५.०९.२०१२ चे मंजुर टिपणीनुसार मान्यता मिळाली आहे.

तरी याबाबत दि.०५.०९.२०१२ चे मंजुर टिपणीनुसार सदरकामी BSNL व Reliance या कंपनीचे प्रतिनिधींना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालील प्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेतील दर रु. | चर्चा / वाटाघाटी करुन देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| 1 | **BSNL**<br>(1:1 NON ISP) 16 IP Address. | 8,82,400/- + Tax | 8,25,000/- |
| 2 | Reliance<br>Dedicated Broad-Band Line 8 IP Address. Media-RF | 9,00,000/- + Tax | 8,67,850/- |

**निर्णय क्र.७२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये राजीव गांधी आरोग्य योजनेकामी इंटरनेट सुविधेकामी BSNL यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०६** **क्ष-किरण निर्मीती करणाऱ्या मशिन्सचे Quality Assurance Test करणेकामी प्राप्त कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध विभागांमध्ये क्ष-किरण निर्मीती करणारे मशीन्सचे Quality Assurance Test करणेकामी मा. व्य. समिती सभेच्या दि. १२/०६/२०१२ चे सभेतील विषय क्र. १५ व निर्णय क्र. ४१७ अन्वये सविस्तर चर्चा होउन, क्ष-किरण निर्मीती करणारे मशीन्सचे Quality Assurance Test विविध कंपन्याकडुन कोटेशन मागणी करून विहीत पध्दतीने QA Test करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे किंमत रु.१,४८,१८५/-चे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार खालील विविध QA Test करणाऱ्या खालील कंपन्यांकडुन पत्र पाठवुन कोटेशनची मागणी करण्यात आली होती.

१) मे. एमआयएस हेल्थकेअर प्रा. लि. पुणे
२) मे. रेडीओलॉजिकल प्रेसिजन लॅब्स इं. प्रा. लि. ठाणे
३) मे. ओमेगा सर्व्हीसेस, मुंबई
४) मे. टीबीएस इंडिया टेलमॅटीक ॲन्ड बायोमेडीकल सर्व्हीसेस प्रा. लि. बैंगलोर

वरील पैकी खालील प्रमाणे बंद कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

१) मे. एमआयएस हेल्थकेअर प्रा. लि. पुणे
२) मे. रेडीओलॉजिकल प्रेसिजन लॅब्स इं. प्रा. लि. ठाणे
३) मे. ओमेगा सर्व्हीसेस, मुंबई
४) मे. टीबीएस इंडिया टेलमॅटीक ॲन्ड बायोमेडीकल सर्व्हीसेस प्रा. लि. बैंगलोर

तरी क्ष-किरण निर्मीती करणारे मशीन्सचे Quality Assurance Test करणेकामी प्राप्त कोटेशन उघडुन सदर पुरवठाधारकांसोबत चर्चा / वाटाघाटी करून निर्णय घेणेबाबत प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समिती सभेपुढे मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

सदर चर्चेसाठी प्राप्त कोटेशनधारकांपैकी मे. एमआयएस हेल्थकेअर प्रा. लि. पुणे व मे. रेडीओलॉजिकल प्रेसिजन लॅब्स इं. प्रा. लि. ठाणे या दोन कंपन्यांचे प्रतिनीधी वाटाघाटीकरीता उपस्थित होते. मे. ओमेगा सर्व्हीसेस, मुंबई व मे. टीबीएस इंडिया टेलमॅटीक ॲन्ड बायोमेडीकल सर्व्हीसेस प्रा. लि. बैंगलोर या दोन कंपन्यांनी ई-मेल द्वारे त्यांचे निम्नतम दर कळविले होते. त्याची नोंद घेण्यात आली. त्यानुसार निविदेतील दर व चर्चा वाटाघाटी नंतरचे दर यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | निवीदा धारकाचे नाव | निविदेतील दर रु. | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | **मे. एमआयएस हेल्थकेअर प्रा. लि. पुणे** | **५७,८००/-** | **४०,०००/-**<br>(Discount Rs. 17,800/-) |
| ०२ | **मे. रेडीओलॉजिकल प्रेसिजन लॅब्स इं. प्रा. लि. ठाणे** | **७०,५००/-** | **५६,४००/-**<br>(-Discount 20 %) |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | **मे. ओमेगा सर्व्हीसेस, मुंबई** | **१,०४,०००/-** | **९३,६००/-<br>(-Discount १० %)<br>(ई-मेल द्वारे)** |
| ०४ | **मे. टीबीएस इंडिया टेलेमॅटीक ॲन्ड बायोमेडीकल सर्व्हीसेस प्रा. लि. बैंगलोर** | **१,२०,००८/-** | **-५०००= १,१५,००८/-<br>(ई-मेल द्वारे)** |

**निर्णय क्र.७२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. एमआयएस हेल्थकेअर प्रा. लि. पुणे यांचेकडुन क्ष-किरण निर्मीती करणाऱ्या एकुण १२ नग मशीन्सचे Quality Assurance Test करणेस व त्यासाठी येणाऱ्या रू.४०,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.**

(कार्यवाही वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.०७ शैक्षणिक संकुलातील टॉयलेट व बाथरुमची दुरुस्ती करणेकामी प्राप्त झालेल्या निविदांवर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे शैक्षणिक संकुलाकडील औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल इमारतीचे टॉयलेट ब्लॉकचे नुतनिकरण करणेकामी येणारे अंदाजे रु. १९,४७,३६२/- मात्र अपेक्षित खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेत निर्णय क्र. ८१० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरहू कामी प्रचलित दरसूचीनुसार (DSR २०११-१२) सुधारीत रु. १९,७६,७९३/- मात्र खर्चाचे कोरे निविदा फॉर्म विभागामार्फत तयार करणेत येऊन, विहीत पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या. दिनांक ०४/०५/२०१२ अखेर विहीत मुदतीत मे. पी. बी. जाधव, संगमनेर व मे. अे. डी. मुथ्था, अहमदनगर या दोन ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेवून सादर केले होते.

सदरचे निविदांवर मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. १४.०७.२०१२ रोजीचे सभेत निर्णय क्र. ४९० अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, शैक्षणिक संकुलातील टॉयलेट व बाथरुमची दुरुस्ती करणेकामी फक्त दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्याने, सदर निविदा रद्द करुन त्या संबंधित ठेकेदार यांना परत करण्यात याव्यात. आठ दिवसाच्या मुदतीत संक्षिप्त जाहिरात (फेर निविदा मागणी) प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले."

याकामी दि.२८.०७.२०१२ रोजी दैनिक लोकमत व सकाळ, अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन दि. ३०.०७.२०१२ ते दि. ०६.०८.२०१२ अखेर कोरे निविदा विक्रीची व दि. ०९.०८.२०१२ रोजी सिलबंद निविदा सादर करण्याची मुदत देऊन निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदरचे मुदतीत खालील तिन ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

१. श्री. रमेश गुलाबराव जाधव, अहमदनगर
२. पी. बी. जाधव, संगमनेर
३. श्री. एस. जी. गायकवाड, राहाता

तसेच यापुर्वी निविदा सादर केलेले मे. अे. डी. मुथ्था, अहमदनगर यांनी, त्यांनी यापुर्वी सादर केलेली निविदा दि. ३०/०९/२०१२ अखेर उघडणेस हरकत नाही असे कळविले आहे.

उपरोक्त निविदासादरकर्त्यांपैकी अ. क्र. ०२ व ०३ यांनी सादर केलेल्या दोन सिलबंद निविदा तसेच यापुर्वीचे निविदासादरकर्ते मे. अे. डी. मुथ्था, अहमदनगर यांनी सादर केलेली निविदा आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | निविदेतील दर | चर्चा / वाटाघाटी करुन देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| १ | श्री. अे.डी.मुथ्था, अहमदनगर | - | अपात्र |
| २ | पी. बी. जाधव, संगमनेर | 25 % Above | 10 % Above |
| ३ | श्री. एस. जी. गायकवाड, राहाता | - | अपात्र |

**निर्णय क्र.७२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, पी.बी.जाधव, संगमनेर यांनी देऊ केलेले दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही बांधकाम विभाग)

---

**विषय नं.०८ साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ चे R-Block इमारतीतील उपहार गृहासाठी तज्ञ सल्लागार नियुक्तीकामी प्राप्त झालेले दरपत्रक उघडणे व चर्चा/ वाटाघाटीद्वारे निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई आश्रम भाग - ०१ व ०२ चे R-Block इमारतीतील उपहार गृहासाठी किचन ईक्वीपमेंट्स, स्टे.स्टील फर्निचर, गॅस सिलेंडर मेनफोल्ड यंत्रणा खरेदी व उभारणी तसेच नामवंत ग्रुपला उपहारगृह चालविणेस देणेकामी विषय तज्ञांचे मार्गदर्शन मिळणेकामी दि.२८/०४/२०१२ चे त्रिसदस्सीय समिती सभेपुढे सदर विषय मान्यतेसाठी ठेवण्यात आलेला होता. मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार

प्रस्तुत कामाकरीता सल्लागार नियुक्तीचे प्रक्रियेत पारदर्शकता येणेकामी पुणे, मुंबई येथील नामांकित वृत्तपत्रात सल्लागार नियुक्तीबाबतची जाहीरात देवून सिलबंद पाकीटात अनुभव व अपेक्षित मानधनासह प्रस्ताव मागविण्यात यावेत असे ठरलेले आहेत.

त्यानुसार दिनांक २८.७.२०१२ रोजीच मंजूर टिपणीने दिनांक ११.८.२०१२ रोजी पुणे, मुंबई, औरंगाबाद येथील महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्रात जाहीरात देण्यात आलेली होती. तसेच टेंडर वेबसाईटवर डाऊन लोड करण्यात आलेले होते. वृत्तपत्रातील व वेबसाईटवरील जाहीरतीनुसार टेंडर जमा करणेची मुदत दिनांक १७.८.२०१२ देण्यात आलेली आहे. त्यानुसार खालील ५ एजन्सींनी विहीत मुदतीत सिलबंद दरपत्रक सादर केलेले आहेत.

१) HCTS International, Mumbai- ४०० ०२५.
२) Sandeep Govalkar Design Associates, Mumbai- ४०० ०५८
३) Shri Kiran S. Manjrekar, Mumbai-
४) Mrs. Shirley Santosh Jori, Pune- ४११ ०६०.
५) M/S Kitchen Krafts, Mumbai- ४०० ०९३

तरी सदरचे दरपत्रके आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन दरपत्रकसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | दरपत्रकाधारकांचे नांव | दरपत्रकातील दर रु. | चर्चा / वाटाघाटी करुन देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| १ | HCTS International, Mumbai | मोफत सेवा | अनुपस्थित |
| २ | Sandeep Govalkar Design Associates, Mumbai | - | 3.33% + Service Tax |
| ३ | Shri Kiran S. Manjrekar, Mumbai | | |
| ४ | Mrs. Shirley Santosh Jori, Pune | - | मोफत सेवा |
| ५ | M/S Kitchen Krafts, Mumbai | 7,50,000/- | अनुपस्थित |

**निर्णय क्र.७२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, यासंबंधात सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो पुढील त्रिदस्यीय समिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.०९ चपाती किचनमध्ये एल.पी.गॅस नविन पाईप लाईन बनविणे व सिलेंडर मेनीफोल्डमध्ये पाण्याचे स्प्रींकलर बसविणेकामी प्राप्त दरपत्रके उघडून चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** चपाती मशिनची वाढती संख्या व मॅन्युअली चपाती / पुरी बनविण्याच्या भट्टया यांच्या साठी सध्या असलेले गॅस कनेक्शन कमी पडत आहे. मा. व्यवस्थापन समिती दिनांक १२.६.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४२२ नुसार चपाती किचन मध्ये भट्टया वाढविणे आवश्यक असल्याने पश्चिम बाजुस असलेल्या रिकाम्या जागेत पाच गॅसचे नविन कनेक्शन करणेस व त्याकामी अंदाजे रक्कम रु. १,००,०००/- पर्यंतच्या खर्चास व सिलेंडर मेन फोल्ड मध्ये पाण्याचे स्प्रिंकलर बसविणे व त्याकामी अंदाजे रक्कम रु. १,५०,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

जा. नं. एसएसएस/वशि/प्रसाद/१९८५/२०१२ दि. ३.८.२०१२ रोजीचे पत्राने खालील पुरवठादार यांचे कडून दरपत्रक पाठविण्याबाबत पत्र देण्यात आलेले होते.

१) ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्रीज प्रा. लि. मुंबई
२) राका गॅस सर्व्हिस, चिंचवड, पुणे.
३) यशराज टेक्नोक्रिएट, नाशिक
४) सेन्ट्रोईड डानॅमिक्स, मुंबई
५) लाईफ लाईन फायर सर्व्हिसेस, कोपरगाव.
६) श्री साई सहाय सेल्स कॉर्पोरेशन, ग्वाल्हेर.

त्यानुसार उपरोक्त ६ एजन्सीपैकी खालील ३ एजन्सींनी विहीत मुदतीत सिलबंद दरपत्रक सादर केलेले आहेत.

१) ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्रीज प्रा. लि. मुंबई.
२) यशराज टेक्नोक्रिएट, नाशिक
३) सेन्ट्रोईड डानॅमिक्स, मुंबई

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, मे. यशराज टेक्नोक्रिएट, नाशिक यांचे प्रतिनिधी चर्चे करीता उपस्थित होते. त्यांनी दरपत्रक मध्ये दिलेल्या दरामध्ये ५% डिस्काऊंट दिलेला आहे. तसेच मे. ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्री प्रा .लि. मुंबई व सेन्ट्रोईड डायनॅमिक्स, मुंबई यांचेशी डिस्काऊंट दराबाबत मा. उपकार्यकारी अधिकारी यांनी दुरध्वनीद्वारे संपर्कसाठी प्रयत्न केला असता सेन्ट्रोईड डायनॅमिक्स, मुंबई यांचा दुरध्वनीवर संपर्क होऊ शकला नाही. मात्र ग्लोब गॅस इक्युपमेंट

इंडस्ट्री प्रा. लि. मुंबई यांचेशी दुरध्वनीद्वारे चर्चा केली असता त्यांनी चपाती किचन वाढीव गॅस पाईप लाईन करीता रक्कम रु. १६,५२०/- डिस्काउंट देण्याचे मान्य केलेले आहे. त्याबाबत त्यांनी फॅक्स पत्र संस्थानला पाठविलेले आहे.

त्यानुसार चर्चा / वाटाघाटी नंतर दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे .

**अ) चपाती किचनमध्ये एल. पी. गॅस नविन पाईपलाईन बसविणेकामी प्राप्त दरपत्रकचा तुलनात्मक तक्ता.**

| अ.नं. | दरपत्रक धारकाचे नाव | दरपत्रकातील दर रु. | चर्चा / वाटाघाटी करुन देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| १ | ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्रीज प्रा. लि. मुंबई. | ६६,५२०/- | ५०,०००/- दुरध्वनीद्वारे |
| २ | यशराज टेक्नोक्रिएट, नाशिक | ५४,८४०/- | ५२,०९८/- |
| ३ | सेन्ट्रोईड डार्नमिक्स, मुंबई | ९१,०६५/- | अनुपस्थित |

**ब) सिलेंडर मेनीफोल्डमध्ये पाण्याचे स्प्रिंकलर बसविणेकामी प्राप्त दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता.**

| अ.नं. | दरपत्रक धारकाचे नाव | दरपत्रकातील दर रु. | चर्चा / वाटाघाटी करुन देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| १ | ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्रीज प्रा. लि. मुंबई. | १,११,४४०/- | अनुपस्थित |
| २ | यशराज टेक्नोक्रिएट, नाशिक | १,४०,६६५/- | १,३३,६३१.७५ |
| ३ | सेन्ट्रोईड डार्नमिक्स, मुंबई | १,४८,७७०/- | अनुपस्थित |

**निर्णय क्र.७३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, चपाती किचन वाढीव एल. पी. गॅस पाईपलाईनचे काम तसेच सिलेंडर मेनीफोल्ड वॉटर पाईप लाईन वॉटर स्प्रिंकलर बसविण्याचे काम मे. ग्लोब गॅस इक्युपमेंट इंडस्ट्रीज प्रा. लि. मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, श्रीसाई प्रसादायल)

---

**विषय नं.१०** **थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेकरीता थर्मिया बी ऑईल खरेदीकामी प्राप्त दरपत्रक उघडणे व निम्नतम दराने पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालयात मोतीचुर लाडु प्रसादाची बुंदी तळणेसाठी दि. २३.८.२००९ पासुन थरमॅक्स कंपनीचा प्रती तास २ लाख किलो कॅलरी क्षमतेचा थर्मिक फ्ल्युड हिटर वापरणेत येत आहे. सदर यंत्रणा बुंदी तळणेसाठी अतिशय फायदेशीर ठरलेली असून साईभक्तांच्या गर्दीनुसार यंत्रणा अविरत चालु असते.

थरमॅक्स कंपनीने उत्पादीत केलेल्या थर्मिक फ्ल्युड हिटर करीता कंपनीने शिफारस केलेप्रमाणे फक्त सेल थर्मिया- बी ऑईल वापरावे लागते. दोन-तीन महिण्यानंतर ऑईलचे पॅरामीटर(फ्लॅशपॉईंट, व्हिसकॉसिटी, ॲसिडीटी, फायर पॉईंट इनसोल्युबल्स घटक इ.) चेक करुन यंत्रणेची ऑईल लेव्हल करावी लागते.सध्याच्या साठयातील ऑईलची लेव्हल कमी झालेली असून यंत्रणा कार्यान्वित ठेवणेसाठी नविन थर्मिया बी ऑईल खरेदी करणे आवश्यक असल्याने मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १४.०७.२०१२ रोजीचे सभेत थर्मिक फ्ल्यूड हिटींग यंत्रणेकरता थर्मिया बी ऑईल खरेदी करणेस व रक्कम रु. ४०,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळालेली आहेत.

मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनुसार जा.नं. एसएसएस/वशि/प्रसादा/१९३६/२०१२ दि. ३१.७.२०१२ चे पत्राने थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेकरीता थर्मिया बी २०९ लि. ऑईल खरेदीकरणेकामी खालील एजन्सीकडून दरपत्रक मागविण्यात आलेले होते.

१) मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद.
२) पद्माटेक इंजिनिअरींग सिस्टीम, पुणे.
३) मल्टिटेक सर्व्हिसेस,औरंगाबाद
४) गुरु साई एन्टरप्रायजेस, पुणे.

त्यानुसार उपरोक्त ४ एजन्सीपैकी खालील ३ एजन्सींनी विहीत मुदतीत सिलबंद दरपत्रक सादर केलेले आहेत.

१) मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद.
२) पद्माटेक इंजिनिअरींग सिस्टीम, पुणे.
३) गुरु साई एन्टरप्रायजेस, पुणे.

तरी सदरचे दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता खालीलप्रमाणे दर देऊ केले आहे.

| अ.नं. | दरपत्रकाधारकांचे नांव | दरपत्रकातील दर रु. | चर्चा / वाटाघाटी करुन देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| १ | मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद. | ५८,८०५.६२ | अनुपस्थित |
| २ | पद्माटेक इंजिनिअरींग सिस्टीम, पुणे. | ३३,०७५/- | अनुपस्थित |
| ३ | गुरु साई एन्टरप्रायजेस, पुणे | ३२,४४७.२५ | अनुपस्थित |

**निर्णय क्र.७३१ यावर सविस्तर चर्चा होऊन, थर्मिक फ्ल्युड हिटींग यंत्रणेकरीता थर्मिया बी ऑईल खरेदीकामी मे.गुरु साई एन्टरप्रायजेस, पुणे यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, श्रीसाई प्रसादायल)

---

**विषय नं.११ विद्युत विभागासाठी एम.एस.स्क्वेअर जाळी खरेदीकामी प्राप्त कोटेशनधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलावून निम्नतम दराने पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४.०१.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.०१ (२) अन्वये सन २०११-१२ करिता विद्यूत,पाणी पुरवठा,ध्वनीक्षेपण आरोग्य,बगीचा विभागांसाठी आवश्यक असणारे वार्षिक साहित्य खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस व याकामी येणारे अंदाजे रु. ९० लाख मात्रचे खर्चास मान्यता आहे.

खरेदी विभागाकडील दि.३१.०७.२०१२ मंजूर प्रस्तावाने खालील प्रमाणे विद्यूत विभागासाठी एम.एस.स्क्वेअर जाळी खरेदीकामी फेर दरपत्रके मागविणेस ( कोटेशन ) मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | तपशिल | मागणी संख्या |
|---|---|---|
| ०१ | एम.एस.स्क्वेअर जाळी २५x२५x ५/३ MM | ५०० रनिंग फुट |
| ०२ | एम.एस.स्क्वेअर जाळी ५०x५०x ५/३ MM | ५००रनिंग फुट |

वरील एम.एस.स्क्वेअर जाळी खरेदीकामी इकडील जा.नं.एसएसएस-वशी- खरेदी-२००५ दि. ४.०८.२०१२ अन्वये १० पुरवठाधारकांना दर मागणी दि. १७.०८.२०१२ अखेर करणेत आली होती. त्यानुसार खालील ५ पुरवठाधारकांची दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकांची नांव | आवक नंबर व तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मे. एक्सल ट्रेडिंग कंपनी,मुंबई | ७५३९/ १४.०८.२०१२ | बंद पाकिट |
| ०२ | मे. स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगांव | ७६५१/ १७.०८.२०१२ | बंद पाकिट |
| ०३ | मे. हिंदूस्थान टूल्स ॲण्ड इंजिनिअरिंग कंपनी, मुंबई | ७६६२/ १७.०८.२०१२ | बंद पाकिट |
| ०४ | मे. क्विक सप्लायर्स, नासिक | ७६६६/ १७.०८.२०१२ | बंद पाकिट |
| ०५ | ठाकूर श्रॉफ ॲण्ड इलेक्ट्रीक कंपनी,पुणे | ७७३०/ २०.०८.२०१२ | बंद पाकिट - मुदतीनंतर |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले मुदतीत ४ व मुदतीनंतर १ असे. ५ दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात येऊन, दरपत्रकधारकांना समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता खालीलप्रमाणे दर देऊ केले आहे.

| अ.नं. | दरपत्रकाधारकांचे नांव | एम.एस.स्क्वेअर जाळी २५x२५x ५/३ MM - ५०० रनिंग फुट (२००० स्क्वे.फुट ) | एम.एस.स्क्वेअर जाळी ५०x५०x ५/३ MM- ५०० रनिंग फुट (१५०० स्क्वे.फुट |
|---|---|---|---|
| ०१ | मे. एक्सल ट्रेडिंग कंपनी,मुंबई | | |
| | **दरपत्रकातील दर** | **<u>३१.२५</u>** | १८.३३ |
| | **चर्चेअंती देऊ केलेले दर** | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०२ | मे. स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगांव | | |
| | **दरपत्रकातील दर** | ५०.०० | ५८.३३ |
| | **चर्चेअंती देऊ केलेले दर** | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०३ | मे. हिंदूस्थान टूल्स ॲण्ड इंजिनिअरिंग कंपनी, मुंबई | | |
| | **दरपत्रकातील दर** | ३३.७५ | ३३.७५ |
| | **चर्चेअंती देऊ केलेले दर** | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०४ | मे. क्विक सप्लायर्स, नासिक | | |
| | **दरपत्रकातील दर** | ३२.१७ | **<u>१६.०८</u>** |
| | **चर्चेअंती देऊ केलेले दर** | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०५ | ठाकूर श्रॉफ ॲण्ड इलेक्ट्रीक कंपनी,पुणे | | |
| | **दरपत्रकातील दर** | १२९.३७ | ६४.१२ |
| | **चर्चेअंती देऊ केलेले दर** | अनुपस्थित | अनुपस्थित |

**निर्णय क्र.७३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, एम.एस.स्क्वेअर जाळी २५x२५x ५/३ MM - ५०० रनिंग फुट (२००० स्क्वे.फुट ) खरेदीकामी मे. एक्सल ट्रेडिंग कंपनी,मुंबई व एम.एस.स्क्वेअर जाळी ५०x५०x ५/३ MM- ५०० रनिंग फुट (१५०० स्क्वे.फुट ) खरेदीकामी मे. क्विक सप्लायर्स, नासिक यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.१२ श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागासाठी केमिकल व डिटर्जंट खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून निम्नतम दर पुरवठाधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०६.०४.२०१२ चे सभेतील निर्णय क्र. ३४६ नुसार साईबाबा भक्तनिवासस्थान , श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे लॉड्री केमिकल व /डिटर्जंट खरेदीकामी नामांकित केमिकल/डिटर्जंट निर्माते व विक्रेते यांचेकडून विहीत पध्दतीने निविदा/कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु. ४,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील जा.नं. १२३३ दि. २३.०६.२०१२ चे पत्राने खालीलप्रमाणे केमिकल व डिटर्जंट मटेरियल खरेदी करावयाचे आहे.

| अ.नं. | केमिकल व डिटर्जंटचा तपशिल | मागणी परिमाण |
|---|---|---|
| ०१ | नॉक्स -१०० | २००० किलो |
| ०२ | नॉक्स बुस्ट | २५०० किलो |
| ०३ | नॉक्स सोर | १००० किलो |
| ०४ | नॉक्स लिक्वीड ब्लिच | ८५० लिटर |
| ०५ | नॉक्स वुल | १५० लिटर |
| ०६ | बी.एस.आर. | ४०० लिटर |
| ०७ | एमरॉल | २०० लिटर |

वरील केमिकल व डिटर्जंट मटेरियल खरेदी कामी इकडील जा.नं.एसएसएस-वशी- खरेदी-१४१० दि. ०३.०७.२०१२ अवये १६ पुरवठाधारकांना दर मागणी दि. १८.०७.२०१२ अखेर करणेत आली होती. त्यानुसार खालील मुदतीत २ सिलबंद व मुदतीनंतर प्राप्त उघडलेले १ असे ३ पुरवठाधारकांची दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकांची नांव | आवक नंबर व तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मे.साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | ६१३८/ १७.०७.२०१२ | बंद पाकिट |
| ०२ | मे. स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगांव | ६१३९/ १७.०७.२०१२ | बंद पाकिट |
| ०३ | मे. मिनीटेक,मुंबई | ६६९५/ २७.०७.२०१२ | उघडलेले दरपत्रक |

उपरोक्त प्राप्त झालेले २ सिलबंद व एक उघडलेले असे ३ दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात येऊन पुरवठाधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालील प्रमाणे दर देऊ केलेले आहे.

| अ.नं. | केमिकल व डिटर्जंटचा तपशिल | मागणी परिमाण | मे.साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | | मे. स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगांव | | मे. मिनीटेक,मुंबई | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दरपत्रकातील दर रु. प्र.कि. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. प्र.कि. | दरपत्रकातील दर रु. प्र.कि. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. प्र. कि. | दरपत्रकातील दर रु. प्र.कि. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. प्र.कि. |
| ०१ | नॉक्स -१०० | २००० किलो | १७०/- | अनुपस्थित | १५८/- | अनुपस्थित | ७८.२२ | ७८.२२ |
| ०२ | नॉक्स बुस्ट | २५०० किलो | ९८/- | अनुपस्थित | ९२/- | अनुपस्थित | ४०.८८ | ४०.८८ |
| ०३ | नॉक्स सोर | १००० किलो | १७०/- | अनुपस्थित | १६४/- | अनुपस्थित | ४२.६६ | ४२.६६ |
| ०४ | नॉक्स लिक्वीड ब्लिच | ८५० लिटर | २७०/- | अनुपस्थित | २६२/- | अनुपस्थित | १९.५५ | १९.५५ |
| ०५ | नॉक्स वुल | १५० लिटर | २७०/- | अनुपस्थित | २६४/- | अनुपस्थित | १९०.०० | १९०.०० |
| ०६ | बी.एस.आर. | ४०० लिटर | ३००/- | अनुपस्थित | २८७/- | अनुपस्थित | १९१.१२ | १९१.१२ |
| ०७ | एमरॉल | २०० लिटर | १७०/- | अनुपस्थित | १६५/- | अनुपस्थित | ६४.०० | ६४.०० |

**निर्णय क्र.७३३ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागासाठी केमिकल व डिटर्जंट खरेदीकामी मे.मिनीटेक, मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.१३ साईआश्रम १ व २ करिता आवश्यक कार्यालयीन फर्निचर खरेदीसाठी प्राप्त कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.०६.०४.२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३४७ अन्वये साईआश्रम १/२ इमारतींमध्ये आवश्यक कार्यालयीन फर्निचर खरेदीस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१८,००,०००/- (अक्षरी रुपये अठरा लाख) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

सुरुवातीच्या खरेदीचा अंदाजे खर्च रु.१८,००,०००/- (अक्षरी रुपये अठरा लाख) मात्र होता. परंतू बांधकाम विभागामार्फत मे.शर्मा फर्निचर, रेवारी, हरियाणा यांचेकडून साईआश्रम १ व २ करिता देणगी स्वरुपात खुर्च्या मिळणार असल्याने एकुण फर्निचर खरेदीतून खुर्च्यांची मागणी वगळता इतर फर्निचर (टेबल व कपाटे) खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव साईआश्रम विभागाने सादर केला होता.

त्यानुसार दि.३१.०७.२०१२ रोजीच्या दैनिक सकाळ या वर्तमानपत्रात फर्निचर खरेदीबाबत जाहिर निविदा सुचना प्रसिद्ध करुन दि.०१.०८.२०१२ ते दि.११.०८.२०१२ अखेर शिर्डी कार्यालय व मुंबई कार्यालय येथे निविदा विक्री करण्यात येऊन सबंधित कंपनींच्या अधिकृत वितरकांकडून सिलबंद निविदा मागणी करण्यात आल्या होत्या. सिलबंद निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.१५.०८.२०१२ होती. त्यानुसार मुदतीअंती प्राप्त निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर | ७५३२/१४.०८.२०१२ |
| ०२. | मे.श्रद्धा ट्रेडर्स, अहमदनगर | ७५३३/१४.०८.२०१२ |
| ०३. | मे.खंडेलवाल स्टील फर्निचर, अहमदनगर | ७५३४/१४.०८.२०१२ |
| ०४. | मे.रोहन एंटरप्रायझेस, अहमदनगर | ७५३५/१४.०८.२०१२ |

उपरोक्त प्रमाणे निविदा मुदतीअंती प्राप्त झालेल्या आहेत. मुंबई कार्यालय येथून एकही निविदाची विक्री झालेली नाही.

वरील निविदाधारकांचे लिफाफा नं.२ दि.२४.०८.२०१२ रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आला आहे. त्याचा तपशिल सोबतच्या परिशिष्ठात नमुद केला आहे. सदर परिशिष्ठामध्ये मे.श्रद्धा ट्रेडर्स, अहमदनगर व मे.खंडेलवाल स्टील फर्निचर, अहमदनगर यांनी कंपनीचे अधिकृत वितरक असलेबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. त्याबाबत खरेदी विभागाकडील दि.२७.०८.२०१२ रोजीचे टिपणीवर सबंधीत पुरवठाधारकांना चर्चा वाटाघाटीचे वेळी प्रमाणपत्र सादर करणेबाबत आदेश आहेत.

उपरोक्त चारही निविदाधारकांचे लिफाफा क्र.१ निविदा आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन निविदाधारकांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | मालाचा तपशिल | मे.आर.टी.कराचीवाला, अहमदनगर | | मे.श्रद्धा ट्रेडर्स, अहमदनगर | | मे.खंडेलवाल स्टील फर्निचर, अहमदनगर | | मे.रोहन एंटरप्रायझेस, अहमदनगर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. . | दरपत्रकातील दर रु. प्र.कि. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु.. | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु.. |
| ०१ | ऑफिस टेबल-1670W x 900 D x 750H mm, T-104, गोदरेज-04 नग | १७,०१४/- | अनुपस्थित | १८,८२०/- | १८,७००/- | १८,९००/- | अनुपस्थित | १८,८००/- | १८,५००/- |
| ०२ | ऑफिस टेबल-T9-1370W x 690 D x 740H mm, T-9, गोदरेज-15 नग | १३,३००/- | अनुपस्थित | १४९०६/- | १४,८७५/- | १४,९५७/- | अनुपस्थित | १४,८८५/- | १४,६००/- |
| ०३ | स्टील ऑफिस कपाट- 915W x 485D x 1980H mm, Storwel M2, गोदरेज-02 नग | १७,४७०/- | अनुपस्थित | १९,३५७/- | १९,०७५/- | १९,४५०/- | अनुपस्थित | १९,२९०/- | १९,०५५/- |
| ०४ | स्टील ऑफिस कपाट- 915W x 485D x 1980H mm,4 सेल्फ, 5 कप्पे, Plain Welded, गोदरेज-14 नग | १५,१५८/- | अनुपस्थित | १६,७१५/- | १६,६००/- | १६,७७५/- | अनुपस्थित | १६,६५०/- | १६,३९०/- |

**निर्णय क्र.७३४ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम १ व २ करिता आवश्यक कार्यालयीन फर्निचर खरेदीकामी मे.आर.टी.कराचीवाला,अहमदनगर, यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.१४ पाणी पुरवठा विभागासाठी आर.सी.सी. चेंबर झाकणे खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०४.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.३३९ अन्वये पाणी पुरवठा विभागासाठी चेंबर झाकणे खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु. ४,८५,२५८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

संस्थानचे पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील दि. २०.०६.२०१२ चे पत्राने कळविलेनुसार खाली **अ** व **ब** मध्ये नमुद केलेप्रमाणे आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेम व झाकणे खरेदी करावयाचे आहे.

**अ) आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह..**

| अ.नं. | तपशिल व साईज | परिमाण | मागणी संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - २४" x २४ " | हेवी | ८० नग |
| ०२ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - २४" x ३६" | हेवी | २२ नग |
| ०३ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - १८ " x २४" | हेवी | १५ नग |
| ०४ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - १८ " x १८" | हेवी | ३० नग |
| ०५ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - १२ "x १२ " | हेवी | ३० नग |
| ०६ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - १६ " x २२ " | हेवी | १५ नग |
| ०७ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - २१ " राऊंड | हेवी | ०५ नग |

**ब) आर.सी.सी.चेंबर कव्हर..**

| अ.नं. | तपशिल व साईज | परिमाण | मागणी संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | आर.सी.सी.चेंबर कव्हर - २४" x ३६" | हेवी | ०२ नग |
| ०२ | आर.सी.सी.चेंबर कव्हर - २४" x ४८ " | हेवी | २० नग |
| ०३ | आर.सी.सी.चेंबर कव्हर - २७" x २७ " | हेवी | २२ नग |
| ०४ | आर.सी.सी.चेंबर कव्हर - ३६" x ३६" | हेवी | १५ नग |
| ०५ | आर.सी.सी.चेंबर कव्हर - ४८ " x ४८" | हेवी | ०४ नग |
| ०६ | आर.सी.सी.चेंबर कव्हर - ३६" x ४८" | हेवी | ४९ नग |

वरील चेंबर झाकणे खरेदी कामी इकडील जा.नं.एसएसएस-वशी- खरेदी-१४८५ दि. ०६.०७.२०१२ अन्वये ८ पुरवठाधारकांना दर मागणी दि. २४.०७.२०१२ अखेर करणेत आली होती. त्यानुसार खालील प्रमाणे मुदतीत ४ पुरवठाधारकांची दरपत्रके प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकांची नांव | आवक नंबर व तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मे. नासिक कॉंक्रीट प्रॉडक्टस् , नासिक | ६२५८/ ०९.०७.२०१२ | बंद पाकिट |
| ०२ | मे.के.के. मनहोले ॲण्ड ग्रटींग्ज कंपनी, नासिक | ६२५९/ ०९.०७.२०१२ | बंद पाकिट |
| ०३ | मे.साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | ६५५०/ २४.०७.२०१२ | बंद पाकिट |
| ०४ | मे. स्वामी समर्थ एजन्सीज,कोपरगांव | ६५५१/ २४.०७.२०१२ | बंद पाकिट |

उपरोक्तप्रमाणे ४ प्राप्त झालेले दरपत्रके आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन पुरवठाधारकांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**अ) आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह..**

| अ. नं. | मालाचा तपशिल | मे.नाशिक कॉंक्रीट प्रॉडक्टस, नाशिक | | मे.के.के. मैनहोल ॲण्ड ग्रटींग्ज कंपनी, नासिक | | मे.साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | | मे. स्वामी समर्थ एजन्सीज,कोपरगांव | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु.. |
| ०१ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - २४" x २४ "- हेवी - मागणी ८०नग | २,२००/- | अनुपस्थित | **१,९६०/-** | अनुपस्थित | २,४२०/- | अनुपस्थित | २,३५०/- | अनुपस्थित |
| ०२ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - २४" x ३६ "- हेवी - मागणी २२नग | २,४००/- | अनुपस्थित | **२,०५५/-** | अनुपस्थित | २,६७०/- | अनुपस्थित | २,५००/- | अनुपस्थित |
| ०३ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - १८" x २४ "- हेवी - मागणी १५नग | १,७००/- | अनुपस्थित | **१,४६०/-** | अनुपस्थित | १,९७०/- | अनुपस्थित | १,९००/- | अनुपस्थित |
| ०४ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - १८" x १८ "- हेवी - मागणी ३०नग | १,५००/- | अनुपस्थित | **१,१५५/-** | अनुपस्थित | १,८५०/- | अनुपस्थित | १,७००/- | अनुपस्थित |
| ०५ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - १२" x १२ "- हेवी - मागणी ३०नग | ७००/- | अनुपस्थित | **३५०/-** | अनुपस्थित | १,०५०/- | अनुपस्थित | ९००/- | अनुपस्थित |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - १६" x २२ "- हेवी - मागणी १५नग | - | अनुपस्थित | - | अनुपस्थित | २,३२०/- | अनुपस्थित | **२,२००/-** | अनुपस्थित |
| ०७ | आर.सी.सी.चेंबर कव्हर फ्रेमसह साईज - २१" राऊड, हेवी - मागणी ०५नग | १,७५०/- | अनुपस्थित | **१,३९०/-** | अनुपस्थित | २,१५०/- | अनुपस्थित | २,०००/- | अनुपस्थित |

**ब) आर.सी.सी.चेंबर कव्हर.**

| अ. नं. | मालाचा तपशिल | मे.नाशिक कॉक्रीट प्रॉडक्टस्,नाशिक | | मे.के.के. मैनहोल ॲण्ड ग्रटींग्ज कंपनी, नासिक | | मे.साई सेल्स कार्पोरेशन, संगमनेर | | मे. स्वामी समर्थ एजन्सीज,कोपरगांव | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु.. |
| ०१ | आर.सी.सी.चेंबर कव्हर - २४" x ३६ " - हेवी - मागणी ०२नग | १,७००/- | अनुपस्थित | **१,४४०/-** | अनुपस्थित | २,२००/- | अनुपस्थित | १,९५०/- | अनुपस्थित |
| ०२ | आर.सी.सी.चेंबर कव्हर - २४" x ४८ " - हेवी - मागणी २०नग | १,६००/- | अनुपस्थित | **१,३७०/-** | अनुपस्थित | २,०००/- | अनुपस्थित | १,८५०/- | अनुपस्थित |
| ०३ | आर.सी.सी.चेंबर कव्हर - २७" x २७ " - हेवी - मागणी २२नग | १,६००/- | अनुपस्थित | **१,३७०/-** | अनुपस्थित | २,०००/- | अनुपस्थित | १,९३०/- | अनुपस्थित |
| ०४ | आर.सी.सी.चेंबर कव्हर - ३६" x ३६ " - हेवी - मागणी १५नग | २,२५०/- | अनुपस्थित | **१,८५०/-** | अनुपस्थित | २,७२०/- | अनुपस्थित | २,५५०/- | अनुपस्थित |
| ०५ | आर.सी.सी.चेंबर कव्हर - ४८" x ४८ " - हेवी - मागणी ०४नग | - | अनुपस्थित | - | अनुपस्थित | ११,१२२/- | अनुपस्थित | **१०,५००/-** | अनुपस्थित |
| ०६ | आर.सी.सी.चेंबर कव्हर - ३६" x ४८ " - हेवी - मागणी ४९नग | १,७००/- | अनुपस्थित | **१,४४०/-** | अनुपस्थित | २,१६०/- | अनुपस्थित | २,०५०/- | अनुपस्थित |

**निर्णय क्र.७३५ यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी पुरवठा विभागासाठी आर.सी.सी. चेंबर झाकणे खरेदीकामी उपरोक्त तक्त्यातील अधोरेखीत निम्न्तम दर मान्य करण्यात येऊन संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.१५ साऊंड सिस्टीमसाठी टी.व्ही. केबल खरेदी करणेकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून निम्नतम दराने पुरवठाधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि. १९.११.२०११ चे सभेतील निर्णय क्र. ८८२ अवन्ये साई आश्रम ए व बी इमारतीमध्ये साउंड सीस्टीमसाठी टीव्ही केबल खरेदीकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु. ३,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

संस्थानचे ध्वनीक्षेपन सी.सी.टीव्ही विभाग यांचेकडील दि. १८.०१.२०१२ चे पत्राने खालीलप्रमाणे साउंड सीस्टीमसाठी टीव्ही केबल खरेदी करुन मिळणेस कळविले होते.

| अ.नं. | तपशिल | कंपनी | मागणी मीटर |
|---|---|---|---|
| ०१ | सींगल मोड सीक्स कोअर फायबर ऑप्टीक अर्माड केबल | डी लीक | २,५०० मीटर |
| ०२ | १.५ स्क्वे.एम.एम. कॉपर अर्माड टु कोअर केबल | पॉलीकॅब | ३००० मीटर |

वरील केबल खरेदीकामी मा.त्रीसदस्य समितीचे दि. १४.०७.२०१२ चे सभेतील निर्णय क्र. ६०६ नुसार फेर दरपत्रके इकडील जा.नं.एसएसएस-खरेदी-ध्वनी.- २२०९ दि.१५.०८.२०१२अवये ध्वनीक्षेपन सी.सी. टीव्ही विभागाकडून प्राप्त झालेल्या १६ पुरवठाधारकांकडून दरपत्रके मागणी करण्यात येऊन त्यांची मुदत ०४.९.२०१२ अखेर देण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे मुदतीत ३ दरपत्रके प्राप्त झाली होती.

| अ.नं. | पुरवठाधारकांचे नांव व गांव | आवक नंबर | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | Excel Trading Company, Mumbai | ८२१६/२९.०८.२०१२ | सिलबंद पाकिट |
| ०२ | Essen Electrical Enterprise,Mumbai | ८२१७/२९.०८.२०१२ | सिलबंद पाकिट |
| ०३ | International Electricals,Ahmednagar | ८५२३/०४.०९.२०१२ | सिलबंद पाकिट |

उपरोक्त प्राप्त झालेले मुदतीत ३ सिलबंद दरपत्रके आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन पुरवठाधारकांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | दरपत्रकाधारकांचे नांव | सिंगल मोड सीक्स कोअर फायबर ऑप्टीक अर्माड केबल डी लींक कंपनी- मागणी २५०० मीटर | १.५ स्क्वे. एम.एम. कॉपर अर्माड टु कोअर केबल पॉलीकॅब कंपनी मागणी - ३००० मीटर |
|---|---|---|---|
| ०१ | Excel Trading Company, Mumbai | | |
| | दरपत्रकातील दर | २८.५० | ५२.०० |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०२ | Essen Electrical Enterprise, Mumbai | ३१.५० | ५१.३९ |
| | दरपत्रकातील दर | | |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०३ | International Electricals, Ahmednagar | **२८.३८** | **५१.३०** |
| | दरपत्रकातील दर | | |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित |

**निर्णय क्र.७३६ यावर सविस्तर चर्चा होऊन, साऊंड सिस्टीमसाठी टी.व्ही. केबल खरेदीकामी M/s. International Electricals, Ahmednagar यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं.१६ सर्व्हे नं.२१८ मधील एच.टी. व एल.टी. लाईन शिफ्टींग करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६-०४-२०१२ चे सभेतील विषय नं. ५९ निर्णय ३२० अन्वये सर्व्हे नं.२१८ मधील एच.टी.व एल.टी.लाईन शिफ्टींग करणेकामी रक्कम रु.२,२६,८००/- इतक्या खर्चास तसेच याकामी कोटेशन्स मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार जा.नं.एसएसएस / विद्युत / २०३७ / २०१२ दिनांक ०६-०८-२०१२ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव | शेरा |
|---|---|---|
| ०१) | मे.सुरभी इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ०१ बंद कोटेशन पाकीट |
| | | सोबत ०१ बंद ईएमडी पाकीट |
| ०२) | मे.ऋषिकेश इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ०१ बंद कोटेशन पाकीट |
| | | सोबत ०१ बंद ईएमडी पाकीट |
| ०३) | मे.विजय इलेक्ट्रीकल, शिर्डी | ०१ बंद कोटेशन पाकीट |
| | | सोबत ०१ बंद ईएमडी पाकीट |

उपरोक्तप्रमाणे सर्व्हे नं.२१८ मधील एच.टी.व एल.टी.लाईन शिफ्टींग करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन पुरवठाधारकांना चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले

| अ. नं. | कोटेशनधारकाचे नांव | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.सुरभी इलेक्ट्रीकल्स्, नाशिक | ३,१२,५६०/- | ३,१२,५६०/- |
| ०२ | मे.ऋषिकेश इलेक्ट्रीकल्स, नाशिक | २,९६,५३०/- | २,९६,५३०/- |
| ०३ | मे.विजय इलेक्ट्रीकल, शिर्डी | २,७८,६३०/- | २,७५,०००/- |

**निर्णय क्र.७३७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सर्व्हे नं.२१८ मधील एच.टी. व एल.टी. लाईन शिफ्टींग करणेकामी मे.विजय इलेक्ट्रीकल, शिर्डी यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.१७ श्री साईबाबांचे सन २०१३ चे डिलक्स वॉल कॅलेंडर्स, मेटपेट वॉल कॅलेंडर्स, डेस्क कॅलेंडर्स व थ्री डी वॉल कॅलेंडर्स छपाईकामी प्राप्त दरपत्रके उघडणे व निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे सन २०१३ चे डिलक्स वॉल कॅलेंडर्स, मेटपेट वॉल कॅलेंडर्स, थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स व थ्रीडी वॉल कॅलेंडर्स छपाईचे काम करुन घेणे कामी प्रकाशने विभागाकडील अधिकृत प्रेसधारकांचे यादीतील १३ प्रेसधारकांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१४४७/२०१२ अन्वये

दि.२८/०६/२०१२ रोजी इ-मेलवर दर मागणी पत्र पाठवून, बयाणा रक्कम व आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता करुन दि.१०/०७/२०१२अखेर सीलबंद निविदा जमा करणेबाबत कळविले होते.

त्यानुसार मुदती अखेर खालील प्रमाणे सिलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव | आवक क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | मे.चेरि ऑफसेट प्रा.लि., सोलापूर | ५७८७/१०.०७.२०१२ (शिर्डी कार्यालय) |
| ०२ | मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि., मुंबई | ४१३/१०.०७.२०१२ (मुंबई कार्यालय) |
| ०३ | मे.साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई | ४१४/१०.०७.२०१२ (मुंबई कार्यालय) |

तरी उपरोक्त सिलबंद निविदा आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन प्रेसधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | प्रेसधारकांचे नांव | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स | | श्री साईबाबा मेटपेट वॉल कॅलेंडर्स | | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स | | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मागणी -२५,०००नग | | मागणी -५,०००नग | | मागणी -१०,०००नग | | मागणी -२०,०००नग | |
| | | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | दरपत्रकातील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु.. |
| ०१ | मे.चेरि ऑफसेट प्रा.लि., सोलापूर | १७८/- | अनुपस्थित | - | - | - | - | - | - |
| ०२ | मे.टॅको व्हीजन्स् प्रा.लि., मुंबई | २२२/- | २२२/- | २४२/- | २३४/- | २४६/- | २४३/- | १७४/- | १७४/- |
| ०३ | मे.साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई | २१६/- | **१७८/-** | २३४/- | **२३२/-** | २४०/- | **२४०/-** | १६८/- | **१६६/-** |

**निर्णय क्र.७३८ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.चेरि ऑफसेट, सोलापुर यांनी दरपत्रकासोबत दर मागणी पत्रकात मागणी केलेप्रमाणे संपूर्ण डमी नमुना कॅलेंडर सादर न केल्यामुळे ते अपात्र ठरत आहेत, त्यामुळे त्यांचे दरपत्रक विचारात न घेता मे.साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. तसेच वरील दराने छपाईकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१८ साईआश्रम भाग १ व २ कडील बेडशीट, उशीकव्हर व चादरी धुणे इस्त्री करणेकामी लॉण्ड्री ठेकेदार नियुक्त करणेकामी ठेकेदाराशी चर्चा / वाटाघाटी करुन त्यावर अंतिम निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम ०१ व ०२ निवासस्थानांचे बेडशीट,उशीकव्हर व चादर धुवून इस्त्री करणेकामी बोलविण्यात आलेल्या निविदा समक्ष उघडण्यात आल्या.

निविदाधारकांनी देवू केलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **मे.गजानन ड्रायक्लिनर्स, गणेशनगर** | **मे.गजराज क्लिनर्स, अहमदनगर** | **मे.विजय अशोकराव चव्हाण, सावळिविहीर** |
|---|---|---|---|---|
| | **साईआश्रम-०१** | | | |
| ०१ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | ४.८५ | १४.०० | ८.०० |
| ०२ | उशीकव्हर धुवून इस्त्री करणे | २.३५ | ६.०० | ५.०० |
| ०३ | चादर धुणे | ६.२५ | १८.०० | १२.०० |
| | **साईआश्रम-०२** | | | |
| ०४ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | ४.८५ | १४.०० | ८.०० |
| ०५ | उशीकव्हर धुवून इस्त्री करणे | २.३५ | ६.०० | ५.०० |
| ०६ | चादर धुणे | ६.२५ | १८.०० | १२.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त निविदा सादरकर्त्याची काम करण्याची कुवत व त्यांचे कडे असणा-या मशिनरींची पाहणी मा.सदस्यांनी प्रत्यक्ष करावी व त्यानंतर अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.

त्यास अनुसरुन दि.२२/०८/२०१२ व दि.२३/०८/२०१२ रोजी प्रशासकीय अधिकारी श्री बी.डी.साबळे सो.विशेष कार्य अधिकारी श्री पी.बी.बोरावके सो.व श्री ई.एन.वाघ सो., साईबाबा भक्तनिवासस्थान प्र.अधिक्षक श्री एस.के.गोंदकर,लॉण्ड्री लिपीक श्री के.बी.सदाफळ यांनी खालील निविदाधारकांचे लॉण्ड्री युनिटला भेट देवून मशिनरी,कामाची पध्दत व क्षमता याबाबत पाहणी केली.

**१)** मे.गजानन ड्रायक्लिनर्स,गणेशनगर.

**२)** मे.गजराज क्लिनर्स, अहमदनगर.

**३)** मे.विजय अशोकराव चव्हाण,सावळिविहिर.

सदर पाहणी व अभ्यास दौ-यामध्ये निविदाधारकांकडे खालील तपशिला प्रमाणे कार्यरत असणा-या मशिनरी आणि क्षमता असल्याचे आढळुन आले.

**अ) मे.गजानन ड्रायक्लिनर्स,गणेशनगर.** श्री प्रकाश रामराव राऊत.

१) उपलब्ध मशिनचा तपशिल.

| अ.नं | मशिनचे नाव | नग | क्षमता | कपडे धुण्याची क्षमता ३० मिनिटे प्रति लॉट |
|---|---|---|---|---|
| ०१ | वॉशिंग मशिन | ०१ | १२० कि/ग्रॅम | ३०० बेडशीट,४०० उशीकव्हर, १०० चादर प्रत्येकी लॉट मध्ये धुतली जातात. |
| ०२ | वॉशिंग मशिन (बंद स्थितीत आहे) | ०१ | ९० कि/ग्रॅम | बंद आहे. |
| ०३ | हायड्रोएक्सट्रक्टर | ०१ | ३० कि/ग्रॅम | ४० बेडशीट २०० उशीकव्हर २० चादर प्रत्येकी १० मिनिटात पिळले जातात. |
| ०४ | हायड्रोएक्सट्रक्टर (बंदस्थितीत आहे) | ०१ | २० कि/ग्रॅम | बंद आहे. |
| ०५ | स्टिम बॉयलर (वुडन फायर) (बंदस्थितीत आहे) | ०१ | --- | --- |
| ०६ | इस्त्री टेबल | ०२ | --- | हाताने इस्त्री केली जाते |

- **इतर तपशिल-**

**२)** वार्षीक उलाढाल - १५ लाख पर्यन्त (तोंडी सांगणेवरुन) **३)** कर्मचारी संख्या-१३,**४)** वाहन संख्या - मारुती व्हॅन -१,दुचाकी -२ (मोटार सायकल) **५)** लॉण्ड्रीचे क्षेत्रफळ-०८ गुंठे **६)** दररोज धुतल्या जाणा-या कपडयांची संख्या-बेडशीट -१०००,उशीकव्हर -१३००,चादर-७००, टॉवेल-७००

**ब) मे.गजराज ड्रायक्लिनर्स,अहमदनगर**

१) उपलब्ध मशिनचा तपशिल.

| अ.नं. | मशिनचे नाव | नग | क्षमता | कपडे धुण्याची क्षमता ५० मिनिटे प्रति लॉट |
|---|---|---|---|---|
| ०१ | वॉशिंग मशिन | ०३ | प्रत्येकी ३५कि/ग्रॅम | ३०० शर्ट ,२४० पॅन्ट.प्रत्येकी लॉट मध्ये धुतली जातात. |
| ०२ | हायड्रोएक्सट्रक्टर | ०३ | प्रत्येकी ३० कि/ग्रॅम | वरील प्रमाणे धुतलेले कपडे पिळुण निघतात |
| ०३ | स्टिम बॉयलर | ०१ | ६०० कि/ग्रॅम | प्रति तास ३० लिटर डिझेल लागते,स्टिम तयार करुन इतर मशिनरींला स्टिम वापली जाते. |
| ०४ | कॅलेंडर मशिन | ०१ | १४००X ४०० | प्रति तास ४० नग साडी इस्त्री होते |
| ०५ | ड्रायर मशिन | ०१ | ३५ कि/ग्रॅम | एका वेळेस १०० शर्ट किंवा पॅन्ट वाळतात |
| ०६ | स्टिम प्रेस | ०५ | --- | सर्व स्टिम प्रेस मिळुन १०० ते १२५ शर्ट,पॅन्ट इस्त्री होतात. |
| ०७ | स्टिम प्रेस टेबल | ०५ | --- | सर्व स्टिम प्रेस मिळुन १५० कपडे इस्त्री होतात. |
| ०८ | इस्त्री टेबल | ०८ | --- | हाताने इस्त्री केली जाते |

- **इतर तपशिल**

**२)** वार्षीक उलाढाल - १,४३,३५,९१५/- रुपये **३)** कर्मचारी संख्या - ८५ **४)** वाहन संख्या- ॲपेरिक्षा २ नग **५)** लॉण्ड्रीचे क्षेत्रफळ- १३ गुंठे **६)** दररोज धुतल्या जाणा-या कपडयांची संख्या **:-**शर्ट -१३००,पॅन्ट -५००,साडी -३००,लेडीज वेअर -३००,इतर-१५०

**क) श्री सुभाष अण्णासाहेब चव्हाण.सावळिविहिर टेंडर नं.०४ खरेदी.निविदा श्री विजय अशोक चव्हाण या नावाने दिले.**

१) उपलब्ध मशिनचा तपशिल.

| अ.नं | मशिनचे नाव | नग | क्षमता | कपडे धुण्याची क्षमता ४५ मिनिटे प्रति लॉट |
|---|---|---|---|---|
| ०१ | वॉशिंग मशिन | ०१ | ६० कि/ग्रॅम | नविन आहे चालु केले नाही |
| ०२ | वॉशिंग मशिन (ॲटोमॅटिक) | ०१ | ३० कि/ग्रॅम | ८० बेडशीट,२०० उशीकव्हर,४० चादर प्रत्येकी लॉट मध्ये धुतली जातात |
| ०३ | वॉशिंग मशिन | ०१ | १२० कि/ग्रॅम | ५०० बेडशीट,१५०० उशीकव्हर, १०० चादर |
| ०४ | हायड्रोएक्सट्रक्टर | ०१ | ३० कि/ग्रॅम | ५०बेडशीट,२०० उशीकव्हर,२० चादर प्रत्येकी १०मिनिटात पिळले जातात |
| ०५ | हायड्रोएक्सट्रक्टर | ०१ | २५ कि/ग्रॅम | ४० बेडशीट,१५० उशीकव्हर,१८ चादर प्रत्येकी १०मिनिटात पिळले जातात |
| ०६ | कॅलेंडर मशिन | ०१ | इलेक्ट्रिक हिटर | नविन आहे चालु केले नाही |
| ०७ | ड्रायर मशिन | ०१ | ३० कि/ग्रॅम | एका वेळेस ३० टॉवेल वाळतात |
| ०८ | इस्त्री टेबल | ०२ | --- | हाताने इस्त्री केली जाते |

- इतर तपशिल -

**२)** वार्षीक उलाढाल - ४८,००,००० रुपये (तोंडी सांगणेवरुन),**३)** कर्मचारी संख्या - १०.**४)** वाहन संख्या-ॲपेरिक्षा २ नग,०१ टाटा झिप.**५)** लॉण्ड्रीचे क्षेत्रफळ - २० गुंठे **६)** दररोज धुतल्या जाणा-या कपडयांची संख्या **:-** बेडशीट-११००,उशीकव्हर-१५००,टॉवेल-१०००

| **मे.गजानन ड्रायक्लिनर्स, गणेशनगर** | **मे.गजराज क्लिनर्स, अहमदनगर** | **श्री सुभाष अण्णासाहेब चव्हाण, सावळीविहिर** |
|---|---|---|
| आपले कामाचा आवाका पाहता येथे कर्मचारी संख्या व वाहने कमी आहेत.लॉण्ड्रीचे क्षेत्रफळ कमी आहे त्याचप्रमाणे वार्षिक उलाढाल कमी आहे.यांचे दर कमी असुनही त्यांचे कडुन आपली संपुर्ण कामे दर्जाराखुन वेळेत पुर्ण होणार नाही असे वाटते. | पाहणीमध्येत्यांचेकडे घरगुती कपडे धुण्यासाठी येतात असे निदर्शनास आले.येथे मनुष्यबळ,वार्षिक उलाढाल जरी मोठी असली तरी शिरडी ते अहमदनगर हे अंतर (जाणे व येणे) १६० कि.मि.आहे.अंतराचा विचार करता आपणास दैनंदिन स्वच्छ कपडे पुरवठा होतील किंवा नाही याबाबत खात्री देता येत नाही शिवाय **दर सर्वात जास्त आहे.** | उपलब्ध मशिनरी,कर्मचारी,वार्षिक उलाढाल,वाहने,अंतर लॉण्ड्रीचे क्षेत्रफळ,पाण्याची उपलब्धता व दर यांचा विचार करता श्री चव्हाण यांचेकडुन आपली धुण्याची कामे करुन मिळतील असे वाटते. |

**<u>केलेल्या पाहणीमध्ये-</u>**

वरील प्रमाणे केलेल्या समक्ष निरीक्षणावरुन असे वाटते कि,आपले साईआश्रम भाग ०१ व ०२ या महत्वाकांक्षी प्रकल्पामध्ये असणा-या खोल्या व हॉल मधील कपडे धुण्याचेकाम फार मोठे आहे.सक्षम व पात्र ठेकेदाराकडुन काम करुन घेणे उचीत ठरेल.

निविदेमध्ये मे.गजानन ड्रायक्लिनर्स,गणेशनगर यांचे दर सर्वात कमी आहेत. कामाची तातडी व गरज पाहता त्यांचेकडुन वेळेवर कामे करुन मिळणार नाहीत जर सदरच्या न्युनतम दरापेक्षा कमी दराने मे.सुभाष अण्णासाहेब चव्हाण, सावळीविहिर हे कपडे धुण्याची कामे करुन देण्यास तयार असतीलतर त्यांचेकडुन साईआश्रम नं.०१ व साईआश्रम नं.०२ ची कपडे धुण्याचीकामे प्रायोगिक तत्वावर करुन घेता येईल.

साईआश्रम नं.०१ चे एकुण बेडशीट, उशीकव्हर व चादर यांची एकुण संख्या व अंदाजे दररोज धुणेसाठी निघणा-या कपडयांची एकुण संख्या खालील प्रमाणे.

| **अं. नं.** | **तपशील** | **एकुण** | **अंदाजे दररोज धुणेसाठीची संख्या** |
|---|---|---|---|
| १ | बेडशीट (धुवून इस्त्री) | १९९६८ | ३१०० |
| २ | उशीकव्हर (धुवून इस्त्री) | १९९६८ | ३१०० |
| ३ | चादर (फक्त धुणेसाठी) | ८४४८ | २०० |
| | **एकुण -** | **६४००** | |

साईआश्रम नं.०२ चे एकुण बेडशीट,उशीकव्हर व चादर यांची एकुण संख्या व अंदाजे दररोज धुणेसाठी निघणा-या कपडयांची एकुण संख्या खालील प्रमाणे.

| **अं. नं.** | **तपशील** | **एकुण** | **अंदाजे दररोज धुणेसाठीची संख्या** |
|---|---|---|---|
| १ | बेडशीट (धुवून इस्त्री) | १०५६० | १५०० |
| २ | उशीकव्हर (धुवून इस्त्री) | १०५६० | १५०० |
| ३ | चादर (फक्त धुणेसाठी) | ५२८० | १०० |
| | **एकुण -** | **३१००** | |

धुतलेल्या स्वच्छ बेडशीट,उशीकव्हर व चादर इ.चा संबंध थेट साईभक्तांशी असल्याने उपरोक्त प्रमाणे कपडे धुणेकामी मे.सुभाष अण्णासाहेब चव्हाण, सावळीविहिर येथील ठेकेदाराची नेमणुक करणेकामी त्यांचे दर न्युनतम असणे आवश्यक आहे.

सदरचे तीन ठेकेदारांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | करावयाच्या कामाचा तपशिल | मे.गजानन ड्रायक्लिनर्स,गणेशनगर. | | मे.गजराज क्लिनर्स, अहमदनगर. | | मे.विजय अशोकराव चव्हाण,सावळिविहिर. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निविदेतील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | निविदेतील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. | निविदेतील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
| **<u>साईआश्रम -०१</u>** | | | | | | | |
| ०१ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | ४.८५ (सर्व्हीस टॅक्ससह ५.४५) | - | १४.०० (सर्व्हीस टॅक्ससह १५.७३) | १२.०० + टॅक्स | ८.०० (सर्व्हीस टॅक्ससह ८.९९) | ७.०० + टॅक्स |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | २.३५ (सर्व्हीस टॅक्ससह २.६४) | - | ६.०० (सर्व्हीस टॅक्ससह ६.७४) | ५.०० + टॅक्स | ५.०० (सर्व्हीस टॅक्ससह ५.६१) | ३.०० + टॅक्स |
| ०३ | चादर धुणे | ६.२५ (सर्व्हीस टॅक्ससह ७.०२) | - | १८.०० (सर्व्हीस टॅक्ससह २०.२०) | १५.०० + टॅक्स | १२.०० (सर्व्हीस टॅक्ससह १३.४८) | १०.०० + टॅक्स |
| **साईआश्रम -०२** | | | | | | | |
| ०१ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | ४.८५ (सर्व्हीस टॅक्ससह ५.४५) | - | १४..०० (सर्व्हीस टॅक्ससह १५.७३) | १२.०० + टॅक्स | ८.०० (सर्व्हीस टॅक्ससह ८.९१) | ७.०० + टॅक्स |
| ०२ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | २.३५ (सर्व्हीस टॅक्ससह २.६४) | - | ६.०० (सर्व्हीस टॅक्ससह ६.७४) | ५.०० + टॅक्स | ५.०० (सर्व्हीस टॅक्ससह ५.६१) | ३.०० + टॅक्स |
| ०३ | चादर धुणे | ६.२५ (सर्व्हीस टॅक्ससह ७.०२) | - | १८.०० (सर्व्हीस टॅक्ससह २०.२०) | १५.०० + टॅक्स | १२.०० (सर्व्हीस टॅक्ससह १३.४८) | १०.०० + टॅक्स |

**निर्णय क्र.७३९ उपरोक्त तक्त्यात मे.गजानन ड्रायक्लिनर्स, गणेशनगर यांचे दर निम्नतम आहे, परंतू त्यांनी आजचे सभेत समक्ष साई आश्रम १ व २ चे कपडे धुलाईचे काम मोठ्या स्वरुपाचे असून एका दिवसात सुमारे १०,००० पर्यंत कपडे धुलाईचे काम माझ्याकडून होऊ शकणार नसल्याने मी आपले काम करु शकत नाही असे पत्र दिले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग १ व २ कडील बेडशीट, उशीकव्हर व चादरी धुणे इस्त्री करणेकामी मे.विजय अशोकराव चव्हाण,सावळीविहिर यांचे व्दितीय निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,साईआश्रम १ व २ / अधिक्षक,भक्तनिवासस्थान )

---

**विषय नं.१९ साई आश्रम नं.१ व २ साठी साऊंड सिस्टीम मटेरियल खरेदीकामी आलेली दरपत्रके उघडून निम्नतम दराने पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** खालिल प्रमाणे साउंड सिस्टिम मटेरियल साहित्य खरेदि कामी कोटेशन मागविण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | मटेरीयल वर्णन | कंपनी | नग |
|---|---|---|---|
| ०१ | १५ वॅट आहुजा कं.हॉर्न मॉ.नं. UHC१५XT | आहुजा | ५५ |
| ०२ | ४०००वॅटआहुजा ॲम्प्लीफायर मॉ.नं. TZA४०००DP | आहुजा | ०४ |
| ०३ | सोनी कं.DVD प्लेयर मॉ.नं.DVP-SR-६६० | सोनी | ०३ |
| ०४ | ट्रान्समीटर व रीसीव्हर १V इन १V आउट | ऑप्टीलींक | १२ |
| ०५ | व्हीडीओ डिस्ट्रीब्युटर १x१० | मार्क | ०५ |
| ०६ | व्हीडीओ डिस्ट्रीब्युटर १x५ | मार्क | १० |
| ०७ | ऑडीओ डिस्ट्रीब्युटर १x३ | मार्क | ०५ |

उपरोक्त तक्त्यातील अं.नं. १ ते ३ साहित्य खरेदि करणे आवश्यक आहे. व उर्वरित अं.नं. ४ ते ७ साहित्याची आवश्यकता नसल्याने विचारात घेऊ नये .

वरील साहित्य खरेदीकामी जा.नं. एसएसएस/ध्वनी/३५९ /२०१२ दि.२१ एप्रिल,२०१२ अन्वये मागवीलेल्या कोटेशननूसार खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झाले आहे.

| अ.नं. | निवीदा धारकाचे नाव | आवक नं. | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | अभय ट्रेडिंग कंपनी अहमदनगर | ४४८६ | बंद पाकीट |
| ०२ | श्रेयस इलेक्ट्रॉनिक्स अहमदनगर | ४४६९ | बंद पाकीट |
| ०३ | मे.मनसुखलाल सेल्स कॉ. अहमदनगर | ४४६७ | बंद पाकीट |
| ०४ | न्यु.अनिल इलेक्ट्रॉनिक्स अहमदनगर | २२३५ | बंद पाकीट |
| ०५ | सन्नी इलेक्ट्रॉनिक्स | ५६७२ | बंद पाकीट |
| ०६ | रॉकेश इलेक्ट्रॉनिक्स | ५७०० | बंद पाकीट |

उपरोक्तप्रमाणे ६ प्राप्त झालेले कोटेशन आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन कोटेशनधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | १५ वॅट आहुजा कं.हॉर्न मॉ.नं. UHC१५XT | | ४०००वॅटआहुजा ॲम्प्लीफायर मॉ.नं. TZA४०००DP | | सोनी कं.DVD प्लेयर मॉ.नं.DVP-SR-६६० | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागणी | ५५ नग | | ०४ नग | | ०३ नग | |
| | | दरपत्रकातील दर | चर्चेअंती देऊ केले दर | दरपत्रकातील दर | चर्चेअंती देऊ केले दर | दरपत्रकातील दर | चर्चेअंती देऊ केले दर |
| ०१ | अभय ट्रेडिंग कंपनी अहमदनगर | **१,२३३/- प्र.नग** | अनुपस्थित | **२१,५१०/- प्र.नग** | अनुपस्थित | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | श्रेयस इलेक्ट्रॉनिक्स अहमदनगर | १,४००/- प्र.नग | अनुपस्थित | २३,०००/- प्र.नग | अनुपस्थित | - | - |
| ०३ | मे.मनसुखलाल सेल्स कॉ. अहमदनगर | १,३००/- प्र.नग | अनुपस्थित | २२,०००/- प्र.नग | अनुपस्थित | - | - |
| ०४ | न्यु.अनिल इलेक्ट्रॉनिक्स अहमदनगर | - | - | - | - | २,५९०/- प्र.नग | अनुपस्थित |
| ०५ | सन्नी इलेक्ट्रॉनिक्स | - | - | - | - | **२,४००/- प्र.नग** | अनुपस्थित |
| ०६ | रॉकेश इलेक्ट्रॉनिक्स | - | - | - | - | २,६५०/- प्र.नग | अनुपस्थित |

**निर्णय क्र.७४० यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम नं.१ व २ साठी साऊंड सिस्टीम मटेरियल खरेदीकामी उपरोक्त तक्त्यातील अधोरेखीत निम्नतम दर मान्य करण्यात येऊन संबंधीत पुरवठाधारकांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- ध्वनीक्षेपण विभाग प्रमुख)

---

**विषय नं.२० झेरॉक्स मशिन मॉडेल ७५५६ करीता Full Service Maintenance Agreement (FSMA पध्दतीचे कॉन्ट्रॅक्ट) करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सामान्य प्रशासन, कार्यासन नं.१२ कडे खालीलप्रमाणे झेरॉक्स मशीन आहेत.

| अ. नं. | मशीनचा तपशिल | मशीन वापराची तारीख | मशीनची आयुष्य मर्यादा / कॉपीज संख्या | मशीनची किंमत रुपये | दि.३१.०७.१२ अखेर झालेल्या झेरॉक्स प्रती. | मशीनची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशिन-मॉडेल ४१५० | दि.१७/११/२००९ | ०५ लाख कॉपीज् | रु. १४७७६८/- (देणगी) | ६ लाख कॉपीज् | **लाईफ संपलेले आहे.** (नादुरुस्त असल्याने मशीन बंद आहे.) |
| २ | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशिन- मॉडेल ५६४५ | दि.२७/०३/२०१० | १० लाख कॉपीज् | रु.५,०१,०००/- (देणगी) | ६ लाख कॉपीज् | मशीन चालु आहे. |
| ३ | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशिन- मॉडेल ७५५६ | दि.२१/०२/२०१२ | २० लाख कॉपीज् | रु. ८,३९,०००/- (देणगी) | २.७० लाख कॉपीज् | मशीन चालु आहे. |

**सध्या झेरॉक्स कामाची पध्दत खालीलप्रमाणे आहे.**

१) उपरोंक्त तीनही मशीन **झेरॉक्स कंपनीची** असून सदर मशीनच्या दुरुस्ती-देखभालीचे काम कंपनीचे डिलर ओम साई मार्केटींग औरंगाबाद हे सेवा म्हणुन त्यांना वेळ मिळेल तसे येऊन दुरुस्त करतात. सदरचे काम सेवा म्हणून असल्यामुळे वेळेत मॅकेनिक उपलब्ध होत नाही व त्यामुळे झेरॉक्स कामाची अडचण निर्माण होते.

२) सदर मशीनचे खराब झालेले स्पेअर पार्ट बाजारभावाप्रमाणे खेरेदी करुन मशीनला बसवून मशीन चालु केले जाते.

३) झेरॉक्स मशीनसाठी लागणारे टोनर कार्ट्रेज व ड्रम कार्ट्रेज खरेदी विभागामार्फत वार्षीक खरेदीमध्ये टेंडर मागवुन कमीतकमी दराचे टेंडर मंजुर केले जाते. यापुर्वी पुरवठादाराकडून आलेल्या टोनरमध्ये झेरॉक्सच्या कमी प्रती निघलेल्या आहेत. त्याबाबत झेरॉक्सचे इंजिनियर यांनी सदरचे टोनर खराब असल्यामुळे कमी प्रती निघतात, त्यामुळे सदर मशीनचे इतरही स्पेअर पार्ट खराब होतात, असे सांगितले होते.

४) सन २०११-२०१२ या वर्षात झेरॉक्स मॉडेल ५६४५ या मशीनच्या ०५ टोनरसाठी रु.५५,५३४/- व ३ ड्रमसाठी रु.८८,८३६/- तसेच फ्युजरमॉडेलसाठी रु.२५,२००/- असा एकूण रु.१,६९,५७०/- खर्च झालेला असुन त्यामध्ये २,४९,५२५ झेरॉक्स प्रती निघलेल्या आहेत. म्हणजे एका प्रतीस ६८ पैसे खर्च आलेला आहे.

५) तसेच सन २०११-२०१२ या वर्षात झेरॉक्स मॉडेल ४१५० या मशीनच्या १५ टोनरसाठी रु.१,००,५५१/- व ३ ड्रमसाठी रु.४१,९११/- तसेच फ्युजरमॉडेलसाठी रु.८४००/- असा एकूण रु.१,५०,८६२/- खर्च झालेला असुन त्यामध्ये २,१८,९२९ झेरॉक्स प्रती निघलेल्या आहेत. म्हणजे एका प्रतीस ६९ पैसे खर्च आलेला आहे.

**FSMA कॉन्ट्रॅक्टच्या करारनाम्याची इकडील कार्यालयास मिळालेली दि.०५.५.२०१२ रोजीची नमुना प्रत व दि.१४.८.२०१२ रोजी प्राप्त झालेल्या नमुना बीलानुसार झेरॉक्स प्रतीचा खर्च खालीलप्रमाणे -**

१) FSMA पध्दतीच्या कॉन्ट्रॅक्ट करीता कंपनीने A४ व leagal पेपर साईजसाठी ३७ पैसे व कलर झेरॉक्ससाठी रु.६.५० (सरकारी कर वेगळा राहाणार आहे.) असे दर कळविले आहे.

२) संस्थानमध्ये A४ व leagal या साईजच्या पेपरवर ब्लॅक-व्हाईट झेरॉक्सचे काम चालते, कलर झेरॉक्स क्वचितच वापर होतो. म्हणुन झेरॉक्सचे अधिकृत डिलर ओम साई मार्केटींग औरंगाबाद यांचेकडुन माहीतीसाठी नमुना बील मागवले आहे. त्याची माहीती खालीलप्रमाणे-

(१) एकूण झेरॉक्स प्रती ४० हजार.
(२) ३७ पैशाप्रमाणे होणारे एकूण बील - रु. १४,८००/-
(३) एकुण बीलाची ७०% रक्कम रु. १०७६०/- त्याच्यावर १२.३६% सर्व्हिस चार्ज- रु. १,२८०/-
(४) एकुण बीलाची ७५% रक्कम रु.१११००/- त्याच्यावर १२.५ % चार्ज. - रु. १,३८७/-

**झेरॉक्सच्या ४०,००० प्रतींसाठी - एकुण रुपये १७,४६८/-**

FSMA कॉन्ट्रॅक्टमध्ये एका प्रतीसाठी ३७ पैसे +७ पैस (इतर कर) = एकुण ४४ पैस खर्च येणार आहे.

संस्थानला आज एका प्रतीसाठी ६८ पैसे खर्च येत आहे. म्हणजे FSMA पध्दतीचे कॉन्ट्रॅक्ट केल्यानंतर एका प्रतीमागे २४ पैसे फायदा होणार आहे. १ वर्षासाठी साधारण ४,५०,००० (साडे चार लाख) झेरॉक्स प्रतींमागे १,०८,०००/-(रु.एक लाख आठ हजार) फायदा होणार आहे.

**झेरॉक्स मॉडेल ७५५६ साठी FSMA पध्दतीचे कॉन्ट्रॅक्ट केल्यामुळे खालीलप्रमाणे फायदे होणार आहे**.

(१) संस्थानची एका वर्षाला साधारण रुपये-१,०८,०००/- आर्थिक बचत होणार आहे,
(२) झेरॉक्सचे साहित्य खरेदी करणे कामी जाहीरात देणे, टेंडर मागवणे अशी कामे कमी होतील.
(३) मॅकेनिक व झेरॉक्सचे स्पेअरपार्ट वेळेवर उपलब्ध होणार असल्याने वेळीच दुरुस्ती होईल.

यापुर्वी FSMA पध्दतीचे कॉन्ट्रॅक्ट केलेले नाही. अनुभव म्हणुन १ वर्षाकरीता मॉडेल ७५५६ या मशीनसाठी FSMA पध्दतीचे कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत विचार होणेस विनंती.

झेरॉक्स मॉडेल ७५५६ साठी FSMA पध्दतीचे कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत झेरॉक्स इंडिया कंपनीच्या प्रतिनिधीस आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

त्यानुसार झेरॉक्स इंडिया कंपनीच्या प्रतिनिधी श्री.दिपक कांबळे हे आजच्या सभेत उपस्थित होते. त्यांचेशी समक्ष चर्चा केली असता त्यांनी खालील प्रमाणे दर देऊ केले आहे.

| अ.नं. | पेपर साईज | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | A३ साईज | ०.७० + टॅक्स |
| ०२ | A४ साईज | ०.३७ + टॅक्स |
| ०३ | Legal साईज | ०.३७ + टॅक्स |
| ०४ | कलर झेरॉक्स | ६.५० + टॅक्स |

**निर्णय क्र.७४१ यावर सविस्तर चर्चा होऊन, झेरॉक्स मशिन मॉडेल ७५५६ करीता Full Service Maintenance Agreement (FSMA पध्दतीचे कॉन्ट्रॅक्ट) मे.झेरॉक्स इंडिया लि., नोयडा यांचेकडून एक वर्षासाठी करुन घेण्यास व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्रशासन शाखा वशी-१२)

---

**विषय नं.२१ सन २०१०-११ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा दोष-दुरुस्ती अहवाल सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१०-११ या आर्थिक वर्षाकरीता संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी कोचर ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटट, मुंबई यांची नियुक्ती महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांनी, जा.क्र.सां.सं.वि-२०११/२३९/प्र.क्र.३८/का.१६ दिनांक ३० जुलै,२०११ अन्वये करण्यात आली होती. त्यास अनुसरून त्यांनी सदर कामकाज पूर्ण केले असून, त्या संदर्भातील लेखापरिक्षणाचा अहवाल संस्थानकडे दि.२३/०९/२०११ रोजी सादर केला आहे. अधिनियम २००४ मधिल तरतुद १७ (२) क आणि २९(२) अन्वये सदर अहवालाची एक प्रत मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/४१२१/२०११ दि.१२.११.२०११ व एक प्रत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई. यांना जा.क्र.एसएसएस/वशी-लेखा/४१२२/२०११ दि.१२.११.२०१० अन्वये सादर करण्यात आलेली आहे. तसेच सदरचा वार्षिक अहवाल माहे डिसेंबर-२०११ मध्ये झालेल्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सभागृहाच्या पटलावर सादर झालेला आहे.

सदर लेखापरिक्षण अहवालातील मुद्या संदर्भातील दोष दुरूस्ती बाबतचा अहवाल सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी नियुक्त करण्यात येणा-या वैधानिक लेखापरिक्षक यांना उपलब्ध करून द्यावा लागणार आहे. त्या अनुशंगाने उपरोक्त लेखापरिक्षण अहवालातील मुद्दांचा दोष दुरूस्ती अहवाल तयार करणे कामी, सदर अहवालाच्या प्रती संस्थानचे सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी नियुक्त करण्यात आलेले अंतर्गत लेखापरिक्षक मे.अभय शास्त्री ॲण्ड असो.पुणे व पूर्व लेखापरिक्षक श्री.ए.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटटस्, कोपरगाव तसेच पुर्व लेखापरिक्षक रुग्णालये श्री.

व्ही.व्ही.कोठारी, चार्टर्ड अकौटंटस श्रीरामपुर व अंतर्गत लेखापरिक्षक रुग्णालये श्री.सुरेश डौले ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस राहुरी यांना पाठविण्यात आल्या होत्या.

त्यास अनुसरून सदर अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल, उपरोक्त चारही सस्थांच्या मार्गदर्शनानुसार तयार करण्यात आलेला असून, अवलोकनार्थ सादर करण्यात आलेला आहे. तरी सदर दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेवून त्यास मान्यता मिळणेकामी, मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.७४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त सन २०१०-११ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण दोष-दुरुस्ती अहवालाची नोंद घेण्यात आली. सदरचा दोष दुरुस्ती अहवाल शासनास पाठविण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.२२ सौ.अनारकला रंगनाथ गांगुर्डे यांचा मौजे देवगांव येथील गट नंबर ७२ पैकी मधील क्षेत्र ४० आर बक्षिसपत्राने स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** सौ. अनारकला रंगनाथ गांगुर्डे, राहणार देवगांव, तालुका निफाड, जिल्हा नाशिक यांनी दिनांक ०९ ऑगष्ट, २०१२ रोजीचे अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केली आहे :

*.. .. मी सौ. अनारकला रंगनाथ गांगुर्डे, रा. देवगांव, ता. निफाड, जि. नाशिक येथील रहिवाशी असुन माझ्या स्वतःच्या मालकीची देवगाव (फाटा) सर्व्हे नंबर ७२ मधील जमीन ४० आर गुंठे आहे. ती मला श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांना दान दयावयाची आहे. ती मी स्वखुशीने देत आहे.*

अर्जदार सौ. गांगुर्डे यांनी त्यांचे उपरोक्त अर्जासोबत, मा. उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड यांचेकडेस दि. ०९ जुलै, २०१२ व दि. १९ जुलै, २०१२ रोजी मिळकत/ जमीन हस्तांतरीत करणेसाठी परवानगी मिळणेसाठी केलेल्या विनंती अर्जाच्या छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.

अर्जदार सौ. गांगुर्डे यांनी मा. उपविभागीय अधिकारी, निफाड यांचेकडेस सादर केलेल्या उपरोक्त विनंती अर्जामध्ये खालीलप्रमाणे नमुद केले आहे :

*.. .. मौजे देवगांव येथील गट नंबर ७२ एकूण क्षेत्र ०२ हे ०६ आर आहे. त्यापैकी क्षेत्र ४० आर श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांना विनामुल्य बक्षिस देण्याचे ठरविले असून, सदर मिळकत ही कुळ कायदा कलम ४३ अन्वये नियंत्रित सत्ता प्रकारची असल्याने सदर मिळकत हस्तांतरणास परवानगी मिळावी.*

तसेच, सौ.गांगुर्डे यांनी त्यांचे विनंती अर्जासोबत मौजे देवगांव, तालुका निफाड, जिल्हा नाशिक येथील गट नंबर ७२ चा दिनांक २४ जुलै, २०१२ रोजीचा संगणकीकृत ७/१२ उतारा जोडला असून, त्याचे अवलोकन केले असतां त्यामध्ये खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे :

| भोगवटादाराचे नांव | गावाचे नांव / गट नंबर | एकूण क्षेत्र व आकार | इतर अधिकार व हक्कातील नोंदी |
|---|---|---|---|
| **अनारकला रंगनाथ गांगुर्डे** | **देवगांव / ७२** | **०२ हे ०६ आर ०० चौमी** आकार **रु.०४=८७ पैसे** | ०१. **कुळ कायदा कलम ४३ च्या शर्तीस पात्र.**<br>०२. **कु. का. क. ४३ प्रमाणे नि. स. प्र.**<br>०३. देवगांव वि.का.स.सो. इकरार पत्र व कर्जबोजा.<br>०४. **रो.ह.यो.ज. अंतर्गत विहीर** |

उपरोक्त ७/१२ उताऱ्यात, भूधारणा प्रकार भोगवटादार वर्ग - २ या पध्दतीचा असून, सन २०१०-११ चे पीकपहाणीस, टोमॅटो, कांदारोप, सोयाबीन, नवीन ऊस अशा पिकांच्या नोंदी आहेत तसेच विहीर पाण्याची सोय असल्याने, सदरची जमीन बागायत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

**(ब) जमिनीची भौगोलिक स्थिती व उपयुक्ता :**

उपरोक्त जमीन ही नाशिक जिल्हयातील, निफाड तालुक्यात मौजे देवगांव येथे असून, सावळीविहीर - भरुच रस्त्यावर, (सावळीविहीर - कोळपेवाडीमार्गे लासलगांव - निफाड या मार्गावर) मौजे शिर्डी पासून अंदाजे ६०-६५ किलोमीटर अंतरावर आहे.

सदर जमीन बक्षिसपत्राने मिळाल्यास, तिचा वापर या मार्गाने येणाऱ्या पदयात्री साईभक्तांसाठी पालखी थांबा (पदयात्री निवासस्थान) उभारणे अथवा इतर आवश्यक त्या विकास प्रकल्पासाठी करता येईल किंवा याबाबतचा निर्णय जमीन प्रत्यक्षात ताब्यात मिळाल्यानंतर परिस्थितीनुरुप नियोजन करुन घेता येईल.

**(क) प्रस्तावित जमीन बक्षीसपत्राने स्वीकारणेबाबत येणाऱ्या अडचणी व त्याचे निराकरण :**

**०१.** मौजे देवगांव हद्दीतील गट नंबर ७२ मधील उपरोक्त प्रस्तावित बक्षीसपत्राने घ्यावयाची जमीन कुळ कायदा कलम ४३ च्या शर्तीस पात्र असून, नियंत्रित सत्ता प्रकारातील आहे.

- सदर जमीन ही अर्जदारांस अथवा ते ज्यांचे वारस आहेत, त्यांना संरक्षित कुळ असल्याने कुळ कायद्यान्वये मिळालेली आहे. त्यामुळे प्रस्तुत जमिनीपैकी ०० हे ४० आर क्षेत्र संस्थानला

बक्षीसपत्राने हस्तांतरीत करणेबाबत अर्जदारांनी यापुर्वीच मा. उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड यांचेकडेस अर्ज केलेला आहे. सदर अर्जावर मा. उपविभागीय अधिकारी, निफाड हे त्यांचे अखत्यारीत परवानगी देऊ शकतात.

**०२.** प्रस्तावित जमिनीच्या ७/१२ उताऱ्यात, इतर अधिकार व हक्काचे रकान्यात, कुळ कायदा कलम ४३ प्रमाणे नियंत्रित सत्ता प्रकार चलकिर्तीनाथ पाटील अ. पा.क. नाथा गणपत हप्ते घेणार ४१८२ हप्ते १२ अशी नोंद आहे.

- मा. उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड हे सदरचे हप्ते कुळाने भरले किंवा नाहीत तसेच ४३ एफ चा दाखला दिला किंवा नाही याची खात्री करुनच जमीन हस्तांतरणास परवानगी देणार आहेत.

**०३.** अर्जदार (जमीनमालक) यांनी देवगांव वि. का. स. सोसायटीचे वेळोवेळी कर्ज घेतलेले आहे.

- मा. उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड हे जमीन हस्तांतरणास परवानगी देणेपुर्वी देवगांव वि. का. स. सोसायटीच्या संमतीची / ना हरकत पत्राची मागणी करतीलच. तथापि, मत्यांनी ही बाब विचारात न घेता परवानगी दिली तर संस्थान बक्षीसपत्र करतांना सदर सोसायटीची संमती / ना हरकत घेणे आवश्यक व क्रमप्राप्त राहील.

**०४.** प्रस्तावित जमिनीचे ७/१२ उताऱ्यात, पीक पहाणीस खुद्द अशी नोंद आहे, त्यामुळे सदरची जमीन वाद रहीत असून, अर्जदार यांचे वहिवाटीस व ताब्यात आहे असे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

**०५.** प्रस्तावित जमीन बक्षीसपत्राने घ्यावयाचा निर्णय झाल्यास, उपरोक्त बाबींव्यतिरिक्त इतर कायदेशीर तरतुदी व बाबींबाबत संस्थान वकिलांचा अभिप्राय घेऊन त्यानुसार कार्यवाही पूर्ण करता येईल.

**(क)** उपरोक्त विवेचनास अनुसरुन, सौ. अनारकला रंगनाथ गांगुर्डे, रा. देवगांव यांनी बक्षीसपत्राने देऊ केलेली मौजे देवगांव, तालुका निफाड, जिल्हा नाशिक हद्दीतील गट नंबर ७२ पैकी मधील क्षेत्र ४० आर ही जमीन बक्षीसपत्राने दान म्हणून स्वीकारण्यात यावी किंवा कसे तसेच सदरची जमीन बक्षीसपत्राने स्वीकारण्याचा निर्णय झाल्यास, जमीन हस्तांतरणासाठी संबंधित शासकीय विभागांकडे पाठपुरावा करणे, याकामी संस्थान वकिलांचा अभिप्राय घेणे, विहीत पध्दतीने कायदेशीर बाबींची पूर्तता करुन, बक्षिसपत्राची / दानपत्राची कार्यवाही पूर्ण करणे, बक्षीसपत्रासाठी आवश्यक असणारे मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, शासकीय जमीन मोजणी शुल्क भरणे, वकील फी आदा करणे आदि अनुषंगिक कामांसाठी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेकामी मा. त्रिसदस्यीय समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.७४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सौ.अनारकला रंगनाथ गांगुर्डे यांची मौजे देवगांव येथील गट नंबर ७२ पैकी क्षेत्र ४० आर जमीन बक्षिसपत्राने स्विकारणेबाबत केलेली विनंती अमान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२३ जुने प्रसादालय परिसरातील पार्किंगच्या पूर्व बाजुकडील भागाचे डांबरीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** जुने प्रसादालय परिसरातील पार्कींगचे पूर्व भागातील व एल पी जी यार्डचे पश्चिम बाजूकडील भिंतीलगत आरोग्य विभागामार्फत परिसरात स्वच्छतेमधून निघालेला कचरा साठविण्यात येत होता. तसेच बांधकाम विभागाचे दैनंदिन मेन्टेनन्स कामाकरीता लागणारे विट वाळू व खडी इ. मटेरीअल एका बाजुला साठविणेत येत होते. सदर ठिकाणी इतर विभागांचे निघालेले निरुपयोगी मटेरीअल सुध्दा टाकले जात होते. सदरचे जागेत अंधार असल्यामुळे भक्त व इतर व्यक्ती प्रातर्विधी करत असत त्यामुळे सदरहू भागात दुर्गंधी पसरुन उपद्रव निर्माण झालेला होता.

दि.०१/०८/२०१२ रोजी मा. अध्यक्ष सो। यांनी पाहणी दरम्यान सदर जागेतील कचरा व इतर मटेरीअल उचलून परिसर स्वच्छ राहील याकामी कार्यवाही करणेकामी सूचना केल्या. त्यानुसार सदरचे मटेरीअल ठेकेदार जगताप कन्स्ट्रक्शन, कोल्हार यांचेमार्फत जे.सी.बी. चे साहाय्याने उचलून डंपरव्दारे ०६ कि.मी. पर्यंत वहातूक करुन टाकणेत आले आहे.

अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग यांनी पार्किंगचे पूर्व भागातील डांबरीकरण करणे व त्या जागेचा कर्मचाऱ्यांच्या दुचाकी वाहनांचे पार्किंग तळासाठी वापर करणेबाबत दि.०४/०८/२०१२ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

सदरचे भागात डांबरीकरण झालेले आहे. पंरतू भिंतीलगतचे भागात फायर फायटींगचे पाईप लाईनकरीता खोदकाम झालेले असल्याने तो भाग खराब झालेला आहे. त्याभागात खोदकाम करुन मजबुतीकरण करावे लागेल. भिंतीलगतची ३ मी. रुंदीचे व ३० मी. लांबीचे भागात खोदाकाम करुन डब्ल्यु बी.एम. एक थर, बी.बी. एमचा एक थर त्यानंतर संपूर्ण भागाचे एस.डी.बी.सी. मध्ये एक थराचे डांबरीकरण करावे लागेल याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३०० एम एम खोल सेमी खोदकाम करणे | ३०.०० | घन मी. | १९६/- | ५८८०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | १०० एम एम जाडीचे डब्ल्यु बी.एम. करणे | ११.०० | घन मी. | ८८८/- | ९७६८/- |
| ०३ | ७५ एम एम जाडीचे बी.बी.एम. करणे | ०८ | घन मी. | २४२१/- | १९३६८/- |
| ०४ | २५ एम एम जाडीचे एस.डी.बी.सी. करणे | ६६५ | चौ.मी. | १९१/- | १२७०१५/- |
| | एकुण रुपये | | | | १,६२,०३१/- |
| | अधिक ५% कन्टेजन्सिज | | | | ८१०१/- |
| | **एकुण रुपये** | | | | **१,७०,१३२/-** |

उपरोक्त प्रमाणे जुने प्रसादालयाचे पार्किंगचे मोकळ्या जागेत डांबरीकरण करणेकामी अंदाजे रक्कम रु.१,७०,१३२/- मात्र खर्च येईल. सदरचे काम मे. जगताप कन्स्ट्रक्शन, कोल्हार यांचेकडून मंजूर दरात करुन घेता येईल.

तरी सदरचे काम ठेकेदार मे. जगताप कन्स्ट्रक्शन कोल्हार यांचेमार्फत करणेकामी मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुने प्रसादालयाचे पार्किंगचे पूर्व बाजूकडील मोकळ्या जागेत डांबरीकरण करणेचे काम मे. जगताप कन्स्ट्रक्शन, कोल्हार यांचेकडून मंजूर दरात करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.१,७०,१३२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२४** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील दुसऱ्या टप्प्यामध्ये २०० खोल्यांचे नुतनीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत साईभक्तांचे निवास व्यवस्थेसाठी सन १९९४-९५ मध्ये श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) इमारत उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. सदर इमारतीतील खोल्या पूर्ण क्षमतेने गेल्या १७ वर्षा पासून वापरण्यात येत आहे. सन १९९९-२००० मध्ये सदर इमारतीचे खोल्यांमधील टॉयलेट दुरुस्तीचे काम करुन घेणेत आले आहे. तसेच या इमारतीस सन २००३-०४ मध्ये आतिल बाजूने रंगकाम करणेत आले आहे. सध्या सदरहू इमारत साईभक्तांना निवासासाठी अत्यंत उपयुक्त व सोयीची असल्याने या ठिकाणी खोल्या नेहमीच पूर्ण क्षमतेने वापरात असतात. सततच्या वापरामुळे या इमारतीतील खोल्यांचा रंग, प्रसाधनगृहाच्या टाईल्स्, एम. एस. लोखंडी फ्रेम, दरवाजे, फरशी इत्यादि बाबी खराब झालेल्या आहेत.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७ नोव्हेंबर, २००९ मधील निर्णय क्र. ८०५ अन्वये सदर इमारतीमधील पहिल्या टप्प्यातील १०० खोल्यांचे नुतनिकरण करण्यात आले आहे. याकरीता आर्किटेक्ट अरविंद वैद्य ॲण्ड असोशिएटस्, संगमनेर यांची नेमणूक करण्यात आली होती. ठेकेदार मे.ओरीयंटल कन्स्ट्रक्शन कंपनी, नाशिक यांचेमार्फत सदर काम पुर्ण झालेले आहे.

तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९.०९.२००९ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ७५० अन्वये सदर इमारतीमधील १०० खोल्यांचे खात्यामार्फत दुरुस्ती करणेकामी येणारे अंदाजे रु. १५,१९,०२७/- मात्रचे खर्चास व याकामी आवश्यक असणारे मटेरियल व मजूरी दराची कामे विहित पध्दतीने कोटेशन / दरपत्रके मागवून करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार १०० खोल्यांचे दुरुस्ती व देखभालीची कामे विभागामार्फत पूर्ण करणेत आले असून, त्यापैकी ७५ खोल्यांचे रंगकाम पूर्ण करुन पुढील २५ खोल्यांचे रंगकाम हाती घेण्यात आले आहे.

साई आश्रम प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून, लवकरच सदर खोल्या साईभक्तांचे निवास व्यवस्थेसाठी उपलब्ध होणार असल्याने, दुसऱ्या टप्प्यांतर्गत २०० खोल्यांचे नुतनिकरणाचे काम हाती घेता येईल. सदरचे नुतनिकरणाचे कामांमध्ये प्रामुख्याने खालील कामांचा समावेश करता येईल. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे:

- दरवाजे फ्रेम शटरसह बदलणे व दुरुस्ती करणे.
- रंगकाम करणे
- टाईल्स् बदलणे.
- प्लास्टर करणे.
- संडास भांडे बदलणे, पी. व्हि. सी. पाईप बदलणे व इतर प्लंबिंग कामे
- खोल्यांचे आतिल भिंतीना ६ फुट उंचीपर्यन्त डॅडो बसविणे.
- पॅसेजमध्ये ६ फुट उंची पर्यन्त टाईल्स बसविणे.
- डक्टचे टर्बो व्हेन्टिलेटर वापरुन व्हेंन्टीलेशन करणे व इतर अनुषंगीक कामे करणे.
- विद्युतीकरण करणे.

तरी वरिल प्रमाणे २०० खोल्यांचे नुतनिकरणाचे कामांसाठी इकडील विभागामार्फत सन २०११-१२ चे जिल्हा दरसूची (DSR) नुसार रू.४,१०,३२,६४७/- मात्र खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

सदरचे नुतनीकरण कामासाठी आर्किटेक्ट डहाणुकर असोशिएटस्, मुंबई यांनी सेवा देणेची तयारी दर्शविलेली असल्याने, त्यांची याकामी नियुक्ती करुन, त्यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक, निविदा फॉर्म व बिले प्रमाणित करुन घेता येईल. तरी प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील दुसऱ्या टप्प्यामध्ये २०० खोल्यांचे नुतनीकरण करणेचे कामासाठी आर्किटेक्ट डहाणुकर असोशिएटस्, मुंबई यांनी सेवा देणेची तयारी दर्शविलेली असल्याने, त्यांची याकामी नियुक्ती करुन, त्यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक, निविदा फॉर्म व बिले प्रमाणित करुन घेणेस तसेच सदरकामी येणाऱ्या रक्कम रू.४,१०,३२,६४७/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२५ संस्थानमार्फत चालू असलेल्या बांधकामांना मुदतवाढ मागणी प्रस्तावांबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ) साईनगर कर्मचारी निवासस्थाने इमारतींचे भोवती पेव्हिंग ब्लॉक बसविणेबाबत :** संस्थानचे साईनगर परिसरातील कर्मचारी निवासस्थाने इमारतींचे भोवती पेव्हिंग ब्लॉक बसविणेचे काम रु. १९,७६,२०३/- मात्र रकमेस ठेकेदार मे. बनकर पाटील ॲण्ड कंपनी, श्रीरामपूर यांना देणेत आले असून, सदर कामाची मुदत दिनांक ०७ ऑगस्ट, २०१२ अखेर ०६ महिने होती. ठेकेदार यांनी साईचिंतन, जनरेटर रुम, समर्पण व साईनगर इमारतींचे परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणेचे काम पूर्ण केले आहे. साईध्यान क्र. १ व ०२ इमारतींचे समोरील भागातील काम प्रगतीपथावर आहे.

ठेकेदार यांनी दिनांक ०६ ऑगस्ट, २०१२ रोजीचे पत्रान्वये, सदरचे काम खालील कारणांमुळे मुदतीत पूर्ण करणे शक्य झाले नसल्याचे कळविले आहे.

१. सदर इमारतींचे ड्रेनेज लाईनचे जुने चेंबर्स दुरुस्ती करुन ब्लॉक लेव्हलपर्यन्त करणे.
२. सोलींगसाठी आवश्यक असणारा दगड खाणीतून मिळणेस उशीर लागला.
३. दरम्यानचे काळात सिमेंटचे दर अचानक वाढल्यामुळे त्याचा परिमाण पेव्हिंग ब्लॉकचे किंमतीवर झाल्यामुळे पेव्हिंग ब्लॉक वेळेत उपलब्ध झाले नाही.

सदरचे काम पूर्ण करणेसाठी ठेकेदार यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१२ पर्यन्त मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे ठेकेदार यांनी केलेले विनंती वरुन तसेच प्रत्यक्ष काम करतांना आलेल्या अडचणींचा विचार करुन ठेकेदार मे. बनकर पाटील ॲण्ड कंपनी, श्रीरामपूर यांना दिनांक ३० सप्टेंबर, २०१२ पर्यन्त मुदतवाढ देणेस हरकत नाही. असे मत आहे.

**(ब) श्री साईनाथ रुग्णालय येथे नातेवाईक शेड उभारणे व पेव्हिंग ब्लॉक बसविणे. :** श्री साईनाथ रुग्णालय इमारती समोर रुग्णालयामध्ये येणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांचे सोयीसाठी शेड उभारणे व पार्किंगमध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणेचे काम रु. ४७,६९,५६०/- मात्र रकमेचे काम ठेकेदार आर. डी. सोनवाणे, सटाणा यांना देणेत आले असून, सदर कामाची मुदत दिनांक १७ जून, २०१२ अखेर पर्यन्त सहा महिने होती. सदरचे मुदतीत ठेकेदार यांनी शेडचे काम, सोलींग, पी. सी. सी.इ. कामे पूर्ण केली असून, फ्लोरींग व पेव्हिंग ब्लॉक बसविणेचे काम ठेकेदार सुरु करत आहेत.

ठेकेदार यांनी दिनांक १५ ऑगस्ट, २०१२ रोजीचे पत्रान्वये, सदरचे काम खालील कारणांमुळे मुदतीत पूर्ण करणे शक्य झाले नसल्याचे कळविले आहे.

१. टाटा कंपनीचे स्ट्रक्चरल स्ट्रील ऑर्डर दिल्यानंतर सुमारे १५ ते २५ दिवसानंतर उपलब्ध झाले.
२. सदर कामास मशिनरी वापरणे शक्य नसल्याने, मनुष्यबळ वापरुन करावे लागले.
३. तांत्रीकदृष्ट्या सक्षम मनुष्यबळ लवकर उपलब्ध झाले नाही.

सदरचे काम पूर्ण करणेसाठी ठेकेदार यांनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१२ पर्यन्त मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.

उपरोक्तप्रमाणे ठेकेदार यांनी केलेले विनंती वरुन तसेच प्रत्यक्ष काम करतांना आलेल्या अडचणींचा विचार करुन ठेकेदार आर. डी. सोनवणे, सटाणा यांना दिनांक ३० सप्टेंबर, २०१२ पर्यन्त मुदतवाढ देणेस हरकत नाही. असे मत आहे.

**क) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथील १०० खोल्यांचे नूतनीकरण व दुरुस्ती करणेकामाचे ठेकेदार ओरिएंटल कन्स्ट्रक्शन कंपनी, नाशिक यांचे मूदतवाढ मागणीबाबत..**

संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे १०० खोल्यांचे दुरुस्ती व नूतनीकरणाचे काम ठेकेदार मे. ओरिएंटल कन्स्ट्रक्शन कंपनी, नाशिक यांना बहाल करण्यात आले असून, ठेकेदार यांचेशी झालेल्या करारनाम्यानुसार सदर कामाची मूदत दहा महिने ते दि.०३ नोव्हेंबर, २०१० अखेर होती. ठेकेदार यांना दि.१३ फेब्रुवारी, २०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील नि.क्र.२९अन्वये दि.३१ मे, २०११ अखेर व दि.२८ ऑगस्ट, २०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रमांक ६२६ अन्वये दिनांक ३१ ऑक्टोबर, २०११ पर्यन्त मूदतवाढ देण्यात आली होती. सदरचे मुदतीत ठेकेदार यांनी १०० खोल्यांपैकी ९८ खोल्यांचे काम पूर्ण केले आहे.

उर्वरीत दोन खोल्यांचे कामासाठी ठेकेदार यांनी त्यांचेकडील दिनांक २५ जुलै, २०१२ रोजीचे पत्रान्वये, कामामध्ये आलेल्या खालील अडचणी नमूद केल्या आहे.

१. सदर खोल्यांचे कामासाठी निवडलेल्या रुम डॅडो टाईल्स मिळणेस अडचणी निर्माण झाल्या.

२. संडास व बाथरुमच्या टाईल्स् (जॉनसन) कंपनीकडून वेळेवर उपलब्ध झाल्या नाही.

३. कामासाठी आवश्यक असणाऱ्या वाळूचा तुटवडा निर्माण झाला.

४. कुशल व अकुशल कामगार वेळेवर उपलब्ध झाले नाहीत.

वरिलप्रमाणे ठेकेदार यांना आलेल्या अडचणींचे निराकरण करुन त्यांनी सदरचे काम दि. २० ऑगस्ट, २०१२ रोजी पूर्ण केले असून, सदरचे कामासाठी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.

ठेकेदार ओरिएंटल कन्स्ट्रक्शन कं., नाशिक यांचे उपरोक्त अडचणींचा विचारकरता त्यांना दि. २० ऑगस्ट, २०१२ अखेर मूदतवाढ देणेस हरकत नाही असे मत आहे.

**ड) साई आश्रम प्रकल्पाचे परिसर विकास (Civil Work, External Plumbing, Road, Parking, Pathways, D. G. Room & Electrification) कामाचे ठेकेदार शापुरजी पालोनजी ॲण्ड कं.,लि; यांचे मुदतवाढ मागणीबाबत ...**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम सध्या अंतिम टप्प्यात आहे. सदर प्रकल्पातील परिसर विकासाचे काम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे. संस्थानमार्फत साई आश्रम प्रकल्पाचे परिसर विकासाचे कामांसाठी ठेकेदार मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कं. लि; नाशिक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार ठेकेदार यांचेमार्फत सदर कामे पूर्णत्वाचे टप्प्यात आहेत. सदर प्रकल्पाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**A) साईआश्रम परिसर विकास कामांचा तपशिल :-** (रस्ते, कंपाऊंड वॉल, पाथवे, परिसर विद्युतीकरण, डी.जी. रुम, ड्रेनेज लाईन, स्टॉर्म वॉटर लाईन, प्लबींग)**:-**

| | |
|---|---|
| Name of Work: - | Construction of External Services (Civil Work, Roads, Pathways, Plumbing and Electrification) for Sai Ashram Project Package - I in S. No. 107, 108, 109P at Shirdi and Package - II in G. No. 172 at Nimgaon- Korhale, Tal - Rahata. |
| Contractor: - | Shapoorji Pallonji & Co. Ltd., Nashik |
| Architects: - | Ar. D. O. Nikam, Pune. |
| Project Management Consultants:- | Dorsch Consult (India) Pvt. Ltd; Mumbai. |
| No. & Date of Resolution awarding the work: - | No.346, dt.05/04/2009. |
| Work Order No. & Date: - | No.SSST/WS- CONST/3402/2009, dt.25/03/2009. |
| Contract Value: - | Civil Work - Rs.19,46,19,506.00<br>Electrical Work - Rs.01,66,78,438.00<br>**Total - Rs.21,12,97,944/-.** |
| Date of Commencement: - | 9th April 2009. |
| Time for Completion: - | Ten calendar months. |
| Scheduled date of completion:- | 9th February 2010. |
| Extended date of completion:- | First Extension upto 31st Dec.2010.<br>Second Extension upto 31st March 2011.<br>Third Extension upto 30th November 2011.<br>Fourth Extension upto 31st March 2012. |

ठेकेदार यांना यापुर्वी चार वेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यापैकी शेवटी दिलेली वाढीव मूदत दि.31/03/2012 रोजी संपुष्टात आलेली आहे. ठेकेदार यांनी साईटवर लॅण्डस्केपिंग वगळता इतर कामे जवळजवळ पूर्ण केलेली आहेत. लॅण्डस्केपिंगचे सुमारे 15 ते 20% काम अपूर्ण आहे.

तसेच ठेकेदार यांचे साईटवर खालीलप्रमाणे कामे प्रगतीपथावर आहेत.

१. कम्पाउंड वॉल बारबेड वायर फेन्सींग व प्लास्टर रिपेरिंग करणे

२. पार्किंग करीता पेव्हिंग ब्लॉक बसविणे, रोडचे उर्वरित कॉक्रीटिंग करणे

३. प्लिंथ प्रोटेक्शन व पाथवेचे पेव्हर ब्लॉक बसविणे.

४. आर ब्लॉकची ड्रेनेज लाईन टाकणे, A८ व A१२ ब्लॉकचे चेंबर कनेक्शन करणे.

५. इमारतीचे शाफ्ट मधिल रफ शहाबाद फ्लोरींगचे काम अंतिम टप्प्यात आहे.

६. लॅण्डस्केपींग सिव्हिल वर्क करणे

७. वॉटर बॉडीचे सिव्हील वर्क करणे.इत्यादी.

ठेकेदार शापुरजी पालोनजी, नाशिक यांनी दि.25/08/2012 रोजीचे पत्रान्वये सदरहू कामे करणेसाठी झालेल्या विलंबास खालीलप्रमाणे कारणे नमूद केलेली आहेत.

१. साई आश्रम भाग-I येथे शाळेचे कम्पाउंडचे लगत पार्किंगचे ठिकाणी पार्श्वनाथ डेव्हलपर्स यांची लेबर कॉलनी, टॉयलेट व इतर अनावश्यक मटेरीअल असले कारणाने, कामास अडचणी आल्या आहेत.
२. साई आश्रम भाग-I व II मधिल R- Block मध्ये चेकिंग चेकआउट काउंटरचे वाढिव काम करावे लागले त्यामुळे इतर कामास विलंब झाला आहे.
३. साई आश्रम भाग- II मधिल R- Block समोर पार्श्वनाथ डेव्हलपर्स यांचे अनावश्यक मटेरिअल साठविलेली असल्याने कामास अडचणी आल्या.
४. साई आश्रम भाग-I व II मधिल लॅडस्केपींगचे कामामध्ये वाढ झाली.
५. शिर्डी मध्ये बऱ्याच प्रमाणात बांधकामे सुरु असल्याने कुशल व अकुशल कारागीरांचा तुटवडा नेहमीच भासत आहे.

उपरोक्त बाबींमुळे वेळेत काम पूर्ण करणे शक्य झाले नाही. तरी आम्हाला दि.१५/१०/२०१२ अखेर मूदतवाढ मिळावी अशी विनंती मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कं., लि., नाशिक यांनी केली आहे.

प्रकल्पाचे व्यवस्थापन सल्लागार मे. डॉर्श कन्सल्ट (इं) प्रा. लि., मुंबई यांनी त्यांचे दि.२५/०८/२०१२ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांनी नमूद केलेल्या उपरोक्त बाबींचा विचार करता मे.शापुरजी पालोनजी ॲण्ड कं., लि., नाशिक यांना सदर कामासाठी दि.३०/०९/२०१२ पर्यंत मूदतवाढ देणेस हरकत नाही असे कळविले आहे.

तरी सल्लागार यांचे शिफारशीनुसार ठेकेदार मे. शापुरजी पालोनजी ॲण्ड कं. लि; नाशिक यांना काम पूर्ण करणेसाठी दि.३०/०९/२०१२ अखेर मूदतवाढ देणेस हरकत नाही असे मत आहे.

**इ) मौजे निमगांव कोऱ्हाळे ता.राहाता येथील गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र. ११ वरुन रस्ता विकसीत करणे कामाचे ठेकेदार मे. एस. के.येवले ॲण्ड कं., संगमनेर यांचे मुदतवाढ मागणीबाबत.**

मौजे निमगांव कोऱ्हाळे, ता.राहाता, जि.अहमदनगर येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची ४५.६४ आर जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीला भुसंपादनाने मिळालेली आहे. सदर जमिनीकडे जाण्यासाठी प्रशस्त व सोयीचा रस्ता नव्हता व सदर परिसरातील गट नं. १७२ मध्ये साई आश्रम प्रकल्प भाग २ चे बांधकाम प्रगतीपथावर आहे. गट नं. १९८, १९९, २०० व २०१ मधील सुमारे २० एकर जामिनीमध्ये साईगार्डन प्रकल्पाचे काम प्रस्तावित आहे. तसेच गट नं. १९५ मध्ये संस्थानचे हेलीपॅड आहे. त्यामुळे सदर चारी बंदिस्त करुन चारी वरुन रस्ता विकसित करणेस मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुसार मान्यता मिळालेली आहे.

सदरहु कामी मा. व्यवस्थापन समितीचे दि. २७/०२/२०११ रोजीचे सभेतील नि.क्र. १७६ अन्वये ठेकेदार मे.एस. के. येवले ॲण्ड कं., संगमनेर यांना त्यांची निम्नतम दराची निविदा स्विकारुन जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/७४७/ २०११, दि. ०४/०५/२०११ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. उपरोक्त प्रकल्पाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**Details of the Project**

| | |
|---|---|
| Name of work: - | Construction of Helipad Link Road on Distributory No.11 of GRBC, Nimgaon Korhale, Shirdi. |
| Contractor: - | M/s S. K. Yewale & Co., Sangamner |
| Project Management Consultant:- | Unison Project Management Pvt. Ltd. |
| Resoluton no. & date: - | No.176, Management Committee dt.27/02/2011. |
| Work order no. & date: - | No.SSST/Const/747/2011, dt.04/05/2011. |
| Contract Value: - | Rs.6,60,81,150/- |
| Date of Commencement: - | 04 May 2010. |
| Time for Completion: - | Nine calendar months. |
| Scheduled date of completion: - | 03 February 2011. |
| Actual date of completion: - | --- |
| Value of work for interim certificate | --- |

| | |
|---|---|
| EMD deposited: - | Rs.7,10,600/- by D.D. no.984710, dt. 19/01/2011, drawn on I.D.B.I. bank , Shirdi. |
| Performance Security: - | IDBI Bank Ltd. Pune, Bank Guarantee No. :110390IBGP00092, Dated: 31/03/2011 Amounting Rs. 33,04,058/- |
| Retention Money: - | Total Retention money shall be 10% of each bill subject to a maximum of 5% of FINAL contract price. |

ठेकेदार यांना काम पुर्ण करणेसाठी 09 महिन्याचा कालावधी देणेत आलेला होता. त्यानुसार ठेकेदार यांची काम पुर्ण करण्याची मुदत दि. 03/02/2012 रोजी संपली आहे. या कालावधीत ठेकेदार यांनी खालील कामे पूर्ण केली आहेत.

| Sr. No | Particulars | Total length | Comleted length | % Completion |
|---|---|---|---|---|
| 1 | Utility relocation | Electirc poles-2 &Water pipes-3 nos | | Shifted |
| 2 | Excavation | | | |
| a | Roadway (LHS) | 2000 m | 2000 m | 100% |
| b | Roadway (RHS) | 2000 m | 1510 m | 75.50% |
| c | Chari bed | 2000 m | 2000 m | 100% |
| d | UCR wall (LHS) | 2000 m | 2000 m | 100% |
| e | UCR wall (RHS) | 2000 m | 1510 m | 75.50% |
| 3 | PCC (M10) Grade (for Pipe Laying) | 2000 m | 2000 m | 100% |
| 4 | PCC (M10) Grade (for UCR wall)<br>LHS<br>RHS | <br>2000 M<br>2000 m | <br>2000 M<br>1510m | <br>100%<br>75.5% |
| 5 | Laying of Pipe | 2000 m | 2000 m | 100% |
| 6 | Embankment with 8% CBR | | | |
| a | LHS (Completed) | 2000 m | 1650 m | 82.50% |
| b | RHS (In progress) | 2000 m | 1500 m | 75% |
| 7 | GSB (LHS) ( in progress) | 2000 m | 1510 m | 75.5% |
| 8 | Chamber Construction | | | |
| a | Uo tp 1.2m ht | 64 nos | 64 Nos | 100% |
| b | Up to RTL | | 61 Nos | 95.31% |
| 9 | WBM (LHS) | 2000 m | 1500 | 75% |
| 10 | BBM, BM & BC | 2000 m | 0 | 0% |
| 11 | Road furniture works | 2000 m | 0 | 0% |

ठेकेदार यांनी त्यांचे दि.३/०८/२०१२ रोजीचे पत्राने कामाचा कालावधीत चारीच्या पाण्याचे रोटेशन मुळे एकुण ९६ दिवसांचा विलंब झाला असल्याने काम पुर्ण करण्यास विलंब झाल्याचे कळविले आहे. तसेच सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु झाल्याने डांबरीकरणाचे काम करता येणार नसल्याने दि.३०/१०/२०१२ अखेर डांबरीकरणासाठी व रोडची इतर कामे उदा. स्टोन, स्ट्रीट लाईट, प्लांटेशन, पेव्हींग ब्लॉक, रंगकाम व इतर फिनीशिंगचे कामे करणेसाठी दि.३१/०१२/२०१२ पर्यंत मूदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे.

सदर रस्त्याचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि., पुणे यांनी त्यांचे दि.१७/०८/२०१२ रोजीचे पत्राने ठेकेदार यांची मुदतवाढीची मागणी रास्त असून रस्त्याचे एकूण कामासाठी त्यांना दि.३१/१२/२०१२ अखेर मूदतवाढ देणेस शिफारस केली आहे.

तरी ठेकेदार मे.एस. के. येवले ॲण्ड कं., संगमनेर यांना गोदावरी उजवा तट कालवा चारी क्र. ११ बंदिस्त करुन त्यावर रस्ता विकसीत करणेचे कामास दि.३१/१२/२०१२ अखेर मुदतवाढ देणेस हरकत नाही असे मत आहे.

**फ) <u>शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना - संस्थान निधीतुन प्रथम प्राधान्यगटातील रस्ते विकसित करणेकामी ठेकेदार रोमन टारमॅट लि. यांचे मुदतवाढीबाबत</u>**

शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील अंदाजे रुपये ८८ कोटी मात्र इतक्या रकमेचे ११ रस्ते विकसीत करणेचे काम संस्थान व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचेमार्फत सुरु आहे. सदर कामापैकी रु. २८ कोटी रकमेस शासन मान्यता प्राप्त आहे. रस्ते विकास महामंडळ यांचेमार्फतचे २.५६ कि. मी. लांबीचे रस्त्यांचे काम किरकोळ बाबी वगळता पूर्ण करण्यात आले आहे.

सदरहू प्रकल्पातील ११ रस्त्यांपैकी सहा रस्त्यांचे ७.१७ कि.मी. लांबीचे रस्ते विकसित करणे प्रकल्पाचे काम ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि.यांचेमार्फत प्रगतीपथावर आहे. ठेकेदार यांना देण्यात आलेल्या सहा रस्त्यांपैकी रस्ता क्र.०३, ०६, ०७ व ०८ या चार ३.३३ कि. मी. लांबीचे रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असुन रस्ता क्र.०५ व ०९ या २.३४ कि.मी. लांबीचे वळण रस्त्यांचे कामास ठेकेदार

यांनी अद्याप सुरुवात केलेली नाही व ९अ हा १.५० कि.मी. वळणरस्ता नगरपंचायतीने काम करणेसाठी हस्तांतरीत केलेला नाही. सदरचे कामांबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| ०१ | बांधकाम ठेकेदार | मे.रोमन टारमॅट लि.,नवी मुंबई |
| ०२ | मंजूर निविदा रक्कम | रु. ३३,८३,२६,१९९/- |
| ०३ | निविदा टक्केवारी | १०% कमी |
| ०४ | कार्यादेश क्रमांक / दिनांक | जा.क्र ८८३७ दि.०६/०८/२०१० |
| ०५ | कामाची मुदत | १५ महिने - ०५ नोव्हेंबर २०११ अखेर |
| ०६ | प्रथम मुदतवाढ | मार्च २०१२ अखेर (मा.व्य.स.सभा निर्णय क्र.१७३(०७) दि. १९ फेब्रुवारी, २०१२ अन्वये) |
| ०७ | झालेल्या कामाची रक्कम | बिल क्र.०४(अॅडव्हान्स क्र.०३) अखेर एकूण रु. ७,३७,४६,११९/- |
| ०८ | कामाची सद्यस्थिती | **रस्ता क्र.०८** (निमगाव शिव ते जुना पिंपळवाडी रस्ता)- रस्त्यात येणारे विहीरीजवळील भाग वगळता कॉंक्रीटीकरण पूर्ण. पेव्हींग ब्लॉक व स्ट्रीटलाईटचे ५०% पुर्ण. इतर कामांबाबत पुर्वतयारी ठेकेदार यांचे मार्फत करणेत येत आहे.<br>**रस्ता क्र.०३** (नांदूर्खी रस्ता)- रस्त्याचे अर्ध्या भागातील कॉक्रीटीकरण पूर्ण. रस्त्याचे उजव्या भागातील राहीलेले कॉक्रीटीकरण करीता कॉक्रीटीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. फुटपाथ, स्ट्रीट लाईट तसेच इतर कामाचे मटेरियल कलेक्शनचे काम चालू आहे.<br>**रस्ता क्र.०६**(पिंपळवाडी रस्त्याचे दक्षिणेकडील रस्ता)- किरकोळ भाग वगळता WBM काम पुर्ण. पुढील काम अद्याप हाती घेण्यात आलेले नाही.<br>**रस्ता क्र.०७**(साई आश्रम दक्षिण बाजूकडील रस्ता) -रस्त्याचे अर्ध्या भागातील बी.बी.एम.पूर्ण. उर्वरीत अर्ध्या भागात WBM पुर्ण. डांबरीकरण व इतर कामांबाबत पुर्वतयारी ठेकेदार यांचे मार्फत करणेत येत आहे.<br>**रस्ता क्र. ०५**(आ.क्र.३४ ते नाला रस्ता ) व **रस्ता ०९**(लक्ष्मीनगर ते कंधारी हॉटेल प.बाजू ) चे कामास अद्याप ठेकेदार यांनी प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आलेली नाही.<br>**रस्ता क्र. ०९ अ** (कंधारी हॉटेल प.बाजू ते आ.क्र.३४) - भुसंपादनाची प्रक्रिया पूर्ण नसल्याने अद्याप प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आलेली नाही. |

सदरहू कामी ठेकेदार यांचेशी झालेले करारनाम्यानुसार सदरचे कामाची १५ महिने मुदत दि.०५/११/२०११ रोजी संपुष्टात आली होती. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ फेब्रुवारी, २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १७३(०७) अन्वये ठेकेदार यांना सध्या त्यांचेमार्फत सुरु असलेल्या चार रस्त्यांचे कामासाठी माहे मार्च, २०१२ पर्यंन्त मुदवाढ देण्यात आली आहे.

ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि.,मुंबई यांनी त्यांचेकडील दि. २४/०८/२०१२ रोजीचे पत्रान्वये दूसऱ्यांदा खालील कारणांमुळे मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे

१. Utility Shifting-काम सुरु झाल्यानंतर रस्त्यामध्ये येणाऱ्या युटीलिटी शिफ्टींगचे काम करणेबाबत ठरले. सदरचे कामासाठी संस्थानने दिलेल्या एजन्सीमार्फत युटीलिटी शिफ्टींगचे काम करणेत आले.

२. Borrowed Soil - ठेकेदार यांचे पुरवठादारांनी रॉयल्टी न भरता मुरुम पुरविला. त्यामुळे कंपनीला रॉयल्टी भरावी लागली.

३. Stone aggregate - निविदा भरतेवेळी इरिगेशन कॅनॉल खोदाईचा दगड वापरून खडी तयार करणेबाबत नियोजन होते. त्यासाठी २५० टीजी क्षमतेचा क्रशर आणला होता. तथापि सदर दगड न मिळाल्यामुळे स्थानिक खडी पुरवठादारांवर अवलंबून राहावे लागले. स्थानिक खडी पुरवठादार मोठया प्रमाणात खडी पुरवू शकले नाहीत.

१. Cement - आवश्यक (अल्ट्राटेक, एसीसी) कंपन्यांचे सिमळेट उपलब्ध करण्यात बराच वेळ वाया गेला

२. Floating Population -शिर्डी हे पर्यटनस्थळ असल्यामुळे सुमारे प्रती दिन सत्तर हजारपेक्षा अधिक साईभक्त शिर्डीला भेट देतात त्यामुळे होणारी ट्राफीक जाम होत असल्याने रस्त्याचे काम करणेस दिवसा विशेषतः रविवारी व मंगळवारी अडचण येते. तसेच रात्रीही काम करणेस मर्यादित वाव होता.

१. Cash crunch- गाठलेली अर्थिक उलाढाल व कामावरील ओव्हरहेड यामुळे झालेला आर्थिक असमतोल यामुळे कामाचे प्रगतीवर परिणाम झाला.
२. Unseasonal Rain - सप्टेंबर २०१० ते डिसेंबर २०१० या काळात सुमारे ९० दिवस पावसामुळे काम बंद होते.
३. Shortage of water - उन्हाळयातील पाणीटंचाईमुळे बऱ्याच वेळा कामासाठी पाणी उपलब्ध होवू शकले नाही.
४. Change in pavement in Road no.०३- रस्ता क्र.०३ चे चेनेज ५४० ते १८६० या भागात डांबरीकरणाऐवजी कॉक्रीटीकरण करणबाबत निर्णय झाला आहे.

वरिल बाबीमुळे तसेच बाजारातील बांधकाम साहित्याचें वाढत्या भावांमुळे कंपनीला तोटा झालेला आहे. तरीही सदरचे कामातील रस्ता क्र.०३, ०६, ०७ व ०८ या रस्त्यांचे काम दि. ३१/१२/२०१२ पर्यन्त व उर्वरीत दोन रस्त्यांचे काम पूर्ण करणेस ३१/०५/२०१३ अखेर मुदवाढ मिळणेबाबत ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

सल्लागार यांनी दि.३०/०८/२०१२ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांचे मागणीनुसार मे, २०१३ अखेर मुदतवाढ देणेस हरकत नाही असा अभिप्राय दिला आहे.

तरी ठेकेदार रोमन टारमॅट लि., यांना माहे मे, २०१३ पर्यन्त मुदतवाढ देणेस हरकत नाही असे मत आहे.

**ग) <u>संस्थान परिसरातील अंतर्गत रस्ते व पार्किंगचे डांबरीकरण कामाचे ठेकेदार मे.जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजि. कं. कोल्हार यांचे मूदतवाढ मागणीबाबत</u>**

संस्थान परिसरात अंतर्गत रस्ते व पार्किंगचे तसेच श्री साई प्रसादालयाकडे जाणाऱ्या निमगांव शिर्डी शिव रस्त्याचे डांबरीकरण करणेचे काम ठेकेदार मे. जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजि. कं., कोल्हार यांना जा.नं.११६८/२०११ दि.०१/०६/२०११ रोजीचे कार्यादेशान्वये देण्यात आलेले आहे. निविदा व करारनाम्यानुसार काम पूर्ण करणेचा कालावधी सहा महिने (दि.१८/०६/२०११ ते दि.१७/१२/२०११) असा होता. सदरहू कालावधी मध्ये ठेकेदार यांनी श्री साई प्रसादालयाकडे जाणा-या निमगांव शिर्डी शिव रस्त्याचे व जुने प्रसादालयाचे पार्किंगचा किरकोळ भाग वगळता इतर भागातील डांबरीकरणाचे काम पूर्ण केले होते.ठेकेदार यांना खालील उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी दि.२९/०२/२०१२ अखेर मूदतवाढ देणेत आली होती.
१. श्री साई प्रसादालय दक्षिण बाजुकडील मोकळ्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे व पावसाचे पाणी वाहून जाणेकरीता स्टॉर्म वाटर ड्रेनेज लाईन टाकणे.
२. जुने प्रसादालय पार्किंगचे उर्वरीत भागाचे डांबरीकरण करणे
३. साईनगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण
४. नविन भक्तनिवासस्थान मुख्य रस्ता, अंतर्गत रस्ते व पार्किंगचे डांबरीकरण तसेच मुख्य रस्तयाचे बाजुने पेव्हींग ब्लॉक बसविणे.
५. हेलीपॅड व ॲप्रोच रोडचे डांबरीकरण करणे.

ठेकेदार यांनी वरीलपैकी डांबरीकरणाचे काम दिलेले मूदतवाढीमध्ये पूर्ण केलेले आहे. ठेकेदार यांचे श्री साईप्रसादालयाकडील मोकळ्या जागेत पेव्हींग ब्लॉक बसविणे पावसाचे पाणी वाहून जाणेकामी स्टॉर्म वॉटर ड्रेनेज लाईन टाकणे व साईबाबा भक्तनिवासस्थान मुख्य रस्त्याचे बाजुने पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम बाकी होते. सद्यस्थितीत ठेकेदार यांचे पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम सुरु असून ९०% काम पूर्ण केले आहे. सदरची कामे दि.३१/०८/२०१२ अखेर पूर्ण होणे अपेक्षीत आहे.

दि.१२/०७/२०१२ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांनी विषयांकित कामातील डांबरीकरणाचे काम पूर्ण झालेले असून पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम ९५% काम पूर्ण झालेले असल्याचे कळविले आहे. तसेच उर्वरीत ५% कामास झालेल्या विलंबाची खालिलप्रमाणे कारणे दिलेली आहेत.
१. निवडलेल्या नमुन्यातील पेव्हींग ब्लॉकची संख्या वाढल्याने उपलब्ध झाले नाही.
२. कर्बस्टोनची संख्या ही निविदेतील संख्येपेक्षा वाढलेली आहे.
३. उन्हाळी सुट्टी व उत्सव काळात साईभक्तांची प्रचंड गर्दी झाल्याने कामाच्या गतीवर परिणाम झाला.

उपरोक्त अडचणींमुळे कामास विलंब झालेला असून सदरचे काम दि.३१/०८/२०१२ पर्यंत पूर्ण करणेत येईल, करीता दि.३१/०८/२०१२ अखेर मूदतवाढ मिळणेची विनंती ठेकेदार यांनी दि.१२/०७/२०१२ रोजीचे पत्राव्दारे केलेली आहे. ठेकेदार यांनी डांबरीकरणाचे मुख्य काम यापुर्वी मंजूर करण्यात आलेल्या वाढीव मूदतीत पूर्ण केले आहे. आता पेव्हींग ब्लॉकचेही ९०% काम पूर्ण केलेले आहे.

मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी केलेल्या कामाचे पाहणी दरम्यान ५०० रुम मुख्य रस्त्यालगत श्री साई आश्रमचे कम्पाऊंड भिंतीपर्यंतचे मोकळ्या जागेत संपुर्ण भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे तसेच सदरहु पेव्हींग ब्लॉकवर लहान मोठी वाहने उभे राहू नये याकरीता डांबरी रस्त्याचेकडेने कर्बस्टोन बसविणेबाबत चर्चा झाली आहे. निविदेमध्ये मुख्य रस्त्याचे कडेने २.०० मी. रुंदीचे पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत तरतूद होती. तथापी मुख्य रस्त्याचे दक्षिण बाजूकडील मोकळ्या जागेत सरासरी

४.२० मी. रुंदीमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविल्यामुळे ८२० चौ.मी. क्वांटीटी वाढलेली आहे. तसेच निविदेमध्ये कर्बस्टोनची क्वाँटीटी १० मी. घेतलेली होती. तथापी रस्त्याचे दक्षिण बाजुकडील पेव्हींग ब्लॉकवर गाडी पार्किंग होऊ नये याकरीता रस्त्याचे कडेने तसेच श्री साई प्रसादालयासमोरील रस्त्याचे कडेने कर्बस्टोन बसविणेकरीता एकूण २०० मी. क्वॉटींटीची आवश्यकता आहे. तरी उर्वरित काम पूर्ण करणेसाठी ठेकेदार यांचे विनंतीनुसार त्यांना आलेल्या अडचणींचा विचार करता दि.३१/०८/२०१२ अखेर मूदतवाढ देणेस हरकत नाही असे मत आहे.

**ह) <u>शिर्डी येथील स.नं.171/12 पै. मधिल जागेवर संस्थान निधीतून अद्ययावत बसस्थानकाचे बांधकाम ठेकेदार मे. पाटील कन्स्ट्रक्शन अॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,पुणे यांचे मुदतवाढ मागणीबाबत</u>**

शिर्डी येथील स.नं. १७१/१२ पै. मधिल बसस्थानकाचे जागेवर संस्थान निधीतून अद्यावत बसस्थानकाचे बांधकाम करणेकरीता ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन अॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.,पुणे यांना इकडील जा.नं.६८२१/२०१० दि.२९/०४/२०१० अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. सदर कामाचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | :- | शिर्डी बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास संस्थान निधीतून विकसीत करणे. |
| ०२ | आर्किटेक्ट | :- | मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक |
| ०३ | ठेकेदार | :- | मे.पाटील कन्स्ट्रक्शन अॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., पुणे |
| ०४ | मंजूर निविदा रक्कम | :- | रु. ७,६०,९०,०८९/- |
| ०५ | कार्यादेश क्र. व दिनांक | :- | जा.क्र.६८२१/१०, दि.२९/०४/२०१० |
| ०६ | करारनाम्यानुसार काम सुरु केल्याचा दिनांक | :- | १४/०५/२०१० |
| ०७ | प्रत्यक्ष काम सुरु केल्याचा दिनांक | :- | २६/०६/२०१० |
| ०८ | काम पूर्ण करण्याचा कालावधी | :- | १५ महिने |
| ०९ | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याचा दिनांक | :- | १३/०८/२०११ |
| १० | मुदतवाढ | :- | मा.व्य.स.निर्णय क्र.८१, दि.१४/०१/२०१२ अन्वये दि.३१/०७/२०१२ अखेर प्रथम मुदतवाढ देणेत आली आहे. |
| ११ | कामाची सद्यस्थिती | :- | ०१. तळमजला व पहिला मजलाकरीता ११६० चौ.मी. स्लॅबचे तसेच तळमजल्यावरील विट बांधकाम ८०% पूर्ण झाले असून आतील प्लास्टरचे ६०% काम पूर्ण झाले आहे.<br>०२. पहिल्या मजल्यावरील ६०% विट बांधकाम पूर्ण<br>०३. दुसऱ्या मजल्यावरील अंदाजे ४५० चौ.मी. स्लॅबचे काँक्रीटींग पूर्ण झाले असून पुढील भागातील स्लॅब शटरींगचे काम प्रगतीपथावर आहे. |

सुरुवातीला ठेकेदार यांना एकूण १५९५ चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळापैकी ११६० चौ.मी. क्षेत्रफळाचे क्षेत्र ताब्यात देणेत आले होते. उर्वरीत ४३५ चौ.मी. क्षेत्रफळाचा ताबा बसस्थानकातील वाणिज्य आस्थापनांचा (दुकान गाळयांचा) कोर्टात दावा चालू असल्याने मिळालेला नव्हता. ठेकेदार यांनी ताब्यात मिळालेल्या ११६० चौ.मी. बांधकाम क्षेत्रात प्रत्यक्ष दि.१४/०५/२०१० रोजी कामास सुरुवात केली आहे. ठेकेदार यांना उर्वरीत ४३५ चौ.मी. क्षेत्राचा ताबा दि.०२/०७/२०१२ रोजी देणेत आला असून ठेकेदार यांचे सदर क्षेत्रातील कॉलमफुटींगचे काम प्रगतीपथावर आहे.

ठेकेदार यांची निवेदेनुसार काम करण्याची मूदत दि.१३/०८/२०११ (१५ महिने) अखेर संपुष्टात आली असून ठेकेदार यांना काम पुर्ण करणेकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/०१/२०१२ चे सभेत नि.क्र.८१ अन्वये दि.१३/०७/२०१२ अखेर मूदतवाढ देणेत आली होती.

ठेकेदार यांनी दि.०१/०९/२०१२ चे पत्रान्वये खालील अडचणीमुळे काम पूर्ण करता आले नसल्याचे कळविले आहे.

१. नियोजित इमारतीपैकी ४३५ चौ.मी. क्षेत्राचा ताबा देणेत आलेला नव्हता त्यामुळे कामाची अपेक्षीत गती वाढविणे शक्य होत नव्हते. सदर क्षेत्रातील जुनी इमारत काढल्याचे काम दि.०२/०७/२०१२ रोजी पूर्ण झाले असून संपूर्ण क्षेत्र ताब्यात मिळाले आहे. सदरचे क्षेत्र ताब्यात नसलेने उर्वरीत क्षेत्रातील काम करणे तांत्रिक दृष्या अडचणीचे होते.

२. शिर्डी येथे कुशल व अकुशल कामगार सहजासहजी उपलब्ध होत नाहीत. तसेच ठेकेदारांची काम सोडून जाण्याची प्रवृत्ती जास्त असल्याने नवीन ठेकेदारांची नियुक्ती करणे व काम करणे यात बराच कालावधी वाया गेला

३. शिर्डी परिसरात वाळू उपलब्ध होत नाही. त्यामुळे वाळुच्या उपलब्धतेनुसार काम करावे लागते.

तसेच सदर काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असून काम पूर्णकरणेकरीता दि.२८/०२/२०१३ पर्यंत मूदतवाढ मिळणेस ठेकेदार यांनी विनंती केली आहे.

याबाबत आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी दि.०५/०९/२०१२ चे ई-मेल पत्राव्दारे ठेकेदार यांनी कळविलेल्या अडचणींचा विचार करता काम पूर्ण होणेचे दृष्टीने ठेकेदार यांना दि.२८/०२/२०१३ पर्यंत मूदतवाढ देणेस शिफारस केली आहे.

तरी ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर, प्रा.लि.,पुणे यांना काम पूर्ण करणेकरीता दि.२८/०२/२०१३ अखेर मूदतवाढ देणेस हरकत नाही असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संस्थानमध्ये चालु असलेल्या विविध बांधकाम ठेकेदारांना मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२६ कोपरगांव-अहमदनगर रस्ता (रा.मा.१०) शिर्डी हद्दीतील साखळी क्र.९२/१५६ (शिवाचा ओढा) वरील जुन्या पुलाचे दुरुस्तीबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** कोपरगांव अहमदनगर रस्ता (राज्यमार्ग क्रमांक १०) या महामार्गावर शिर्डी शहर / नगरपंचायत हद्दीत शीवाचा ओढा / नाला (साखळी क्रमांक ९२/१५६ वर स्थित) आहे. सध्या शीव नाल्यावर दुपदरी वाहतुकीसाठी रस्त्याचे पश्चिम बाजूने (हॉटेल स्वराज बाजूने) शिर्डी शहरातून बाहेर पडणेसाठी दक्षिणोत्तर चढ-उतार असलेला कमी पातळीवरील छोटा पूल आहे. रस्त्याचे पूर्व बाजूने (लक्ष्मीनगरचे बाजूने) शिर्डी शहरात प्रवेश करणेसाठी पुर्वीचे दुपदरी रस्त्याचे विकास कामांतर्गत वरील पातळीवर नाला पूल बांधणेत आलेला आहे. या नाला रस्ता व पुलाची साधारणत : अंदाजे लांबी १२० फुट / रुंदी ४० फुट आहे.

या शीव नाल्याचे उत्तरेस मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीत गट नंबर ८०/८१ मध्ये संस्थानचे भव्य श्री साई प्रसादालय कार्यरत असून, या ठिकाणी दररोज सरासरी २५ ते ३० हजार साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. यासाठी हजारो भक्त प्रसादालयाकडे तसेच या भागात राहणारे स्थानिक रहिवासी दररोज या रस्त्यावरुन, शीव नाला ओलांडून ये-जा करीत असतात. या पादचारी भक्तांसाठी व स्थानिक रहिवाशांच्या सोयीसाठी या शीव नाला रस्त्याचे पश्चिम बाजूस, उपरोक्त नाला रस्ता सोडून माहे मार्च-एप्रिल, २०१२ मध्ये लोखंडी पूल तयार करणेत आलेला आहे, त्याचा वापर पादचारी सध्या करीत आहेत.

**तथापि,** उपरोक्त कोपरगांव - अहमदनगर रस्त्यावरील शीव नाल्याचे रस्त्याने हजारो वाहने दररोज शिर्डी शहरातून बाहेर पडत असतात. यामध्ये कार, जीप, प्रवासी रिक्षा, दुचाकी, या लहान वाहनांसह ट्रक, कंटेनर, प्रवासी बसेस आदि मोठया व जड क्षमतेची वाहनांची वाहतुक अहोरात्र सुरु आहे.

मध्यंतरीचे कालावधीत, कोपरगांव - अहमदनगर या राज्यमार्गाचे चौपदरीकरणांचे काम सुरु होते, त्यावेळेस उपरोक्त शिर्डी हद्दीतील शीव ओढयावर / नाल्यावर विस्तारीत पुल बांधणेत येणार असल्याचे जागतिक बँक प्रकल्प, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेमार्फत कळविणेत आलेले होते. तसेच चौपदरीकरण प्रकल्पांतर्गत या प्रस्तावित शीव नाला पुलाची उंची, रुंदी वाढविणे, पदपाथाची सोय करणे तसेच त्याचे दुरुस्तीबाबत संस्थानमार्फत वेळोवेळी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार ही करणेत आलेला आहे. परंतु सध्या सदर रस्त्याचे काम पूर्णपणे बंद असून, ते पुन्हा कधी सुरु होईल याबाबत शाश्वती नाही.

**(ब) सध्या,** कोपरगांव-अहमदनगर रस्त्यावर सुरु असणाऱ्या अतीजड वाहनांची ये-जा अखंड सुरु असल्याने व पावसाळा ऋतू सुरु असल्याने, शीव ओढयाचा / नाल्याचा पश्चिम बाजूकडील दक्षिणोत्तर चढ उताराचा रस्ता संपूर्ण डांबरीकरण उखडून, त्यावर मोठमोठे खड्डे होऊन पूर्णत : खराब / नादुरुस्त (डॅमेज) होऊन, वाहतुकीसाठी अत्यंत धोकादायक झालेला आहे, पादचाऱ्यांसह वाहनचालकांना शीव नाल्याचा रस्ता / पुल ओलांडणे अत्यंत जिकीरीचे झालेले आहे. सदर ठिकाणी कोणत्याही क्षणी मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. सदर नाला रस्ता खराब / नादुरुस्त असल्याने यावरुन अत्यंत धिम्या गतीने, हळूहळू वाहतुक सुरु असते व त्याचा परिणाम मंदिर परिसरजवळ वाहतुकीची कोंडी होऊन, त्याचा ताण स्थानिक पोलिस यंत्रणेसह संस्थानचे सुरक्षा यंत्रणेवर पडत आहे.

सदर शीव नाल्यावरील पश्चिमेकडील रस्ता संस्थानमार्फत डांबरीकरण किंवा कॉंक्रिटीकरण करुन त्वरीत दुरुस्त करावा, म्हणून शिर्डी पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी तसेच स्थानिक परिसरातील नागरीकांनी मा. कार्यकारी अधिकारीसो. यांची समक्ष भेट घेऊन विनंती केली.

सदर रस्ता जागतिक बँक प्रकल्प, (सा. बां. विभाग), अहमदनगर यांचे अखत्यारीतील आहे. वरील परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे, सदर रस्त्याची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती आदि कामांची

जबाबदारी ही त्याच विभागाची आहे. सदर शीव नाला रस्ता दुरुस्तीबाबत त्यांचेशी संपर्क साधला असतां, कोपरगांव - अहमदनगर रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम पुर्वी मे. राम इन्फ्रास्ट्रक्चर यांना देणेत आलेले होते, परंतु त्यांचेकडून मुदतीत काम पूर्ण न झाल्याने त्यांचे कामाचा ठेका रद्द करणेत आलेले आहे, असे सांगणेत आले.

तसेच सदर विभागामार्फत असे सांगणेत आले की, कोपरगांव - अहमदनगर रस्त्याचे कामासाठी नवीन ठेकेदार नेमणूक करणेची कार्यवाही सुरु आहे. नवीन ठेकेदाराची नेमणूक होऊन, काम सुरु होणेस बराच कालावधी लागण्याची शक्यता आहे, त्यामुळे नाला रस्त्याचे डांबरीकरण / कॉंक्रिटीकरण करणे किंवा त्याची तात्पुरती डागडुजी करणेचे काम लगेचच हाती घेणे शक्य होणार नाही.

**(क)** उपरोक्त सर्व बाबींचा विचार करतां, भक्तांसह स्थानिक रहिवाशांच्या सोयी-सुविधेसाठी तसेच कोपरगांव - अहमदनगर राज्यमार्गावर मंदिर परिसरानजीक होणारी वाहतुकीची कोंडी सुरक्षेच्या दृष्टीने दुर करणेसाठी, सदर शीव नाल्यावरील पश्चिमेकडील रस्ता तातडीने दुरुस्त करणे अत्यंत आवश्यक आहे.

सदर शीव नाल्यावरील पश्चिमेकडील छोटया पुलावरील अंदाजे ३४ मीटर लांबीचा व ५.५० मीटर रुंदीचा रस्ता सिमेंट पेव्हींग ब्लॉक्स वापरुन तात्पुरत्या स्वरुपात तातडीने दुरुस्त करणेस व सदर रस्त्याचे दुतर्फा दुतर्फा लोखंडी पाईप व अँगल्सचे संरक्षक कठडे दुरुस्त करणे कामासाठी खालील तपशीलाप्रमाणे अंदाजे रक्कम रुपये १,८५,०००/- मात्र (अक्षरी रुपये एक लाख पंच्याऐंशी हजार मात्र) इतका खर्च येईल.

**Abstract**

| Sr. No. | Description | Est. Qty. | Unit | Rate Rs. | Estimated Amount Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | WBM | 13.38 | Cum | 700.00 | 9366.00 |
| 2 | Paving Block | 183.73 | Sqm | 750.00 | 137805.00 |
| 3 | Concrete | 5.307 | Cum | 3379.00 | 17932.00 |
| 4 | JCB Usage | 02.00 | Hours | 700.00 | 1400.00 |
| 5 | Bracker tractor | 03.00 | Hours | 500.00 | 1500.00 |
| Amount : | | | | | 168003.00 |
| Add 10% Contingencies : | | | | | 16800.00 |
| **Total Amount Rs :** | | | | | **184803.00** |
| **Say Rs :** | | | | | **185000.00** |

सदरचे काम संस्थानमार्फत सुरु असणाऱ्या रस्त्यांचे काम करणारे ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., नाशिक किंवा मे. एस. के. येवले, संगमनेर यांच्यापैकी, जो ठेकेदार सदर नाला रस्त्याचे दुरुस्तीचे काम लवकरात लवकर, तातडीने दुरुस्त करुन देणेस तयार असतील त्यांचेकडून करुन घेता येईल.

**(ड)** उपरोक्त परिच्छेदांमध्ये विवेचन केलेनुसार, भक्तांच्या सोयी-सुविधेसाठी तसेच मंदिर परिसरानजीक होणारी वाहतुकीची कोंडी मंदिर परिसराचे सुरक्षेचे कारणास्तव दुर करणेसाठी, विषयांकित कोपरगांव - अहमदनगर रस्ता (रामा-१०) या महामार्गावरील शिर्डी शहर हद्दीतील शीवाचे ओढयावरील पश्चिमेकडील छोटया पुलावरील रस्ता वर नमुद केलेल्या ठेकेदारांपैकी कामासाठी उपलब्ध होणाऱ्या ठेकेदाराकडून, तातडीने दुरुस्त करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये १,८५,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पंच्याऐंशी हजार) मात्र खर्चास मान्यता असावी. तसेच दरम्यानचे कालावधीत, याकामी मा. शासनाची मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करता येईल.

**निर्णय क्र.७४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तांच्या सोयी-सुविधेसाठी तसेच मंदिर परिसरानजीक होणारी वाहतुकीची कोंडी मंदिर परिसराचे सुरक्षेचे कारणास्तव दुर करणेसाठी, कोपरगांव - अहमदनगर रस्ता (रामा-१०) या महामार्गावरील शिर्डी शहर हद्दीतील शीवाचे ओढयावरील पश्चिमेकडील छोटया पुलावरील रस्ता प्रस्तावात नमुद केलेल्या ठेकेदारांपैकी कामासाठी उपलब्ध होणाऱ्या ठेकेदाराकडून, तातडीने दुरुस्त करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये १,८५,०००/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली. सदरहू काम तातडीचे व भक्तोपयोगी असल्याने त्यास शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७ श्री साईबाबा रुग्णालयातील GICU विभागाकरीता Patient Warmer Machine with Blanket खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील GICU या विभागाने दि.१४/०७/२०१२ रोजीचे मागणी पत्रकान्वये एक नग Patient Warmer Machine with Blanket ची मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे Patient Warmer Machine उपलब्ध नाही. अत्यवस्थ रुग्णास देण्यात येत असलेल्या इंजेक्शन किंवा सलाईनमुळे अथवा इतर कारणास्तव थंडी वाजून आल्यानंतर त्वरीत सदर मशिनव्दारे गरम हवा देऊन रुग्णास आराम मिळू शकतो.

श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता अशाच प्रकारचे एक नग Patient Warmer Machine with Blanket विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,५१,८७५/- चे खर्चास दि.०६/०४/२०१२ रोजीचे मा. त्रीसदस्य समिती सभेत निर्णय क्र. २९४ अन्वये मान्यता मिळालेली असून त्यानुसार सदरचे खरेदीकामी कोटेशन मागविण्याची कार्यवाही चालु आहे. सदरचे खरेदीमध्ये GICU विभागाकरीता लागणारे Patient Warmer Machine with Blanket एक नग वाढवून चर्चा / वाटाघाटी करुन खरेदी करता येईल. सदर Patient Warmer Machine with Blanket खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.१,५१,८७५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त एक नग Patient Warmer Machine with Blanket चर्चा / वाटाघाटीचे वेळेस एक नग वाढवून व त्याच दराने खरेदीस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२८ श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता डस्टबीन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालय परीसरात वेगवेगळ्या ठिकाणी ठेवणेकामी व्हील असलेल्या मोठ्या डस्टबीनची आवश्यकता आहे. त्यामुळे श्री साईबाबा रुग्णालयातील सहा. अधिसेविका कार्यालयाने डि. पी. नं २३६६ दि.१३/०७/२०१२ अन्वये १० नग व्हील असलेल्या मोठ्या डस्टबीनची मागणी केलेली आहे.

सदरचे व्हील असलेल्या मोठ्या डस्टबीन खरेदीकामी मे. निलकमल, नाशिक यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दूरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार मे. निलकमल, नाशिक यांनी दि.२१/०७/२०१२ चे ई-मेल पत्रान्वये सदर बॉक्सचे दर कळविलेले आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Description | Qty. | Rate Per in Rs | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | **Dustbins –**<br>Dimension – 500(L)x480(W)960(H)mm<br>Description – Plastic Two Wheeled Bin | 10 | 4162.50 | 41625.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | | **41625.00** |

उपरोक्त १० नग व्हील असलेल्या मोठ्या डस्टबीन खरेदीकामी अंदाजे रु.४१,६२५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचा १० नग व्हील असलेल्या मोठ्या डस्टबीन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.४१,६२५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता १० नग व्हील असलेल्या मोठ्या डस्टबीन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.४१,६२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२९ श्री साईबाबा हॉस्पिटलचे नवीन कार्डियाक ऑपरेशन थिएटरसाठी परफ्युजनिस्टची आवश्यकता असलेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पीटलमधील कार्डियाक ऑपरेशन थियटरसाठी एक परफ्यूजनिस्ट मिळणेस कार्डियाक विभाग प्रमुख यांनी दि. ०१/०८/२०१२ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेली आहे.

एका ओ.टी. मध्ये तीन परफ्यूजनिस्ट असतांना दरमहा ८०/९० इतक्या शस्त्रक्रिया करण्यात येत असत परंतु, दोन ओ.टी. सुरु झाल्यापासून दरमहा आणखी ५०/५५ शस्त्रक्रियांची वाढ झालेली आहे. परंतु तीनच परफ्यूजनिस्ट असल्याने दैनंदिन कामाचे नियोजन करणे शक्य होत नाही.

सन २००६-०७ ते सन २०१२-१३ या कालावधीतील हृदय शस्त्रक्रियांचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

| अ.न. | कालावधी | एकूण हृदय शस्त्रक्रिया संख्या |
|---|---|---|
| १ | २००६-०७ | २२१ |
| २ | २००७-०८ | ५९७ |
| ३ | २००८-०९ | ७७६ |
| ४ | २००९-१० | १०२३ |
| ५ | २०१०-११ | १२१७ |
| ६ | २०११-१२ | १४९१ |
| ७ | एप्रिल ते जुलै २०१२ अखेर | ५२९ |
| | **एकूण** | **५८५४** |

सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये तीन कार्डियाक सर्जन असून दोन व्हिजीटींग सर्जन आठवड्याला प्रत्येकी एक दिवस ऑपरेशन्ससाठी येत असतात. तसेच दरमहा किमान २ कार्डियाक सर्जरी कॅम्प आयोजित करण्यात येतात. त्यासाठी नामांकित कार्डियाक सर्जन बोलविण्यात येतात. परंतु परफ्यूजनिस्टची संख्या तीनच असल्याने आणखी एक परफ्यूजनिस्टची आवश्यकता आहे.

परफ्यूजनिस्टचे काम हे अत्यंत टेक्निकल जबाबदारीचे व जोखमीचे असून रुग्णांच्या जीव रक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असल्याने दोन्ही ओ.टी. चे कामकाज नियोजनबध्द चालू राहणे तसे रुग्णांच्या हिताची बाब विचारात घेऊन आणखी किमान एक परफ्यूजनिस्टची लवकरात लवकर नेमणूक करण्यात यावी, अशी विनंती कार्डियाक विभाग प्रमुख यांनी केलेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटल विभागासाठी आकृतीबंधानुसार परफ्यूजनिस्ट या पदासाठी मंजूर असलेली संख्या व नेमणूक कर्मचारी संख्या यांचा गोषवारा थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

| **पदाचे नाव** | **प्रस्तावित शैक्षणिक पात्रता** | **मंजुर पदे** | **भरलेली पदे (कायम)** | **११ महिने कालावधी-साठी** | **रिक्त पदे** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| Perfusionists परफ्यूजनिस्ट | 1) Age not more than 33 yrs.<br>2) B.Sc.+Dip / certificate course in related from any govt. Recognized University / institute<br>3) Experience minimum 5 yrs. In similar capacity. | ०३ | ०२ | ०१ | ०० | |

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सध्या हृदय शस्त्रक्रियेसाठी दोन ओ.टी. सुरु असून सदर ठिकाणी तीन कार्डियाक सर्जन व एक क्लिनीकल असिस्टंट (कार्डियाक) कार्यरत आहेत. श्री साईबाबा हॉस्पीटलचे कार्डियाक ऑपरेशन थियटरमधील कामाचा वाढता व्याप पाहता आणखी एक परफ्यूजनिस्ट कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने मिळणेस वैद्यकिय संचालक यांनी मागणी केली आहे.

आकृतीबंधानुसार परफ्यूजनिस्ट या पदाच्या तीन जागा मंजूर आहेत. त्यापैकी दोन जागेवर सुधारित वेतनबॅन्ड रु. ९३००-३४८०० व ग्रेड रु. ४४०० वर कायम कर्मचारी कार्यरत असून ११ महिन्यांकरीता एक कर्मचारी मासिक रु. २१,०००/- मानधनावर घेण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर पदाची जागा रिक्त नाही.

वैद्यकिय संचालक यांचे मागणीनुसार कार्डियाक ऑपरेशन थियटरसाठी आणखी एक परफ्यूजनिस्ट ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने घेणेकामी श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये या पदाची एक जागा मंजूर करुन घ्यावी लागेल. सदरचे कार्यवाहीस विलंब लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सध्या कामाची गैरसोय होऊ नये म्हणून एक परफ्यूजनिस्ट ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने घेऊन नंतर आकृतीबंधामध्ये सदर पदाचे एका जागेस शासनाची मान्यता घेता येईल.

रुग्णालयाकडे परफ्यूजनिस्ट या पदासाठी वेळोवेळी अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदर अर्जदार उमेदवारांच्या वैद्यकिय संचालक, वरिष्ठ कार्डीयाक सर्जन, वरिष्ठ भूलतज्ञ यांचे समोर मुलाखती घेऊन त्यापैकी योग्य उमेदवारांची निवड करुन ठेकेदारामार्फत घेता येईल, असे वैद्यकिय संचालक यांनी सुचविले आहे.

तरी, वैद्यकिय संचालक यांचे मागणीनुसार परफ्यूजनिस्ट या पदासाठी रुग्णालयाकडे वेळोवेळी प्राप्त झालेल्या अर्जदार उमेदवारांच्या मुलाखती वैद्यकिय संचालक, वरिष्ठ कार्डीयाक सर्जन, वरिष्ठ भूलतज्ञ यांचे समोर घेऊन त्यापैकी एक योग्य उमेदवार ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने घेणेबाबत व सदर उमेदवारास द्यावयाच्या मानधनाबाबत तसेच आकृतीबंधामध्ये सदर पदाचे एका जागेस शासनाची मंजूरी घेणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलचे नविन कार्डियाक ऑपरेशन थिएटरसाठी परफ्यूजनिस्ट या पदासाठी वेळोवेळी प्राप्त झालेल्या अर्जदारांच्या मुलाखती वैद्यकिय संचालक, वरिष्ठ कार्डीयाक सर्जन, वरिष्ठ भूलतज्ञ यांचे समोर घेऊन त्यापैकी एका अनुभवी उमेदवाराची ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात यावी तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलकडे आकृतीबंधामध्ये परफ्युजनिस्ट या पदाचा समावेश करणेकामी शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३०** **डॉ.पुरुषोत्तम मधुकर भावसार यांची फिजीशियन या पदावर नेमणूक करणेबाबत दि.०४.०८.२०१२ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** डॉ. पुरुषोत्तम मधुकर भावसार यांनी दि.०४/०८/२०१२ रोजी फिजीशियन या पदावर नेमणूक होणेसाठी पुढीलप्रमाणे अर्ज सादर केला आहे. I undersigned Dr. Purushottam M. Bhavsar applying here for the post of Phycian. I have completed my DNB

(Gen.Medicine) in June २०१०. Due to some personal reasons I was unable to attend the interview for the same post held on २९/०७/२०१२. Kindly consider my application photo copies of documents attached with application.

डॉ. भावसार यांची माहिती खालीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| **नाव** | :- | डॉ. पुरुषोत्तम मधुकर भावसार |
| **जन्मतारीख** | :- | ११/०९/१९८० |
| **सध्याचे वय** | :- | ३२ वर्षे |
| **शिक्षण** | :- | MBBS-२००३, F.C.P.S.(CPS)-२००९ DNB.-२०१० |
| **अनुभव** | :- | रेसिडेंड डॉक्टर के.ई.एम. हॉस्पीटल, पुणे २००६-जुलै २००८ |

आयसीयू रजिस्ट्रार जहांगिर हॉस्पीटल पूणे- ३ महिने

लेक्चरर- गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज धुळे- ऑक्टो.१० ते एप्रिल १२

मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार रुग्णालयांकरीता तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी आर एम ओ व सी एम ओ ही पदे भरणेकामी अर्ज मागविणेसाठी दि. २१/०६/२०१२ रोजीचे द. इंडियन एक्सप्रेस या वर्तमान पत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. ३०/०६/२०१२ देण्यात आलेली होती. या जाहिरातीमध्ये फिजीशियनचे एका पदाचा समावेश करण्यात आलेला होता. जाहिरातीनुसार या पदासाठी डॉ. पुरुषोत्तम मधुकर भावसार व डॉ. डॅनिश मेमन या दोन उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले होते.

जाहिरातीस अनुसरुन तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी आर एम ओ व सी एम ओ या पदांसाठी मुदतीत व मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जदार उमेदवारांच्या मा त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार प्र. वैद्यकीय संचालक यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर, जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर, वैद्यकीय प्रशासक, श्री साईबाबा हॉस्पिटल व संबंधीत क्षेत्रातील तज्ञ यांची समिती गठीत करुन सदर समितीसमोर दि. २९/०७/२०१२ रोजी मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत.

फिजीशियन या पदासाठी प्राप्त अर्जदार उमेदवार डॉ. पुरुषोत्तम मधुकर भावसार व डॉ. डॅनिश मेमन यांना या मुलाखतीस बोलविण्यात आले होते. परंतु, सदर दोन्हीही उमेदवार दि. २९/०७/२०१२ रोजी मुलाखतीसाठी आले नव्हते.

दि. २९/०७/२०१२ रोजी मुलाखती घेणेत आलेल्या उमेदवारांना नेमणूका देणेबाबत सदर समितीने केलेल्या शिफारसींमधील शिफारस क्र. ५ ज्या पदांवर उमेदवार उपलब्ध झाले नाहीत, अशा पदांची नव्याने जाहिरात देण्यात यावी. नव्याने जाहिरात प्रसिध्द होईपर्यंत सध्याच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज आल्यास सदर अर्जदार उमेदवारांच्या वैद्यकिय संचालक यांनी मुलाखती घ्याव्यात व नेमणूकीबाबत पुढील कार्यवाही करावी. अशी आहे.

उपरोक्त शिफारसी नुसार तत्कालीन वैद्यकिय संचालक यांनी डॉ. पुरुषोत्तम मधुकर भावसार यांची दि. ०४/०८/२०१२ रोजी मुलाखत घेतलेली असून त्यांचे अर्जावर Interviewed knowledge wise good candidate. Ready to join by १०/०८/२०१२. Recommanded for appointment on regular pay scale असा शेरा दिलेला आहे.

रुग्णालयांसाठी मंजूर असलेल्या आकृतीबंधामध्ये फिजिशियन या पदासाठी सुधारित वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० मध्ये मूळ वेतन रु.१८७५०+ ग्रेड वेतन रु. ६६०० असा मंजूर आहे.

तरी, वैद्यकिय समितीचे शिफारसीनुसार व वैद्यकिय संचालक यांचे अभिप्रायानुसार डॉ. पुरुषोत्तम मधुकर भावसार यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे फिजीशियन या पदावर सुधारित वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० मध्ये मूळ वेतन रु.१८७५०+ ग्रेड वेतन रु. ६६०० व इतर अनुज्ञेय भत्ते देऊन नेमणूक आदेश देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७५१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकिय समितीचे शिफारसीनुसार व वैद्यकिय संचालक यांचे अभिप्रायानुसार डॉ. पुरुषोत्तम मधुकर भावसार यांची श्री साईबाबा हॉस्पीटलकडे फिजीशियन या पदावर सुधारित वेतनबॅन्ड रु. १५६००-३९१०० मध्ये मूळ वेतन रु.१८७५०+ ग्रेड वेतन रु. ६६००/- व इतर अनुज्ञेय भत्ते देऊन नेमणूक आदेश देण्यात यावा, ते हजर न झाल्यास फिजीशियन या पदासाठी नव्याने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागणी करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३१** **श्री साईनाथ हॉस्पिटलकडील वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) या पदाबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी तज्ञ वैद्यकिय अधिकारी, कनिष्ठ वैद्यकिय अधिकारी, आर एम ओ व सी एम ओ आदि. पदे भरणेकामी दि. २१/०६/२०१२ रोजी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. श्री साईनाथ रुग्णालयाकडील डॉ. राम शंकर महाजन- वैद्यकिय अधिकारी

(सोनोलॉजिस्ट) हे दि. ३१/०८/२०१२ माध्यान्होत्तर सेवा निवृत्त होत असल्याने सदरचे पदाचा दि. २१/०६/२०१२ रोजीचे जाहिरातीमध्ये समावेश करण्यात आला होता.

जाहिरातीस अनुसरुन प्राप्त पात्र उमेदवारांच्या मुलाखती मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार दि. २९/०७/२०१२ रोजी प्र. वैद्यकिय संचालक यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा शल्य चिकित्सक-अहमदनगर, जिल्हा आरोग्य अधिकारी-अहमदनगर, वैद्यकिय प्रशासक-श्री साईबाबा हॉस्पीटल व संबधीत क्षेत्रातील तज्ञ यांचे समितीसमोर घेण्यात आलेल्या आहेत. या मुलाखतीमध्ये डॉ. तुषार एकनाथराव पगार यांची श्री साईनाथ रुग्णालयाकडे वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) या पदासाठी निवड करुन त्याप्रमाणे नेमणूक आदेश स्वाक्षरीसाठी सादर करण्यात आला. परंतु, डॉ. पगार हे त्यांचे वैयक्तिक कारणास्तव हॉस्पीटलमध्ये कामावर येणार नसलेबाबत त्यांनी दि. २९/०८/२०१२ रोजी ई-मेलव्दारे कळविलेले आहे.

डॉ. पगार यांचेनंतर डॉ. महेश मधुकर वर्पे यांचे नाव प्रतिक्षा यादीवर आहे. परंतु, श्री साईनाथ रुग्णालयाकडील मशीनवर त्यांचे रजिस्ट्रेशन होणेकरीता काही कालावधी लागू शकतो. सदरचे कालावधीमध्ये सोनोग्राफी मशीन बंद ठेवावे लागेल. सदर मशीन बंद ठेवल्यास सोनोग्राफीचे रिपोर्ट मिळणार नाहीत व त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयाकडे होणाऱ्या विविध शस्त्रक्रिया बंद ठेवाव्या लागतील.

डॉ राम शंकर महाजन, वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) श्री साईनाथ रुग्णालय, शिरडी यांचे वयास दि. ३१/०८/२०१२ रोजी ६० वर्षे पूर्ण होत असल्याने, प्रचलीत सेवानियमांनुसार दि. ३१/०८/२०१२ चे माध्यान्होत्तर ते संस्थान सेवेतून निवृत्त होणार आहे. सेवानिवृत्तीनंतर मी श्री साईनाथ रुग्णालयाकमध्ये मानधनावर अथवा प्रती रुग्ण ठराविक रक्कम या प्रमाणे सोनोग्राफी विभागात सोनोलॉजिस्ट म्हणून काम करण्यास तयार असून काम करण्याची संधी द्यावी. मला सध्या मिळत असलेला ग्रॉस पगार व एक्सग्रेसिया तसेच दरवर्षी योग्य ती वाढ मला अपेक्षित आहे, असा विनंती डॉ. महाजन यांनी दि. ०८/०५/२०१२ रोजी सादर केला आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाकडील रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून दि. २९/०७/२०१२ रोजीचे मुलाखतीमधून प्रतिक्षा यादीवर असलेले डॉ. महेश मधुकर वर्पे यांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे सोनोलॉजिस्ट या पदावर नेमणूक देऊन त्यांचे श्री साईनाथ रुग्णालयाकडील सोनोग्राफी मशीनवर रजिस्ट्रेशन होईपर्यंत डॉ. राम शंकर महाजन यांना श्री साईनाथ रुग्णालयाकडे वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) या पदावर कंत्राटी पध्दतीने मानधनावर तीन महिने कालावधीसाठी घेण्यात यावे, असे वैद्यकिय संचालक यांनी मागणी केली आहे.

**डॉ. महाजन यांची माहिती खालीलप्रमाणे-**

| | | |
|---|---|---|
| **संपूर्ण नाव व पत्ता** | : | डॉ. राम शंकर महाजन<br>मु.पो.पोहेगांव, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर |
| **शैक्षणीक पात्रता** | : | एमबीबीएस -१९७७, अल्ट्रासाऊंड ट्रेनिंग (६ आठवडे-१९९१) |
| **जन्मतारीख** | : | दि. १०/०८/१९५२ |
| **संस्थान सेवेत दाखल तारीख** | : | २९/०४/१९९३. |
| **सेवानिवृत्ती तारीख़** | : | ३१/०८/२०१२ |
| **कामाचा एकूण कालावधी** | : | १९ वर्षे. |
| **सध्याचे एकूण वेतन** | : | ५६,६४३/- |

तरी, डॉ. राम शंकर महाजन यांना सेवा निवृत्तीनंतर तीन महिने कालावधीकरीता वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) या पदावर कंत्राटी पध्दतीने मानधनावर नेमणूक करणेबाबत व मानधनाची रक्कम निश्चित करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

आजचे सभेत मा.कार्यकारी अधिकारी यांनी सभेस असे सांगितले की, वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) या पदासाठी निवड केलेला उमेदवार कामावर हजर न झाल्याने व श्री साईनाथ रुग्णालयात रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता सध्या सेवा निवृत्त होत असलेले डॉ.राम शंकर महाजन यांनी एकत्रित वेतनावर काम करण्याची तयारी दर्शविल्याने त्यांना दि.०१.०९.२०१२ पासून रु.३५,०००/- एकत्रित वेतनावर सहा महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली असल्याचे सांगितले.

**निर्णय क्र.७५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. राम शंकर महाजन यांना सेवा निवृत्तीनंतर दि.०१.०९.२०१२ पासून सहा महिने कालावधीसाठी श्री साईनाथ हॉस्पिटलकडे वैद्यकिय अधिकारी (सोनोलॉजिस्ट) या पदावर कंत्राटी पध्दतीने एकत्रित मासिक मानधन रु.३५,०००/- वर नेमणूक देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३२** **व्हर्सामेड व्हेंटीलेटर दुरुस्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे अतिदक्षता विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. ८४७१, दि. ११/०८/२००५ अन्वये मे. हॉस्पिटेक, मुंबई यांचेकडुन ०२ नग व्हर्सामेड व्हेटींलेटर मशीन एकुण रु. १२,००,०००/-

इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहेत. सदर व्हेंटीलेटर्स दि. २९/०९/२००५ रोजी कार्यान्वीत करण्यात आले असुन दोन्ही मशीनकरीता कंपनीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. २८/०९/२००६ रोजी संपला आहे. सदर मशीनची दुरुस्ती व देखभालीकरीता मे. विप्रो जी. ई हेल्थकेअर, पुणे यांचे या विभागाचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे. योगा एंटरप्राजेस, पुणे यांचेकडे दि.०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१२ या कालावधीसाठी रू.१,३२,३६०/-इतक्या रकमेत CMC करणेत आले होते.

सदरचे दोन्ही व्हेंटीलेटरपैकी एक डायलेसीस विभागात व एक अपघात विभागात नियमीत वापरात आहेत. अपघात विभागातील व्हेंटीलेटर खराब झाल्यामुळे कंपनी इंजिनीअर तातडीच्या भेटी करीता आले असता त्यांनी मशिनची तपासणी करून येथे दुरूस्त होउ शकत नसल्यामुळे सदर मशिन कंपनीकडे पाठविणे गरजेचे असल्याचे कळविले होते. त्यामुळे सदर मशिन पुढील दुरूस्तीकरीता इकडील पत्र क्र. ६२६/२०११ दि. ०६/०८/२०११ अन्वये मे. योगा एंटरप्रायजेस, पुणे यांचे पाठविणेत आले होते. कंपनीने मशिनची तपासणी करून मशिनचे स्पेअर पार्ट उपलब्ध होत नसल्यामुळे सदर मशिन दुरुस्त होउ शकत नसल्याचे त्यांचे दि. ०४/०५/२०१२ चे पत्रान्वये कळविले आहे.

सदर मशिन तातडीने दुरूस्त करणे आवश्यक असल्यामुळे मशिनचे पुरवठाधारक मे. हॉस्पिटेक, मुंबई यांचेकडे विचारणा केली असता सदर मशिनचे स्पेअर पार्ट त्यांचेकडे उपलब्ध असल्याचे कळविले आहे. त्यासाठी त्यांचे इंजिनीअरने दि. ०८/०८/२०१२ रोजी मशिनची तपासणी करुन त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट अन्वये मशिनचे Flow Card हा पार्ट खराब झाल्याचे कळविले आहे. त्यासाठी कंपनीने सर्व करांसहीत एकुण रू. ४२,१८७/-(अक्षरी रू. बेचाळीस हजार एकशे सत्याऐंशी मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर रक्कम कंपनीस उपरोक्त मशिन दुरूस्त झालेनंतर अदा करावयाची आहे. उपरोक्त पार्ट करीता कंपनी सहा महिन्यांची वॉरंटी देत आहे.

तरी मे. हॉस्पिटेक, मुंबई यांचेकडुन व्हर्सामेड व्हेटींलेटर मशीन दुरूस्त करून घेणेस व त्याकरीता येणाऱ्या एकुण रू. ४२,१८७/- चे खर्चास मान्यता असावी.

सदर खर्च श्री साईबाबा हॉस्पिटलचे दुरुस्ती व देखभाल या अंदाजपत्रकीय तरतुदीतुन करता येईल.

मंजुर बजेट -३,००,०००,००/- शिल्लक बजेट २,९७,८०,४७१/-

**निर्णय क्र.७५३ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा हॉस्पिटलचे अतिदक्षता विभागातील व्हर्सामेड व्हेटींलेटर मशीन मे. हॉस्पिटेक, मुंबई यांचेकडुन दुरूस्त करून घेणेस व याकामी येणाऱ्या एकुण रू. ४२,१८७/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३३ श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता डस्टबीन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाचे हाऊस किपींगचे काम आऊटसोर्सींग पध्दतीने BVG India Ltd., Pune यांना दिलेल आहे. सध्या पावसाळा सुरु असल्यामुळे स्वच्छतेसाठी परीसरात वेगवेगळया ठिकाणी ठेवणेकामी डस्टबीन व रबरी मॅटची आवश्यकता आहे. त्यामुळे BVG India Ltd., Pune यांनी दि.०६/०६/२०१२ खालील साहित्याची मागणी केलेली आहे.

| अ.नं. | तपशील | नग संख्या |
|---|---|---|
| १ | डस्टबीन ५० लिटर | २० |
| २ | डस्टबीन १०० लिटर | १५ |
| ३ | रबरी मॅट १५ x ४ | ८ |
| ४ | रबरी मॅट ०६ x ४ | ६ |
| ५ | रबरी मॅट ०४ x २ | ८ |
| | | |

सदरचे डस्टबीन व रबरी मॅटपैकी स्टेशनरी मध्ये रबरी मॅट खरेदीची कार्यवाही चालू आहे त्यामुळे फक्त डस्टबीन खरेदीकामी मे. निलकमल, नाशिक यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दूरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार मे. निलकमल, नाशिक यांनी दि.१३/०८/२०१२ चे ई-मेल पत्रान्वये सदर बॉक्सचे दर कळविलेले आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Description | Qty. | Rate Per in Rs | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| १ | डस्टबीन ५० लिटर- Top x OD- ३१२x३१२x८६८mm | २० | १५३२.४४ | ३०६४८.८० |
| २ | डस्टबीन १०० लिटर OD - ५००x५००x७००mm | १५ | २३७६.७६ | ३५६५१.४० |
| | | **Total Amt. in Rs.** | | **६६३००.२०** |

उपरोक्त डस्टबीन खरेदीकामी पुर्णांकित अंदाजे रु. ६६,३००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदर डस्टबीन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.६६,३००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता आवश्यक डस्टबीन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६६,३००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३४ श्री साईनाथ रुग्णालयातील ऑप्थलमिक विभागाकरीता Auto- Refractometer खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील ऑप्थलमिक विभागात रुग्णांच्या डोळ्यांचे नंबर काढण्यापूर्वी डोळ्याची पहाणी करावी लागते त्यासाठी सदर Auto - Refractometer ची आवश्यकता असते. त्यांच्याकडे असलेले Auto- Refractometer हे वापरुन खराब झालेले असल्यामुळे त्यांनी दि.२५/०४/२०१२ चे मागणीपत्रान्वये एक नग Auto - Refractometer ची मागणी केलेली आहे.

सदरचे Auto - Refractometer खरेदीकामी M/s. Life Sight Surgicals Pvt. Ltd., Ahemedabad यांचेकडून अंदाजे खर्चासाठी दूरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार M/s. Life Sight Surgicals Pvt. Ltd., Ahemedabad यांनी पत्र क्र.LLS/१७९/२०१२ दि.०३/०८/२०१२ चे पत्रान्वये सदर Auto- Refractometer चे दर कळविलेले आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Description | Qty. | Rate Per in Rs | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Auto- Refractometer with Standard Accessories | 1 | 350000.00 | 350000.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | | **350000.00** |

उपरोक्त १ नग Auto - Refractometer खरेदीकामी अंदाजे रु.३,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचा १ नग Auto - Refractometer विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. ३,५०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील ऑप्थलमिक विभागाकरीता ०१ नग Auto- Refractometer विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु. ३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच जुने Auto- Refractometer परत (Buyback) करण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३५ सन २०११-१२ या वर्षातील वार्षिक औषधे खरेदीमधील अतिरिक्त औषधे/ सर्जिकल साहित्य / लॅब केमिकल मंजूर दराने खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या खालील औषधे / सर्जिकल साहित्याकरीता सन २०११-२०१२ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Name of Supplier | P.O.No. & Date | Make | Brand Name | Packing | Qty. | Sanction ed Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | OXYGENATOR NEONATAL WEIGHT GROUP UPTO BELLOW 20KG.) 902 | Scimed Technologies Pvt.Ltd., Mumbai | 3193 – 24/09/11 | DIDECO SORIN | EOS PAEDIATRIC - 050545 | | 100 | 12131.4600 | 1213146.00 |
| 2 | POTTASIUM PERMAGNET 400 GM POWDER | Shree Jhalani Agencies, Ahmednagar | 3197 – 24/09/11 | TEKAY | POTTASIUM PERMAGNET | 400 GM | 1000 | 124.6875 | 124687.50 |
| 3 | INJ POTTASSIUM CHLORIDE 10ML AMP | Trimurti Agencies, Nashik | 3215-24/09/11 | T.WALKER | | 10ML | 10000 | 6.7235 | 67234.86 |
| 4 | INJ.MEROPENEM 1 GM VIAL | Biochem Pharmaceutical Industries Ltd., Mumbai | 3115-24/09/11 | BIOCHEM | MEROVAZ | | 100 | 429.2355 | 42923.55 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | INJ.MEROPENEM 500 MG VIAL | Biochem Pharmaceutical Industries Ltd., Mumbai | 3115-24/09/11 | BIOCHEM | MEROVAZ | | 100 | 310.2908 | 31029.08 |
| 6 | INJ VANCOMYCINE HYDROCHLORIDE 500MG | Pharmaco, Pune | 3179-24/09/11 | NEON | VANKING | | 1500 | 74.8440 | 112266.00 |
| 7 | INJ. CEFOPIROME 1 GM VIAL | Sanjay Agencies, Ahmednagar. | 3189-24/09/11 | ARISTO | BACIROM 1GM | VIAL | 200 | 207.2169 | 41443.38 |
| 8 | INJ GADODIAMIDE USP 0.5 MMOL/ML 10X10ML | Imaging Products India Pvt. Ltd., Mumbai | 3140-24/09/11 | BRACCO | MULTIHANCE | 10ML | 300 | 760.0000 | 228000.00 |
| 9 | ABO/D+REVERSE GROUP CARDS (DEMAND QTY. IN BOX) | N.P. Agencies, Mumbai | 3167-24/09/11 | DIAMED | | 48T / BOX | 1000 | 110.0000 | 110000.00 |
| 10 | COOMBS CARDS (LISS/COOMBS-POLYSPECIFIC AHG) | N.P. Agencies, Mumbai | 3167-24/09/11 | DIAMED | | 6*48T / BOX | 8000 | 40.0000 | 320000.00 |
| 11 | NW3336 - Ethilon 2-0 45mm, 3/8 Circle Reverse Cutting, 70cm | Johnson & Johnson Limited, Mumbai (Ethicon Division) | 3105-24/09/11 | J&J | | 12 FOILS / BOX | 200 | 771.34 | 154268.00 |
| 12 | INJ ACETYLCYTEINE 5ML AMP | Sanjay Agencies, Ahmednagar. | 3189-24/09/11 | SAMARTH | MUCOMIX 5ML | | 1000 | 50.4504 | 50450.40 |
| 13 | INJ PHENIRAMINE MALEATE I.V. 2ML AMP | Sanjay Agencies, Ahmednagar. | 3189-24/09/11 | AVENTIS | AVIL | 2 ML | 3000 | 2.7225 | 8167.50 |
| 14 | T3 KIT 96 TEST AUTO KIT | Universal Chemicals, Nashik | 3219-24/09/11 | RANBAXY | | 96T | 5 | 3043.1239 | 15215.62 |
| 15 | T4 KIT 96 TEST AUTO KIT | Universal Chemicals, Nashik | 3219-24/09/11 | RANBAXY | | 96T | 5 | 3043.1239 | 15215.62 |
| 16 | T.S.H. KIT 96 TEST AUTO KIT | Universal Chemicals, Nashik | 3219-24/09/11 | RANBAXY | | 96T | 5 | 3341.1911 | 16705.96 |
| 17 | BLOOD TUBING SET | Atlantic Pharmaceuticals, Mumbai | 3111-24/09/11 | NIPRO | | 24 PCS PER BOX | 300 | 140.0000 | 42000.00 |
| 18 | I.A.B.P. BALLOON 34CC = 2 NOS. , 40CC = 3 NOS. | Rahul Healthcare Corporation, Pune | | INTAS MEDI DEVICES | ULTRA - 35CC/40CC | | 5 | 33412.5000 | 167062.50 |
| | | | | | | | | **Total Amt. in Rs.-** | **2759815.97** |

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. रुग्णांचे दररोजच्या वाढलेल्या संख्येमुळे (सोबत माहितीस्तव एमआरडी विभागाचा तक्ता जोडलेला आहे) सध्या सदरचे साहित्याचा साठा औषध भांडारात शिल्लक नाही व सदरचे साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. त्यामुळे तुर्तास तीन ते चार महिने पुरु शकेल इतका साठा खरेदी करावा लागणार आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Description | Name of Supplier | P.O.No. & Date | Make | Brand Name | Packing | Additional Qty. | Sanctioned Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | OXYGENATOR NEONATAL WEIGHT GROUP UPTO BELLOW 20KG.) 902 | Scimed Technologies Pvt.Ltd., Mumbai | 3193 – 24/09/11 | DIDECO SORIN | EOS PAEDIATRIC - 050545 | | 30 | 12131.46 | 363943.80 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | POTTASIUM PERMAGNET 400 GM POWDER | Shree Jhalani Agencies, Ahmednagar | 3197 – 24/09/11 | TEKAY | POTTASIUM PERMAGNET | 400 GM | 200 | 124.6875 | 24937.50 |
| 3 | INJ POTTASSIUM CHLORIDE 10ML AMP | Trimurti Agencies, Nashik | 3215-24/09/11 | T.WALKER | | 10ML | 1500 | 6.7235 | 10085.25 |
| 4 | INJ.MEROPENEM 1 GM VIAL | Biochem Pharmaceutical Industries Ltd., Mumbai | 3115-24/09/11 | BIOCHEM | MEROVAZ | | 200 | 429.2355 | 85847.10 |
| 5 | INJ.MEROPENEM 500 MG VIAL | Biochem Pharmaceutical Industries Ltd., Mumbai | 3115-24/09/11 | BIOCHEM | MEROVAZ | | 100 | 310.2908 | 31029.08 |
| 6 | INJ VANCOMYCINE HYDROCHLORIDE 500MG | Pharmaco, Pune | 3179-24/09/11 | NEON | VANKING | | 1200 | 74.8440 | 89812.80 |
| 7 | INJ. CEFOPIROME 1 GM VIAL | Sanjay Agencies, Ahmednagar. | 3189-24/09/11 | ARISTO | BACIROM 1GM | VIAL | 100 | 207.2169 | 20721.69 |
| 8 | INJ GADODIAMIDE USP 0.5 MMOL/ML 10X10ML | Imaging Products India Pvt. Ltd., Mumbai | 3140-24/09/11 | BRACCO | MULTI HANCE | 10ML | 100 | 760.0000 | 76000.00 |
| 9 | ABO/D+REVERSE GROUP CARDS (DEMAND QTY. IN BOX) | N.P. Agencies, Mumbai | 3167-24/09/11 | DIAMED | | 48T /BOX | 470 | 110.0000 | 51700.00 |
| 10 | COOMBS CARDS (LISS/COOMBS-POLYSPECIFIC AHG) | N.P. Agencies, Mumbai | 3167-24/09/11 | DIAMED | | 6*48T / BOX | 4200 | 40.0000 | 168000.00 |
| 11 | NW3336 - Ethilon 2-0 45mm, 3/8 Circle Reverse Cutting, 70cm | Johnson & Johnson Limited, Mumbai (Ethi.Div | 3105-24/09/11 | J&J | | 12 FOILS / BOX | 30 | 771.34 | 23140.16 |
| 12 | INJ ACETYLCYTEINE 5ML AMP | Sanjay Agencies, Ahmednagar. | 3189-24/09/2011 | SAMARTH | MUCOMIX 5ML | | 1000 | 50.4504 | 50450.40 |
| 13 | INJ PHENIRAMINE MALEATE I.V. 2ML AMP | Sanjay Agencies, Ahmednagar. | 3189-24/09/2011 | AVENTIS | AVIL | 2 ML | 2000 | 2.7225 | 5445.00 |
| 14 | T3 KIT 96 TEST AUTO KIT | Universal Chemicals, Nashik | 3219-24/09/11 | RANBAXY | | 96T | 1 | 3043.1239 | 3043.1239 |
| 15 | T4 KIT 96 TEST AUTO KIT | Universal Chemicals, Nashik | 3219-24/09/11 | RANBAXY | | 96T | 1 | 3043.1239 | 3043.1239 |
| 16 | T.S.H. KIT 96 TEST AUTO KIT | Universal Chemicals, Nashik | 3219-24/09/11 | RANBAXY | | 96T | 1 | 3341.1911 | 3341.1911 |
| 17 | BLOOD TUBING SET | Atlantic Pharmaceuticals, Mumbai | 3111-24/09/11 | NIPRO | | 24 PCS PER BOX | 72 | 140.00 | 10080.00 |
| 18 | I.A.B.P. BALLOON | Rahul Healthcare Corporation, Pune | | INTAS MEDI DEVICES | ULTRA-35CC/40CC | | 7 | 33412.50 | 233887.50 |
| | | | | | | | | **Total Amt. in Rs.-** | **1254507.72** |

वरीलप्रमाणे औषधे / सर्जिकल साहित्य / लॅब केमीकल्स वार्षिक मंजुर दरानुसार खरेदीकामी रु.१२,५४,५०७.७२ इतका खर्च येणार आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२४/०९/२०११ निर्णय क्रमांक ६७५ Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु.२५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करण्यात यावे, असे ठरले आहे. सदर निर्णयानुसार सदरचे खरेदीकामी रु.२५,०००/- पेक्षा जास्त खर्च येणार आहे.

तरी वरीलप्रमाणे औषधे / सर्जिकल साहित्य / लॅब केमीकल्स वार्षिक मंजुर दराने खरेदी करण्यात आले असुन सदर खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु.१२,५४,५०८/- इतका खर्च आलेला आहे. सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.७५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०११-१२ या वर्षातील वार्षिक औषधे खरेदीमधील अतिरिक्त औषधे/ सर्जिकल साहित्य/ लॅब केमिकलच्या वार्षिक मंजूर दराने केलेल्या खरेदीस व रु.१२,५४,५०८/- मात्र झालेल्या खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३६ PACEMAKER चे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात श्री. नवले कपीराज हौशीराम या पेशंटला दि.२३/०७/२०१२ रोजी Boston Scientific या Co. चा Dual Chamber (Altura ६०) हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग Pacemaker वापरलेला आहे. कारण सदर पेसमेकर हा ज्या रुग्णांच्या मेंदूमध्ये गाठी होऊन रक्तश्राव कमी जास्त होतो त्यामुळे रुग्णास चक्कर येतात अशा रुग्णांसाठी सदरचा पेसमेकर वापरतात

सदर पेसमेकर करीता वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही कारण असे पेसमेकर फार क्वचित लागतात. परंतू मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

डॉ. वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता पेसमेकरची दि.२३/०७/२०१२ चे पत्रान्वये मागणी केली होती. त्यानुसार M/s. Advance Technologies, Bhopal यांचेकडून बील क्र.INV/SBS/ ०८९/१२-१३ दि.२३/०७/२०१२ (डिलेव्हरी चलन नं. DC/SBS/०६५/१२-१३ दि.२३/०७/२०१२) अन्वये एक नग रु.१,७०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.२३/०७/२०१२ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर पेसमेकर बसविणेसाठी श्री. नवले कपीराज हौशीराम यांना रु.१,९६,२७७/- इतका खर्च आलेला असून सदर रुग्णाने संपुर्ण रक्कम रु.१९६२७७/- पावती नं.२१०५५९४६५ अन्वये रोख भरण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे M/s. Advance Technologies, Bhopal यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या उपरोक्त पेसमेकरचे बीलाची रक्कम रु. १,७०,०००/- M/s. Advance Technologies, Bhopal यांना अदा करण्यात आलेली आहे.

तरी सदर Dual Chamber (Altura ६०) च्या खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.७५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे PACEMAKER चे तातडीने केलेल्या खरेदी व खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३७ तातडीचे सलाईन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०११-१२ या वर्षाचे वार्षिक औषधे खरेदीमध्ये वेगवेगळया प्रकारच्या सलाईनची मागणी करणेत आली होती. त्यानुसार दि. २४/०९/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.६७५ अन्वये Nirlife या कंपनीच्या सलाईनकरीता M/s. Namoh Agencies, Ahmednagar यांना इकडील पत्र क्र.३१६९ दि.२४/०९/२०११ अन्वये खालीलप्रमाणे सलाईनचा पुरवठा आदेश देण्यात आला होता.

| Sr. No. | Name of Drugs / Item | Make | Brand Name | Pack-ing | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | INJ MULTIPLE ELECTROLYTES & DEXTROSE INJECTION TYPE 1 USP 500 ML | NIRLIFE | NIRLYTE | 500ML | 5000 | 16.5400 | 82700.00 |
| 2 | INJ D.N.S. 500 ML | NIRLIFE | DNS | 500ML | 70000 | 12.3400 | 863800.00 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | INJ DEXTROSE 10 % 500ML | NIRLIFE | D10% | 500ML | 10000 | 16.5400 | 165400.00 |
| 4 | INJ DEXTROSE 25 % 100ML | NIRLIFE | D25% | 100ML | 1000 | 10.8100 | 10810.00 |
| 5 | INJ DEXTROSE 5 % 500ML | NIRLIFE | D5% | 500ML | 30000 | 12.3400 | 370200.00 |
| 6 | INJ GLYCEINE 3 LITER (IRRIGATION) | NIRLIFE | GLYCI NE | 3 LITER | 2000 | 67.2000 | 134400.00 |
| 7 | INJ LINEZOLID 200MG, 200ML DEXTROSE IP 5% W/V | NIRLIFE | NIRZO LID | 300ML | 1000 | 78.7500 | 78750.00 |
| 8 | INJ MANNITOL 350ML | NIRLIFE | M20% | 350ML | 500 | 40.4250 | 20212.50 |
| 9 | INJ NORMAL SALINE 100ML | NIRLIFE | NS | 100ML | 5000 | 6.6150 | 33075.00 |
| 10 | INJ NORMAL SALINE 500ML | NIRLIFE | NS | 500ML | 100000 | 12.3400 | 1234000.00 |
| 11 | INJ RINGER LACTATE 500ML | NIRLIFE | RL | 500ML | 60000 | 14.8050 | 888300.00 |
| | | | | | **Total Amt. in Rs.** | | **3881647.50** |

उपरोक्त पुरवठा आदेशातील काही सलाईनचा त्यांनी मागणीप्रमाणे मालाचा पुरवठा केलेला आहेत. परंतु Nirlife (Nirma Limited, Ahmedabad) या थेट उत्पादक कंपनीने दि. ०४/०२/२०१२ रोजीचे पत्रान्वये शासनाचे NPPA (National Pharmaceutical Pricing Authority) हया संस्थेने सलाईनचे MRP मध्ये वाढ केल्याने विक्रीच्या किंमतीत देखील वाढ झालेली आहे असे कळविले आहे. त्यामुळे M/s. Namoh Agencies, Ahmednagar हे पुरवठा आदेशातील दराने सलाईनचा पुरवठा करण्यास तयार नाहीत, त्यामुळे त्यांचेकडून दि. ०९/०२/२०१२ रोजीचे पत्रान्वये नविन दर मागवून घेण्यात आलेले आहेत. त्यांनी वरीलपैकी अ.नं.२ ते ११ या सलाईनकरीता नविन दर दिलेले होते, तर अ.नं. १ चा ते आहे त्या मंजुर दराने पुरवठा करणास तयार होते.

त्यामुळे M/s. Namoh Agencies, Ahmednagar यांना पुरवठा आदेश गेलेल्या सलाईनकरीता तुलनात्मक दरांचे तक्त्यात प्राप्त झालेले व सदर खरेदीकामी निवडलेल्या (short listed) निविदाधारकांकडून पुन्हा दुरध्वनीवरुन दर वाढलेले आहेत किंवा कसे ? याबाबत विचारणा करणेत आली होती. परंतु दरात वाढ झाल्याने त्यांनी देखील त्यांचे नविन दर दिलेले आहेत. त्यांचेपैकी मे. महेश सर्जिकल ॲन्ड फार्मासिटीकल्स, पुणे यांना दुरध्वनीवरुन दराबाबत विचारणा करण्यात आली होती, त्यांनी दुरध्वनीवरुन दर वाढल्याचे सांगितले, परंतु वारंवार तगादा करुन देखील त्यांनी त्यांचे नविन दराचे पत्र दिलेले नाही, त्यामुळे त्यांचेव्यतिरीक्त इतर निविदाधारकांचे फॅक्सव्दारे प्राप्त दरांचा फेर तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून तो सोबत सादर केला आहे. त्यामध्ये देखील M/s. Namoh Agencies, Ahmednagar यांचेच दर निम्नत्तम येतात. त्यांचे नविन दरानुसार सदरचे सलाईन खरेदीकामी रु.९,७६,५१३.८५ इतका जादा खर्च येणार होता,

परंतु तत्कालीन विश्वस्त डॉ. ए.भा. गोंदकर यांनी Nirlife या कंपनीचे श्री. दिनेश पाठक ( सेल्स मॅनेजर) यांचेशी दूरध्वीनीवरुन चर्चा करुन आम्ही आमचे वरील आदेशातील लागणारे सलाईन पैकी पुढील चार ते पाच महिने पुरु शकेल इतके सलाईनची एकदाच ऑर्डर दिली तर आपण टेंडर मधील मंजूर दराने पुरवठा करु शकाल किंवा कसे ? अशी विचारणा केली होती. त्यावेळेस कंपनीने जुन्या दराने पुरवठा करण्यास सहमती दर्शविली होती. त्यानुसार त्यांना पुढील चार ते पाच महिने पुरु शकेल इतक्या आपणास आवश्यक असणाऱ्या सलाईनचा पुरवठा करणेस सांगण्यात आले होते व त्याचा त्यांनी पुरवठा देखील पुर्ण केलेला आहे त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Name of Drugs / Item | Make | Brand Name | Pack-ing | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | INJ D.N.S. 500 ML | NIRLIFE | DNS | 500ML | 35000 | 12.3400 | 431900.00 |
| 2 | INJ DEXTROSE 10 % 500ML | NIRLIFE | D10% | 500ML | 500 | 16.5400 | 8270.00 |
| 3 | INJ DEXTROSE 25 % 100ML | NIRLIFE | D25% | 100ML | 700 | 10.8100 | 7567.00 |
| 4 | INJ DEXTROSE 5 % 500ML | NIRLIFE | D5% | 500ML | 1000 | 12.3400 | 12340.00 |
| 5 | INJ GLYCEINE 3 LITER (IRRIGATION) | NIRLIFE | GLYCI NE | 3 LITER | 1000 | 67.2000 | 67200.00 |
| 6 | INJ MANNITOL 350ML | NIRLIFE | M20% | 350ML | 260 | 40.4250 | 10510.50 |
| 7 | INJ NORMAL SALINE 100ML | NIRLIFE | NS | 100ML | 1000 | 6.6150 | 6615.00 |
| 8 | INJ NORMAL SALINE 500ML | NIRLIFE | NS | 500ML | 35000 | 12.3400 | 431900.00 |
| 9 | INJ RINGER LACTATE 500ML | NIRLIFE | RL | 500ML | 35000 | 14.8050 | 518175.00 |
| | | | | | **Total Amt. in Rs.** | | **14,94,477.50** |

वरील पुरवठा केलेल्या सलाईनपैकी खालील चार प्रकारच्या सलाईनचा औषध भांडारातील साठा संपत आलेला आहे. सन २०२-१३ या वर्षाचे वार्षिक औषधे खरेदीची प्रक्रीया पूर्ण झालेली आहे परंतु त्यास मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठासमोर अंतिम मान्यता घेणे बाकी आहे. याकामी प्रस्ताव संस्थानचे विधी व न्याय विभागाकडे देण्यात आलेला आहे. सदर मान्यता मिळणेकामी साधारणतः एक महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे. त्यामुळे तुर्तास एक महिना पुरु शकेल इतका सलाईनचा साठा खरेदी करणे गरजेचे आहे, व ते सन २०१२-१३ या वर्षाकरीता प्राप्त झालेल्या व ज्या पुरवठाधारकाची निवड करण्यात आलेली आहे त्या पुरवठाधारकाकडून खरेदी करावे लागणार आहे. सदर खरेदीकामी रक्कम रु.२,०२,०३७.५० इतका खर्च येणार आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Name of Drugs / Item | Name of Supplier | Make | Brand Name | Pack-ing | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | INJ DEXTROSE 5 % 500ML | Vishal Agencies, Ahmednagar. | BAXTER | DEXTROSE 5% | 500 ML | 2500 | 17.5000 | 43750.00 |
| 2 | INJ MULTIPLE ELECTROLYTES & DEXTROSE INJECTION TYPE 1 USP 500 ML | Vishal Agencies, Ahmednagar. | BAXTER | I.V. E.P. | | 375 | 21.0000 | 7875.00 |
| 3 | INJ RINGER LACTATE 500ML | Namoh Agencies, Ahmednagar | NIRLIFE | RL | 500 ML | 7500 | 20.0550 | 150412.50 |
| | | | | | | Total Amt. in Rs. | | **202037.50** |

तरी उपरोक्त प्रमाणे M/s. Vishal Agencies, Ahmednagar व M/s. Namoh Agencies, Ahmednagar यांचेकडून सलाईन खरेदीस व याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.२,०२,०३८/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७५८ यावर सविस्तर चर्चा होऊन, M/s. Vishal Agencies, Ahmednagar व M/s. Namoh Agencies, Ahmednagar यांचेकडून तातडीने खरेदी केलेल्या सलाईनला व याकामी आलेल्या पुर्णांकित रक्कम रु.२,०२,०३८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३८ औषध भांडार विभागाकडे असलेल्या साठ्याची दि.३१.०३.२०१२ रोजी प्रत्यक्ष केलेल्या मोजणीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे मध्यवर्ती औषध भांडारात व वार्ड, ओ.टी. मध्ये दि.३१/०३/२०१२ रोजी असलेल्या औषध साठयाची अंतर्गत लेखापरिक्षक यांचे मार्फत प्रत्यक्ष साठा मोजणी करण्यात आलेली आहे. दि.३१/०३/२०१२ रोजी संगणक प्रणालीत १८०७ इतक्या औषधांची संख्या औषध भांडारात असून खरेदी दराने मुल्यांकन केले असता एकुण किमंत रु.३,०४,७४,०६१.०७ व इतर वार्ड/ओ.टी. मध्ये रु.३९,००,४४०/- असा एकूण रु.३,४३,७४,५०१.०७ मात्रचा औषध साठा आहे. त्यापैकी मुख्य औषध भांडारात ४५ औषधे ही संगणक साठयापेक्षा कमी आढळून आली असून, त्यांची किमंत रु.२३,५६६.७५ इतकी आह, तर १३ औषधे ही साठा संगणक साठयापेक्षा जास्त आढळून आली असून, त्यांची किंमत रु.१७,४८०/- इतकी आहे. याचा प्रत्यक्ष मेळ घातला असता वर्षभरात निव्वळ रु.६,०८७/- मात्रची औषधे कमी आढळून आलेली आहेत.

वॉर्ड / विभागात देतांना प्रत्यक्ष मोजुन देणे यामुळे तफावत दिसुन येते. तसेच देवाण घेवाणमध्ये समजून न येणाऱ्या व मोजण्यातही कधी-कधी चुका होऊ शकतात. त्यामुळे वरीलप्रमाणे तफावत दिसून येते.

तरी दि.३१/०३/२०१२ रोजी औषध भांडारात असलेल्या संगणक साठयाशी केलेल्या प्रत्यक्ष साठा पडताळणी अहवालामध्ये कमी दिसून आलेल्या नोंदी संगणक साठयामधून निर्लिखित करणेस व ज्या औषधांचा साठा संगणक साठयापेक्षा जास्त आहे त्या नोंदी संगणकात जमा घेण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७५९ यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.३१/०३/२०१२ रोजी औषध भांडारात असलेल्या संगणक साठयाशी केलेल्या प्रत्यक्ष साठा पडताळणी अहवालामध्ये कमी दिसून आलेल्या नोंदी संगणक साठयामधून निर्लिखित करणेस व ज्या औषधांचा साठा संगणक साठयापेक्षा जास्त आहे त्या नोंदी संगणकात जमा घेण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३९ दि.२८.०८.२०१२ रोजी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी सन २०१२-२०१३ या वर्षातील On Consignment Basis वरील साहित्य (PART-B) खरेदीकामी प्राप्त निविदाधारकांसोबत झालेल्या चर्चा/वाटाघाटीचे इतिवृत्त.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा रुग्णालयासाठी सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता लागणाऱ्या वार्षिक औषधे / सर्जिकल साहित्य / On Consignment basis वरील साहित्य खरेदीकामी अंदाजे रु.४०,५५,५६,३८८/- चे खर्चाचा प्रस्ताव दि.०६/०४/२०१२ रोजीचे मा. त्रीसदस्य समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरहू सभेत On Consignment basis वरील साहित्य खरेदीकामी अंदाजे एकुण रक्कम रु.१५,००,००,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली असून विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन थेट उत्पादक कंपन्यांना संस्थान खर्चाने पत्र पाठविण्यात यावे व संस्थानचे संकेत स्थळावर देखील निविदा देण्यात यावी, असे ठरले होते.

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी इंडियन एक्सप्रेस - मुंबई, गावकरी - नाशिक, लोकमत - औरंगाबाद, नवभारत - नागपुर, गुजरात समाचार - अहमदाबाद तर सकाळ - पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच संस्थानच्या संकेत स्थळावर निविदा देण्यात आली होती. Consignment basis वरील साहित्याकरीता एकुण ३९ अधिकृत विक्रेते / कंपन्याना इकडील पत्र क्र.८०१ दि.१४/०५/२०१२ अन्वये जाहिरातीबद्दल अवगत करण्यात आले होते. त्यानुसार दि.१४/०५/२०१२ ते दि. ३०/०५/२०१२ अखेर संस्थानचे शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात निविदा फॉर्म विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.०१/०६/२०१२ अखेर सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती.

त्यानुसार सदरच्या जाहिरातीस अनुसरुन व संस्थानचे संकेत स्थळावरुन देखील निविदा घेण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार शिर्डी व मुंबई कार्यालयात प्राप्त झालेल्या सिलबंद निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | ठिकाण | प्राप्त झालेल्या निविदा |
|---|---|---|
| १ | शिरडी कार्यालय | २० |
| २ | मुंबई कार्यालय | २४ |
| | **एकुण निविदा** | **४४** |

| S.N. | Name of Tenderer | S.N. | Name of Tenderer |
|---|---|---|---|
| 1 | A.D. Corporation, Mumbai | 12 | Choksi Imaging Limited, Mumbai |
| 2 | Advance Cardiologix, Mumbai (2 Envelope) | 13 | Cosmos Enterprises, Mumbai |
| 3 | Advance Technologies, Bhopal | 14 | Critical Care Systems, Pune |
| 4 | Advance Vascular Technologies, Thane | 15 | Deepak Enterprises, Pune |
| 5 | B.L. Lifesciences Pvt. Ltd., New Delhi | 16 | Galaxy Medical Devices Pvt. Ltd., Mumbai |
| 6 | Biomedicon Systems (I) Pvt. Ltd., Mumbai | 17 | Globus Medical (I) Pvt. Ltd., Chennai |
| 7 | Biorad Medisys Pvt.Ltd., Mumbai | 18 | Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat |
| 8 | Biosciences Medical Devices India Pvt.Ltd., Thane | 19 | Hexacath India, Pune |
| 9 | Boston Scientific India Pvt. Ltd., Gurgaon | 20 | Human Touch Technologies, Pune |
| 10 | Cardiotech, Pune | 21 | Icon Meditech Pvt.Ltd.,Pune |
| 11 | Care & Cure Orthosystems, Nashik | 22 | Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune |
| 23 | Meditech Systems, Aurangabad | 35 | Shivam Trading Company, Mumbai |
| 24 | Multimedics, Ahmedabad | 36 | Shree Pacetronix Ltd., Pithampur Dist Dhar (MP) |
| 25 | Om Health Solution Pvt. Ltd., Surat | 37 | Simran Lifesciences, Mumbai |
| 26 | Panacea Biomedicals, Pune | 38 | Steranco Health Care Pvt.Ltd., Mumbai |
| 27 | Panacea Medicare, Pune | 39 | Swami Enterprises, Pune |
| 28 | Parshwanath Distributors, Mumbai | 40 | TTK Healthcare Ltd., Mumbai |
| 29 | Relisys Medical Devices Ltd., Ibrahimpatnam (Hyderabad) | 41 | Unimark Remedies Limited, Mumbai (2 Envelope) |
| 30 | Sahajananad Medical Technologies Pvt. Ltd., Surat | 42 | Vascular Concepts Ltd., Mumbai |
| 31 | Sai Medical Systems, Bhopal | 43 | Vasmed Technologies, Vasai(E)-Thane |
| 32 | Saili Surgicals, Shirdi | 44 | Yogi Kripa Medi Chem Pvt., Mumbai |
| 33 | Sarv Healthcare Pvt.Ltd., Mumbai | 45 | M/s. Saturn Healthcare Pvt., Mumbai |
| 34 | Seva Medical Equipment Pvt. Ltd., Pune | 46 | Palmaz Blue Technologies, Wagholi-Pune |

M/s. Saturn Healthcare Pvt., Mumbai व Palmaz Blue Technologies, Wagholi-Pune या दोनही निविदाधारकांनी निविदेच्या पाकीटावर PART A (वार्षिक औषधे खरेदी) व PART B (On consignment basis वरील साहित्य) असे नमुद केलेले नव्हते त्यामुळे सदर दोन्ही निविदा औषधे खरेदीकामीच्या निविदामध्ये PART A समजून दि.०८/०६/२०१२ रोजी मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडण्यात आल्या होत्या. त्यापैकी M/s. Saturn Healthcare Pvt., Mumbai यांची उघडलेली निविदा तपासली असता ती THR Set करीता नसून ती THR चे ऑपरेशन करीता लागणारी सर्जिकल इन्स्ट्रुमेंट करीता आहे त्यामुळे सदर निविदेचा विचार करण्यात आलेला नाही. तर Palmaz Blue Technologies, Wagholi-Pune यांची निविदा PART A व PART B ची असल्यामुळे तीचा विचार दोन्ही ठिकाणी करणेत आलेला आहे.

तर उर्वरीत ४४ सिलबंद निविदा दि.१९/०६/२०१२ रोजी उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत, अशा एकुण ४५ निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून तो सोबत सादर केलेला आहे.

दि.१८/०७/२०१२ चे सभेत सदरहू चर्चा / वाटाघाटीसाठी मा. जिल्हा शल्य चिकित्सक, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकिय संचालक, वैद्यकिय प्रशासक यांची समिती गठित करण्यात आलेली आहे.

त्यानुसार आजचे सभेपुढे तज्ञ सल्लागार म्हणून बोलविण्यात आलेले तज्ञ डॉ. रविंद्र निटुरकर जिल्हा शल्य चिकित्सक यांचे वतीने डॉ. माने व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. खरात यांचे वतीने डॉ. नागरगोजे, तसेच बी जे. मेडीकज कॉलेज पुणे येथील आर्थोपेडीक सर्जन डॉ. बारटक्के हे उपस्थित होते. वरील तज्ञ व वैद्यकिय संचालक यांचे समवेत उपस्थित एकुण ४५ निविदाधारकांना आजचे सभेपुढे बोलविण्यात आलेले होते. त्यापैकी एकूण ४२ निविदा धारक उपसिथत होते प्रत्येक निविदाधारकास समक्ष बोलावून निविदेत देऊ केलेल्या मुळ दरावर संस्थानचे धर्मादाय रुग्णालयाकरीता अजुन किती सुट देऊ शकाल ती आपण दयावी असे सांगण्यात येऊन त्यांचेकडून त्यांनी निविदेत दिलेल्या आयटमचा तक्ता देऊन त्यावर त्यांची सुट लिखीत स्वरुपात घेण्यात आली त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Name of Tenderer | Discount | Sr. No. | Name of Tenderer | Discount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | A.D. Corporation, Mumbai | Item Wise | 24 | Multimedics, Ahmedabad | Item Wise |
| 2 | Advance Cardiologix, Mumbai | Item Wise | 25 | Om Health Solution Pvt. Ltd., Surat | Item Wise |
| 3 | Advance Technologies, Bhopal | Item Wise | 26 | Palmaz Blue Technologies, Wagholi-Pune | Item Wise |
| 4 | Advance Vascular Technologies, Thane | Item Wise | 27 | Panacea Biomedicals, Pune | Item Wise |
| 5 | B.L. Lifesciences Pvt. Ltd., New Delhi | Item Wise | 28 | Panacea Medicare, Pune | Item Wise |
| 6 | Biomedicon Systems (I) Pvt. Ltd., Mumbai | Item Wise | 29 | Parshwanath Distributors, Mumbai | Item Wise |
| 7 | Biorad Medisys Pvt.Ltd., Mumbai | 2% | 30 | Relisys Medical Devices Ltd., Ibrahimpatnam (Hyderabad) | Item Wise |
| 8 | Biosciences Medical Devices India Pvt.Ltd., Thane | Item Wise | 31 | Sahajananad Medical Technologies Pvt. Ltd., Surat | Item Wise |
| 9 | Boston Scientific India Pvt. Ltd., Gurgaon | Item Wise | 32 | Sai Medical Systems, Bhopal | Item Wise |
| 10 | Cardiotech, Pune | Absent | 33 | Saili Surgicals, Shirdi | Item Wise |
| 11 | Care & Cure Orthosystems, Nashik | Item Wise | 34 | Sarv Healthcare Pvt.Ltd., Mumbai | Item Wise |
| 12 | Choksi Imaging Limited, Mumbai | Item Wise | 35 | Seva Medical Equipment Pvt. Ltd., Pune | Item Wise |
| 13 | Cosmos Enterprises, Mumbai | Item Wise | 36 | Shivam Trading Company, Mumbai | Item Wise |
| 14 | Critical Care Systems, Pune | Item Wise | 37 | Shree Pacetronix Ltd., Pithampur Dist Dhar (MP) | Item Wise |
| 15 | Deepak Enterprises, Pune | Item Wise | 38 | Simran Lifesciences, Mumbai | Item Wise |
| 16 | Galaxy Medical Devices Pvt. Ltd., Mumbai | Item Wise | 39 | Steranco Health Care Pvt.Ltd., Mumbai | Item Wise |
| 17 | Globus Medical (I) Pvt. Ltd., Chennai | Absent | 40 | Swami Enterprises, Pune | Absent |
| 18 | Heart Beat Intervention Pvt. Ltd., Surat | Item Wise | 41 | TTK Healthcare Ltd., Mumbai | 5% |
| 19 | Hexacath India, Pune | Item Wise | 42 | Unimark Remedies Limited, Mumbai | Item Wise |
| 20 | Human Touch Technologies, Pune | 5% | 43 | Vascular Concepts Ltd., Mumbai | Item Wise |
| 21 | Icon Meditech Pvt.Ltd., Pune | 1% | 44 | Vasmed Technologies, Vasai (E)-Thane | Item Wise |
| 22 | Kanchan Drugs Pvt.Ltd., Pune | Item Wise | 45 | Yogi Kripa Medi Chem Pvt., Mumbai | Item Wise |
| 23 | Meditech Systems, Aurangabad | Item Wise | | | |

यावर चर्चा होऊन, प्राप्त झालेल्या निविदाधारकांनी देऊ केलेल्या कंपन्यापैकी नामांकित कंपनी, वापर करणारे डॉक्टरांच्या शिफारशी, राजीवन गांधी जीवनदायी योजनेमध्ये करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रियासाठी मंजूर केलेली रक्कम, मागील वर्षीचा वापराचा / वेळेवर पुरवठ्या बाबतचा अनुभव किंवा ज्या रुग्णांना स्वत: पैसे भरुन शस्त्रक्रिया करावयाची असेल तर अशा रुग्णांना लागणारे साहित्य इ. सर्व बाबींचा विचार करुन वैद्यकिय संचालक यांनी साहित्याची निवड करुन ती एक वर्षाकरीता On Consignment Basis वर ठेवून रुग्णांना वापरण्यात यावीत.

तसेच निवड केलेल्या Stent / Valve / Balloon / Pacemaker / THR / TKR Set / Neuro Surgery Implant etc. व्यतिरिक्त काही विशिष्ट प्रकारच्या शस्त्रक्रियेसाठी Stent / Valve /

Balloon / Pacemaker / THR / TKR Set / Neuro Surgery Implant etc. ची संबंधीत सर्जन यांनी मागणी केली व त्यासाठी तुलनात्मक तक्त्यात दर प्राप्त झालेले आहे, तर ती वैद्यकिय संचालक यांचे पूर्व परवानगीने तुलनात्मक तक्त्यातील प्राप्त दराने खरेदी करुन देऊन मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करावीत.

वैद्यकिय संचालक यांनी महाराष्ट्र शासनाचे जीवनदायी योजनेअंतर्गत मंजुर होत असलेल्या Stent / Valve / Balloon / Pacemaker / Devices इत्यादीची स्वतंत्र यादी तर जीवनदायी योजने व्यतिरीक्त Payment करणाऱ्या रुग्णांसाठी वापरावयाचे Stent / Valve / Balloon / Pacemaker / Devices इत्यादीची स्वतंत्र यादी संबंधित विभागास कळविण्यात यावी असे ठरले.

**निर्णय क्र.७६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२८.०८.२०१२ रोजी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी सन २०१२-२०१३ या वर्षातील On Consignment Basis वरील साहित्य (PART-B) खरेदीकामी प्राप्त निविदाधारकांसोबत झालेल्या चर्चा/वाटाघाटी करुन घेण्यात आलेल्या उपरोक्त निर्णयास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४०** **दि.१६.०८.२०१२ ते १५.०८.२०१३ अखेर अतिथी गृह येथील टाटा स्कायची कनेक्शन फी भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि. १७/०५/२००९ रोजी मा. व्य.समितीचे सभेत विषय नं.४८८ अन्वये मान्यता मिळाल्याने संस्थानच्या अतिथी गृहातील २५ रूममध्ये टाटा स्कायचे कनेक्शन घेण्यात आलेले आहे. यापुर्वी टाटा स्काय रीचार्ज करीता भरलेल्या फि ची मुदत दि. १५/०८/२०१२ रोजी संपत असल्यामूळे पुढील दि. १६/०८/२०१२ ते दि. १५/०८/२०१३ या वर्षाकरीता धमाल मीक्स पॅक मध्ये असलेले ७२ चॅनल व ११ तेलगू भाषीक असे एकुण ८३ चॅनलचा दर प्रत्येक महीन्याला २००/- रू. इतका आहे. ११ महिन्यांची फी भरल्यानंतर १ महीना मोफत मिळतो. दरमहा २००/- रू.x ११ महिने = २२०० रू. फी १ रूमकरीता १२ महिन्यांची आहे.

२२००x२५रूम = ५५,०००/- रूपये इतकी फी २५ रूमकरीता भरावी लागणार आहे.

टाटा स्काय चे अधिकृत डिलर रूपचंद भागचंद कासलीवाल, श्रीरामपूर यांनी १ वर्षाकरीता २५ रूम्सच्या फी कनेक्शनकरीता रूपये ५५,०००/- चे कोटेशन दिलेले आहे.परंतु दि.२०/०८/२०१२ चे पत्रानुसार श्री कासलीवाल यांनी ग्रुप रिचार्जमुळे एकुण खर्च ४७,०८० इतका केलेला असल्याने या रकमेचा चेक अथवा डि.डि.मिळणेस विनंती केली आहे. त्यानुसार संबंधीत पार्टीने रिचार्ज करुन बिल क्र.१००६ने दि. २०/०८/२०१२ अन्वये रक्कम रु.४७०८०/- ची मागणी केली आहे.

तरी, उपरोक्त प्रमाणे फी भरणे पोटी येणा-या रू. ४७०८०/- (सत्तेचाळीस हजार ऐंशी रुपये मात्र) चे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळावी हि विनंती.

**निर्णय क्र.७६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१६.०८.२०१२ ते १५.०८.२०१३ अखेर अतिथी गृह येथील टाटा स्कायचे कनेक्शनसाठी टाटा स्कायचे अधिकृत डिलर श्री.रुपचंद भागचंद कासलीवाल, श्रीरामपुर यांना १ वर्षाकरीताचे कनेक्शन फी भरणेपोटी येणारी रक्कम रू. ४७,०८०/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- ध्वनिक्षेपन विभागप्रमुख)

---

**विषय नं.४१** **साईआश्रम प्रकल्प पॅकेज- २ इमारतीचे प्लंबींग कामाचे टेस्टींग करणेकामी पाणी पुरवठा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम प्रकल्प पॅकेज- २ मधील पिण्याच्या टाकीमध्ये प्लंबींग कामाचे टेस्टींग करणेकामी पाणी पुरवठा करणेकामी जवळचा पर्याय म्हणून संस्थानने खरेदी केलेल्या गट नं. १८२ पैकीचे क्षेत्रातील विहीर आहे. सदर विहीरीतून साईआश्रम प्रकल्प पॅकेज- २ चे अंतर १४०० मी. आहे. सदरच्या विहीरीत मुबलक पाणी असल्याने सदर विहीरीतून पाणी उचलून पी.व्ही.सी. सायफनव्दारे साईआश्रम प्रकल्प पॅकेज- २ चे पाण्याचे टाकीत साठविणेसाठी ४"व्यासाचे नामांकित कंपनीचे पी.व्ही.सी.पाईप खरेदी करणेसाठी व जे.सी.बी.मशिनव्दारे ३ फुट खोलीपर्यंत नाली खोदणे व पाईप टाकल्यानंतर नाली पुर्ववत बुजविणे इ. तत्सम कामांसाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८.०४.२०१२, विषय नं.०९, निर्णय क्रं.३६८ अन्वये अंदाजे रक्कम रु. १,८५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता घेण्यात आलेली होती.

सदरच्या विहीरीतून पाणी उचलून पी.व्ही.सी. सायफनव्दारे साईआश्रम प्रकल्प पॅकेज- २ चे पाण्याचे टाकीत साठविणेसाठी ४" व्यासाचे नामांकित कंपनीचे पी.व्ही.सी.पाईप व इतर साहीत्य खरेदी करणेसाठी व जे.सी.बी.मशिनव्दारे ३ फुट खोलीपर्यंत नाली खोदणे व पाईप टाकल्यानंतर नाली पुर्ववत बुजविणे इ. कामांसाठी विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून न्युनतम दराचे दरपत्रक धारकांकडुन साहित्य व जे.सी.बी. मशिन भाडोत्री लावून काम पुर्ण करण्यात आलेले आहे. सदरचे काम पुर्ण करणेसाठी आलेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**अ) ४" व्यासाचे पी.व्ही.सी.पाईप व इतर साहीत्य खरेदी करणेसाठी आलेल्या खर्चाचा तपशिलः-**

| अ.नं. | एजन्सी / दुकानाचे नांव | मटेरियल तपशिल | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | जैन इरिगेशन सिस्टिम लि. जळगांव. बील नं. SSVS /३००७/०७. | १) ४" पि.व्ही.सी.पाईप. | २२५ नग. | रु.६८३/- प्रती नग. | १,५३,६७५.०० |
| | | २) ४" पि.व्ही.सी. बेंड. | २० नग. | रु. २०६/- प्रती नग. | ४,१२०.०० |
| | | ३) पि.व्ही.सी. सोल्युशन. | ०३ लिटर. | रु. २६३/- प्रती लिटर. | ७८९.०० |
| | | ४) सर्व्हिस सॅडल. | ०४ नग. | रु. ७०/- प्रती नग. | २८०.०० |
| | | ५) ऐअर व्हॉल. | ०४ नग. | रु. ४९२/- प्रती नग. | १,९६८.०० |
| | | ६) स्टॅंड. | ०४ नग. | रु. ९०/- प्रती नग. | ३६०.०० |
| | | | | एकूण- | **१,६१,१९२.००** |

**ब) जे.सी.बी.मशिन भाडोत्री लावणेस पहिल्या टप्प्यात आलेल्या खर्चाचा तपशिलः-**

| अ. नं. | जे.सी.बी. धारकाचे नांव | मटेरियल तपशिल | परिमाण/एकक | दर प्रती तास. | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साई अर्थ मुव्हर्स, साकुरी, ता. राहाता | जे.सी.बी.मशिनव्दारे ३ फुट खोलीपर्यंत नाली खोदकाम करणे व नाली पुर्ववत बुजविणे. | ४३ तास | रु. ५५०.०० | २३,६५०.०० |
| | | | | **एकूण-** | **२३,६५०.००** |

**क) जे.सी.बी.मशिन भाडोत्री लावणेस दुसऱ्या टप्प्यात आलेल्या खर्चाचा तपशिलः-**

| अ.नं. | जे.सी.बी. धारकाचे नांव | मटेरियल तपशिल | परिमाण/एकक | दर प्रती तास. | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साई अर्थ मुव्हर्स, साकुरी, ता. राहाता | जे.सी.बी.मशिनव्दारे ३ फुट खोलीपर्यंत नाली खोदकाम करणे व नाली पुर्ववत बुजविणे. | ४१ तास ३० मिनीटे. | रु. ५५०.०० | २२,८२५.०० |
| | | | | **एकूण-** | **२२,८२५.००** |

साईआश्रम प्रकल्प पॅकेज- २ चे पाण्याचे टाकीत साठविणेसाठी ४"व्यासाचे पी.व्ही.सी.पाईप व इतर साहित्य खरेदी करणेसाठी तसेच जे.सी.बी.मशिनव्दारे ३ फुट खोलीपर्यंत नाली खोदणे व पाईप टाकल्यानंतर नाली पुर्ववत बुजविणे इ. तत्सम कामांसाठी अ) रु. १,६१,१९२/-, ब) रु. २३,६५०/- व क) रु. २२,८२५/- नुसार एकुण रुपये २,०७,६६७/- मात्र खर्च आलेला आहे. मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२८.०४.२०१२, विषय नं.०९, निर्णय क्रं.३६८ अन्वये अंदाजे रक्कम रु. १,८५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता घेण्यात आलेली होती. म्हणजेच वरील काम पुर्ण करणेसाठी रु. २२,६६७/- मात्र अतिरिक्त खर्च आलेला आहे.

वरीलप्रमाणे **'अ'** तसेच **'ब'** प्रमाणे आलेल्या खर्चाची बीले संबंधीतांना आदा करण्यात आलेली असून **'क'** प्रमाणे आलेल्या खर्चाचे बील आदा करणे बाकी आहेत.

तरी सदरचे 'क' प्रमाणे आलेले बील आदा करणेस व वरील काम पुर्ण करणेसाठी झालेल्या अतिरिक्त खर्च रु. २२,६६७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.७६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.४२ सन २०१२-१३ करीता ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाचे कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचिंग पावडर विक्रम (ग्रासीम) ब्रॅंड डी.सी.एच.(डी.एस.सी.एल.) आय.एस.आय. मार्क ३४ % क्लोरीन उपलब्ध, फेरीक ॲलम- १६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध व क्लोरीन गॅस सिलेंडर (१०० किलोचे) यांची दैनंदिन आवश्यकता भासते. मागील वर्षी आपण मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार वार्षिक खरेदीमध्ये निविदा मागवून नियमानुसार खरेदी केलेली आहे. सदरच्या मटेरियलचा झालेला खर्च तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | मागणी कालावधी | मागणी | फेब्रुवारी २०१२ ते ऑगस्ट २०१२ अखेर खर्च | शिल्लक येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ब्लीचिंग पावडर. | डिसेंबर २०११ ते नोव्हेंबर २०१२ | ३५ टन | १३ टन ६२५ किलो. | २१ टन ३७५ किलो. |
| ०२. | फेरीक ॲलम. | डिसेंबर २०११ ते नोव्हेंबर २०१२ | ६० टन. | २५ टन ७० किलो. | ३४ टन ३०० किलो. |
| ०३. | क्लोरीन गॅस सिलेंडर. | डिसेंबर २०११ ते नोव्हेंबर २०१२ | ४० सिलेंडर. | २२ सिलेंडर. | १८ सिलेंडर |

पुढील वर्षासाठी सन २०१२-२०१३ करीता नविन निविदा मागवून मटेरियल खरेदी करणे आवश्यक आहे. त्यात खालील प्रमाणे मटेरियलची आवश्यकता आहे.

| अ.नं. | तपशिल | आवश्यकता | अंदाजे दर | एकुण रक्कम |
| --- | --- | --- | --- | --- |
| ०१. | **ब्लीचिंग पावडर.**<br>विक्रम (ग्रासीम) ब्रँड डी.सी.एच. (डी.एस.सी.एल.) आय.एस.आय. मार्क ३४ % क्लोरीन उपलब्ध. | ३५ टन. | रु.१६,०००/- प्रती टन. १२.५ % वॅटसह. | ५,६०,०००.०० |
| ०२. | **फेरीक ॲलम.**<br>(१६% ॲलोमिना फेरीक उपलब्ध) | ६० टन. | रु.७,०००/- प्रती टन. १२.५ % वॅटसह. | ४,२०,०००.०० |
| ०३. | क्लोरीन गॅस सिलेंडर.<br>(प्रत्येकी १०० किलोचे) | ४० सिलेंडर. | रु.४,५००/- प्रती सिलेंडर ४ % वॅटसह. | १,८०,०००.०० |
| | | | **अंदाजे एकुण खर्च -** | **११,६०,०००.००** |

मागील वर्षाप्रमाणेच ॲलम, ब्लीचिंग व क्लोरीन गॅस सिलेंडरची मागणी करण्यात आलेली आहे. तरी वरील प्रमाणे सन २०१२ ते २०१३ करीता पाणी शुध्दीकरणांसाठी लागणारे मटेरियल विहित पध्दतीने खरेदी विभागामार्फत निविदा मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणा-या अंदाजे रु. ११,६०,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.७६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१२ -१३ करीता ब्लीचिंग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर विहीत पध्दतीने निविदा मागणी करुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ११,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.४३ कनकुरी साठवण तलाव येथील फिल्टर वॉशचे पाणी जाणेसाठी टाकण्यात आलेल्या नळया बदली करणेस व ओढा (नाला नं.३३) उकरणेस व येणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** कनकुरी साठवण येथील पाणी शुध्दीकरणांसाठी बनविण्यात आलेल्या फिल्टरची साफ-सफाई करतेवेळी त्यातील अशुध्द पाणी बाहेर सोडणेसाठी फिल्टर प्लँट ते ओढा या दरम्यान २०० फुट लांबीची १ फुटी आर.सी.सी. पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे. सदरच्या नळयांची साईज कमी असल्यामुळे त्यातुन पुर्ण क्षमतेने पाणी वाहत नसल्यामुळे फिल्टर वॉश करतेवेळी मोठया प्रमाणावर अडचणी येतात. फिल्टरमधील अशुध्द पाणी पुर्ण क्षमतेने बाहेर सोडणेसाठी पुर्वी टाकण्यात आलेल्या १ फुटी आर.सी.सी.पाईप बदली करुन त्या ठिकाणी २.१/२ फुटी आर.सी.सी. पाईप टाकल्यास फिल्टर वॉश करणे सोईचे होईल. यासाठी आवश्यक असणारे २.१/२ फुटी आर.सी.सी. पाईप पाणी पुरवठा विभागाकडे कनकुरी साठवण तलाव येथे उपलब्ध असून आपणास त्याठिकाणी खोदाई करुन पुर्वीचे १ फुटी आर.सी.सी. पाईप पाईप काढुन त्याजागी नविन २.१/२ फुटी आर.सी.सी. पाईप टाकावे लागतील. सदरचे काम करणेसाठी खोदाई भाडोत्री जे.सी.बी. मशिनच्या साहय्याने करुन त्यासाठी आवश्यक सिमेंट व वाळू इ. मटेरियल बांधकाम विभागाकडुन उपलब्ध झाल्यास नविन २.१/२ फुटी आर.सी.सी. पाईपलाईन टाकणेचे काम पाणी पुरवठा विभागांतर्गत करता येईल.

तसेच साठवण तलावाचे दक्षिण बाजूस नाला नं.३३ असून सदरच्या नाल्यामध्ये फिल्टर वॉश करतांना त्यातील अशुध्द पाणी सोडण्यात येते. तसेच पावसाळयात परिसरातील जमा झालेले अतिरिक्त पाणी या नाल्यातून वाहते.

नाल्यातून कायम पाणी सोडल्यामुळे या नाल्यामध्ये माती साचून नाला उथळ झालेला आहे. तसेच त्यामध्ये मोठया प्रमाणावर गवत व झुडपे वाढल्यामुळे नाल्यातून पाणी वाहत नाही. फिल्टर वॉश करतेवेळी बाहेर सोडण्यात येणारे पाणी नाला उथळ झाल्यामुळे व त्यामध्ये मोठया प्रमाणावर माती साठून राहिल्यामुळे बाहेर वाहून न जाता पुन्हा फिल्टरमध्ये येते. त्यामळे फिल्टरची साफ-सफाई व्यवस्थित होत नाही. तसेच नाल्याशेजारील शेतात पाणी पसरते. जादा प्रमाणात अशुध्द पाणी फिल्टरमध्ये आल्यास फिल्टरमधील पाणी अशुध्द होण्याची शक्यता आहे. याकरीता सदरचा नाला जे.सी.बी. मशिनच्या साहय्याने उकरुन त्यातील माती ही हायड्रोलिक ट्रॉली असलेल्या ट्रॅक्टरने वाहून टाकावी लागणार आहे. यापुर्वी नाला नं. ३३ उकरणेचे काम संस्थानमार्फत सन २००९-२०१० मध्ये करण्यात आलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे कामे करणेसाठी जे.सी.बी. मशिन भाडोत्री लावावयाचे झाल्यास अंदाजे रु.७००/- प्रती तास याप्रमाणे ६० तासांकरीता रु. ४२,०००/- मात्र व माती वाहून टाकणेसाठी ट्रॅक्टरकरीता अंदाजे रु. २००/- प्रती ट्रीप याप्रमाणे साधारणत: अंदाजे १०० ट्रीप गृहीत धरल्यास त्याकरीता अंदाजे रु. २०,०००/- असा एकुण अंदाजे रु. ६२,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचे काम करणेसाठी जे.सी.बी.मशिन व दोन ट्रॅक्टर कोटेशन मागवून भाडोत्री लावणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रु. ६२,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.७६४ यावर सविस्तर चर्चा होऊन, कनकुरी साठवण तलाव येथील फिल्टर वॉशचे पाणी जाणेसाठी टाकण्यात आलेल्या नळया बदली करणेस व ओढा (नाला नं.३३) उकरणे या कामांसाठी जे.सी.बी.मशिन व दोन ट्रॅक्टर कोटेशन मागवून भाडोत्री लावणेस व त्यासाठी येणारे अंदाजे एकुण रु. ६२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.४४ साईआश्रम भाग १ व भाग- २ कडे स्टँडबाय लिफ्ट बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ या प्रकल्पांकडील सर्व कामे जवळपास पुर्णत्वास आलेली असून दोन्ही प्रकल्प लवकरच साई भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी चालू करण्याचा संस्थानचा प्रयत्न आहे. सदरील प्रकल्पांचे उद्‌घाटन सन्माननिय महोदय, मा.राष्ट्रपती यांचे हस्ते करण्याचे प्रायोजित असल्याने मा.मंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांनी दिनांक २०-०८-२०१२ रोजी साईआश्रम येथे येऊन कामाचा पाहणी दौरा केला व त्याचदिवशी मा.श्री.रमणी सर, मा.कार्यकारी अधिकारी साहेब व मा.उप कार्यकारी अधिकारी साहेब यांनी कामाच्या आढाव्या संबंधी विभाग प्रमुख यांची मिटींग घेतली. सदर मिटींगमध्ये दोन्ही साईआश्रमकडे सर्व इमारतींमध्ये स्टँडबाय लिफ्ट बसविणेबाबत चर्चा झाली.

सध्या साईआश्रम भाग-०१ कडे १३ नग लिफ्ट व साईआश्रम भाग-०२ कडे ०७ नग लिफ्ट अशा एकुण २० नग लिफ्ट बसविण्यात आलेल्या आहेत. साईआश्रम इमारतीच्या प्रत्येक इमारतीमध्ये सध्या एक लिफ्ट बसविण्यात आलेली आहे. एक लिफ्ट नादुरुस्त झाल्यास पर्यायी व्यवस्थेकरीता एक स्टँडबाय लिफ्ट असणे गरजेचे आहे. स्टँडबाय लिफ्ट बसविणेकरीता प्रत्येक इमारतीमध्ये डक्ट तयार आहेत. साईआश्रम भाग-०१ कडे १३ नग लिफ्ट व साईआश्रम भाग-०२ कडे ०७ नग लिफ्ट अशा एकुण २० नग स्टँडबाय लिफ्ट बसवाव्या लागणार आहेत. बसवाव्या लागणा-या लिफ्टचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Discription | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01) | Supplying, Erecting and Commissioning of electrically operated Lift. | 20 Nos. | Rs. 16,00,000/- | Rs. 3,20,00,000/- |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ कडे स्टँडबाय लिफ्ट बसविणेकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागवून लिफ्ट बसविण्याचे काम करुन घ्यावे लागणार आहे. सदरील कामास व रक्कम रु.३,२०,००,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७६५ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भाग १ व भाग- २ कडे स्टँडबाय लिफ्ट बसविणेकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन टेंडर मागविणेस व याकामी येणाऱ्या रु.३,२०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४५ श्री साईप्रसादालयाचे कार्यालयातील दरवाजाकरीता एअर कर्टन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयाचे कार्यालयामध्ये स्प्लिट ए.सी.बसवून कार्यरत आहे. वातानुकुलीत असलेले ठिकाण हे पुर्णपणे बंदिस्त असणे आवश्यक असते. तरच त्या ठिकाणची वातानुकुलीत यंत्रणा सुस्थितीत कार्य करु शकते. अन्यथा सदर यंत्रणा लोडवर राहून वारंवार नादुरुस्त होते.

श्री साई प्रसादालयाचे कार्यालयाचे दोन्ही दरवाजे व तिकीट काऊंटरचा एक दरवाजा सतत उघडे ठेवावे लागतात. त्यामुळे आतील भागात निर्माण झालेली थंड हवा दरवाज्यावाटे बाहेर निघून गेल्याने आतील भागातील तापमान नियंत्रीत होत नाही. परिणामी ए.सी.यंत्रणेवर ताण वाढून आतील भागातील तापमान नियंत्रित करणेसाठी सदर यंत्रणा सतत चालू राहते. पर्यायाने विद्युत खर्च वाढतो आणि सदर यंत्रणा सतत चालल्याने तिचा मेन्टेनन्स खर्चही वाढतो. म्हणून दरवाजांवाटे जाणारी थंड हवा थांबविणे व बाहेरच्या वातावरणातील गरम हवा आतमध्ये येऊ न देणे याकरीता सदर दरवाजांना एअर कर्टन (वायुविभाजक) बसविणे आवश्यक आहे.

श्री साई प्रसादालयाचे कार्यालयातील दरवाजांकरीता खरेदी कराव्या लागणा-या एअर कर्टनचा तपशील पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | ठिकाण | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साई प्रसादालय कार्यालय (दक्षिण दरवाजा) | Supplying and erecting Air Curtain for Sai Prasadalaya capacity 1400 RPM 230 VOLT, 50 HZ, 17 Mtr. Cub Height – 7 feet, Width – Maximum 7 Feet Depth – 1 x 1 feet. | ०१ नग. | रु. ४२,०००.०० | रु. ०,४२,०००.०० |
| ०२) | श्री साई प्रसादालय कार्यालय (पश्चिम दरवाजा) | Supplying and erecting Air Curtain for Sai Prasadalaya capacity 1400 RPM 230 VOLT, 50 HZ, 17 Mtr. Cub Height – 7 feet, Width – Maximum 4 Feet Depth – 1 x 1 feet. | ०१ नग. | रु. २४,०००.०० | रु. ०,२४,०००.०० |
| ०३) | श्री साई प्रसादालय तिकीट काऊंटर (पुर्व दरवाजा) | Supplying and erecting Air Curtain for Sai Prasadalaya capacity 1400 RPM 230 VOLT, 50 HZ, 17 Mtr. Cub Height – 7 feet, Width – Maximum 4 Feet Depth – 1 x 1 feet. | ०१ नग. | रु. २४,०००.०० | रु. ०,२४,०००.०० |
| | | | | **एकुण रक्कम -** | **रु. ९०,०००.००** |

श्री साई प्रसादालयाचे कार्यालय याठिकाणची ए.सी.यंत्रणा सुस्थितीत चालणेकरीता व सदर ठिकाणचे तापमान नियंत्रित राहावे, यासाठी दरवाजांना एअर कर्टन (वायुविभाजक) बसविणेकामी अंदाजे रक्कम रुपये ९०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाचे कार्यालयाची ए.सी.यंत्रणा सुस्थितीत चालणेकरीता व सदर ठिकाणचे तापमान नियंत्रित राहावे, यासाठी दरवाजांना एअर कर्टन (वायुविभाजक) बसविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४६** **साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ प्रकल्पातील सबस्टेशन व जनसेटच्या कामाचे फायनल बील आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७-११-२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेतील विषय क्र.१४ निर्णय क्र.८१२ अन्वये मे.आदिती इलेक्ट्रीकल, नाशिक यांना साई आश्रम भाग-०१ व भाग-०२ प्रकल्पामधील इमारती करीता जनसेट व सबस्टेशनचे कामासाठी उपरोक्त संदर्भ क्र.०१ अन्वये रु. २,२६,०४,१३९/- इतक्या रकमेचे तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १३-०२-२०११ चे सभेतील विषय क्र.०२ निर्णय क्र.०२ (०२) व दिनांक २४-०९-२०११ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.०८ निर्णय क्र.७५० अन्वये साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ प्रकल्पातील एच.टी.केबल अंडरग्राऊंड केबलींगचे कामासाठी रक्कम रु.३६,९५,४८६/- मिळून एकुण रु.२,६२,९९,६२५/- इतक्या रकमेचे काम दिलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६-०४-२०१२ चे सभेतील विषय क्र.६८ निर्णय क्र.३२९ अन्वये मे.आदिती इलेक्ट्रीकल, नाशिक यांना मार्च २०१२ पर्यंत कामाची मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानुसार मे.आदिती इलेक्ट्रीकल, नाशिक यांनी दिलेल्या मुदतीत काम पूर्ण केलेले असून कामाचे रुपये ३,२५,६९,५०१/- इतक्या रकमेचे फायनल बील सादर केलेले आहे. सदरचे झालेले काम संस्थानचे कन्सल्टंट मे.डॉर्स्च कन्सल्टंट प्रा.लि., मुंबई यांनी चेक केलेले असून बील तपासून बीलावर लेखी स्वाक्षरी करुन फायनल बीलाची वाढीव कामासह होणारी रक्कम रु. ३,१२,२१,३००/- आदा करावी म्हणून कळविलेले आहे.

मा.साईभक्त श्री.रमणी सर यांनी वेळोवेळी साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ या प्रकल्पाकडे राऊंड घेऊन दिलेल्या सुचनेनुसार जनसेट व सबस्टेशनच्या कामामध्ये आवश्यक त्याठिकाणी काही बदल करावे लागले तसेच शासनाचे ऑडिटर यांनी संस्थान ऑडिटमध्ये लेखी सुचना दिल्याप्रमाणे प्रत्येक इमारतींचे एनर्जी ऑडीट होणे गरजेचे असल्याने मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेलमध्ये काही बदल करावे लागले. यामुळे तसेच काम पुर्ण करताना काही वाढीव काम करावे लागल्याने झालेल्या जादा कामाच्या रकमेचा समावेश या फायनल बीलामध्ये आहे. ही रक्कम शासनाच्या सी.एस.आर.वर आधारित असून सर्व काम महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.आर.नुसार चेक करण्यात आलेले आहे. कामात कराव्या लागलेल्या जादा कामाच्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे :-

०१). श्री साईबाबा संस्थानचे सर्व विभाग संगणकीकृत करुन संस्थानचा कार्यभार सुरळीत व अधिक सक्षमतेने चालविण्याकरीता श्री साई प्रसादालय येथे साईटेक डाटा सेंटर प्रोजेक्ट राबविण्यात आलेला आहे. दिनांक २४-१२-२०१० रोजी साईटेक प्रोजेक्ट संदर्भात झालेल्या मिटींगमध्ये साईभक्त मा.रमणी सर यांनी मुख्य डाटा सेंटरला काही अडचणी आल्यास पर्यायी डाटा रिकव्हरी सेंटर साई आश्रम येथे सुरु करावयाचे असल्याचे सांगितले. तसेच साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ परिसरातील सर्व इमारतींवर बसविण्यात आलेल्या सोलर बॅकअप गिझर सिस्टिमकरीता सबस्टेशनमधील मेन पॅनेलमध्ये जादा क्षमतेचे अतिरिक्त ब्रेकर बसविणे गरजेचे होते. जेणेकरुन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा सप्लाय बंद झाल्यानंतर पर्यायी व्यवस्था म्हणून दोन्ही जनसेट चालू करुन वीजपुरवठा सुरळीत करणे शक्य होईल. मा.आर्कीटेक्ट यांनी तयार केलेल्या इलेक्ट्रीकल कामाच्या टेंडरमध्ये साईटेक डाटा सेंटर आणि इमारतींवरील सोलर बॅकअप गिझर सिस्टिमच्या वाढीव लोडकरीता जादा क्षमतेच्या ब्रेकरचा मेन पॅनेलमध्ये समावेश केलेला नव्हता. त्यामुळे साईभक्त मा.रमणी सर यांचे मासिक मिटींगमध्ये साईटेक डाटा सेंटर आणि सोलर बॅकअप गिझर सिस्टिम करीता भविष्यात वाढणा-या लोडमुळे मेन पॅनेलमध्ये जादा क्षमतेचे ब्रेकर वापरण्याचे ठरले. आणि सदरचे काम मे.आदिती इलेक्ट्रीकल, नाशिक यांचेकडून त्वरीत पुर्ण करुन घेण्याचे ठरले. त्यानुसार मे.आदिती इलेक्ट्रीकल, नाशिक यांनी सबस्टेशनमधील मेन पॅनेलमध्ये जादा क्षमतेचे ब्रेकर वापरुन मेन पॅनेलमध्ये बसवून काम पूर्ण करुन सप्लाय चालू करुन दिलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

a). साईआश्रम सबस्टेशनमधील मेन पॅनेलमध्ये साईटेक डाटा सेंटरमधील लाईटींग लोडकरीता १०० ॲम्पीअरचे एमसीसीबी वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे फायनल बीलातील अ.क्र.८(A) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रु.९,८९२/- तसेच ९ (A) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रुपये ९,८९२/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

b). साईआश्रम सबस्टेशनमधील मेन पॅनेलमध्ये साईटेक डाटा सेंटरकरीता बसविण्यात येणा-या प्रेसिजन टाईप ए.सी.करीता तसेच पॉवर लोडकरीता २०० ॲम्पीअरचे एमसीसीबी वापरण्यात आलेले आहे. तसेच भविष्यातील साईआश्रम-०२ कडे जर डाटा सेंटरची गरज लागली तर ऐनवेळेस पॅनेलमध्ये बदल करता येणे शक्य नसल्याने आताच ती तरतूद करुन ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे फायनल बीलातील अ.क्र.८(A) मधील ०२ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रु.५१,२४८/- तसेच ९ (A) मधील ०२ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रुपये ५१,२४८/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

c). साईटेक डाटा सेंटर व सोलर सिस्टिम गिझर बॅकअपमुळे वाढलेल्या क्षमतेसाठी मेन पॅनेलमध्ये बसविलेल्या २०० ॲम्पीअर एमसीसीबी व इतर एमसीसीबी करीता हॅण्डल बसविणे गरजेचे असल्याने फायनल बीलातील अ.क्र.८(A) मधील ०३ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रु.६८,९२४/- तसेच ९ (A) मधील ०३ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रुपये ६८,९२४/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

d). साईटेक डाटा सेंटर व सोलर बॅकअप गिझर सिस्टिममुळे वाढलेल्या क्षमतेसाठी मेन पॅनेलमध्ये APFC पॅनेलकरीता ८०० ॲम्पीअरच्या एअर सर्कीट ब्रेकरची आवश्यकता असल्याने सदरचे ब्रेकर वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे फायनल बीलातील अ.क्र.८(B) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रु.२,०४,४९४/- तसेच ९ (B) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रुपये २,०४,४९४/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

e). साईटेक डाटा सेंटर व सोलर बॅकअप गिझर सिस्टिमुळे वाढलेल्या क्षमतेसाठी मेन पॅनेलकडून जनरेटरच्या एएमएफ पॅनेलकडे जाणा-या सप्लायकरीता ८०० ॲम्पीअरच्या एअर सर्कीट ब्रेकरची आवश्यकता असल्याने सदरचे ब्रेकर वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे फायनल बीलातील अ.क्र.८(B) मधील ०२ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रु.२,०४,४९४/- तसेच ९ (B) मधील ०२ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रुपये २,०४,४९४/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

f). साईटेक डाटा सेंटर व सोलर सिस्टिम बॅकअपमुळे वाढलेल्या क्षमतेसाठी मेन पॅनेलमध्ये जनरेटरच्या एएमएफ पॅनेलकडून आलेल्या सप्लायकरीता ८०० ॲम्पीअरच्या एअर सर्कीट ब्रेकरची आवश्यकता असल्याने सदरचे ब्रेकर वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे फायनल बीलातील अ.क्र.८(B) मधील ०३ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रु.२,०४,४९४/- तसेच ९ (B) मधील ०३ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रुपये २,०४,४९४/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

g). साईटेक डाटा सेंटर व सोलर सिस्टिम गिझर बॅकअपमुळे वाढलेल्या क्षमतेसाठी मेन पॅनेलमध्ये ट्रान्सफॉर्मरकडून आलेल्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या सप्लायकरीता १६०० ॲम्पीअरच्या एअर सर्कीट ब्रेकरची आवश्यकता असल्याने सदर ब्रेकर वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे फायनल बीलातील अ.क्र.८(C) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रु.२,७०,६४९/- तसेच ९ (C) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रुपये २,७०,६४९/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

h). साईटेक डाटा सेंटर व सोलर सिस्टिम गिझर बॅकअपमुळे वाढलेल्या क्षमतेसाठी मेन पॅनेल जर फेल झाला तर महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा सप्लाय बायपास करुन इमारतींचा सप्लाय चालू ठेवणेकरीता १६०० ॲम्पीअरच्या एअर सर्कीट ब्रेकरची आवश्यकता असल्याने सदरचे ब्रेकर वापरण्यात आलेले आहे. त्यामुळे फायनल बीलातील अ.क्र.८(C) मधील ०२ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रु.२,७०,६४९/- तसेच ९ (C) मधील ०२ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रुपये २,७०,६४९/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

०२). शासनाचे ऑडिटर यांनी लेखी सुचना दिल्याप्रमाणे प्रत्येक इमारतींचे एनर्जी ऑडिट होणे गरजेचे असल्याने साईआश्रम भाग-०१ व ०२ कडील कामाचे पुर्ततेबाबत झालेल्या मासिक मिटींगमध्ये याबाबत चर्चा झाली. त्याकरीता आवश्यक तेथे एजर्नी मीटर बसविण्याची कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ कडील सबस्टेशनमधील मेन पॅनेलमध्ये एनर्जी ऑडिटकरीता एनर्जी मीटर बसविणे गरजेचे आहे. जेणेकरुन सर्व इमारतींचे एनर्जी ऑडिटची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होऊ शकेल असे सदरच्या मिटींगमध्ये सुचविण्यात आलेले होते. त्यानुसार सदरचे एनर्जी मीटर सबस्टेशनमधील मेन पॅनेलमध्ये बसविणेबाबत मे.आदिती इलेक्ट्रीकल, नाशिक यांना सांगण्यात आलेले होते. मे.आदिती इलेक्ट्रीकल, नाशिक यांना सांगितल्यानुसार

सबस्टेशनमधील मेन पॅनेलमध्ये एनर्जी मीटर बसविणेचे कार्यवाही पुर्ण केलेली आहे. त्याकरीता झ ालेल्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

a). साई आश्रम भाग-०१ व भाग-०२ सबस्टेशनमधील मेन पॅनेलवरील प्रत्येक मेनस्वीच पासून एनर्जी मीटर पर्यंत तसेच एल.टी.करंट ट्रान्सफॉर्मरपासून एनर्जी मीटरपर्यंत २ x २.५ sq.mm. ची वायरींग करावी लागली. त्याकरीता फायनल बीलातील अ.क्र.८(D) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रक्कम रु.७०,००७/- तसेच अ.क्र.९(D) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रुपये ७०,००७/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

b). साई आश्रम भाग-०१ व भाग-०२ सबस्टेशनमधील मेन पॅनेलमध्ये बसविण्यात येणा-या प्रत्येक एनर्जी मीटरकरीता एल.टी.करंट ट्रान्सफॉर्मरची आवश्यकता असल्याने फायनल बीलातील अ.क्र.८(D) मधील ०२ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रक्कम रु.८०,४३८/- तसेच अ.क्र.९(D) मधील ०२ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रुपये ८०,४३८/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

c). साई आश्रम भाग-०१ व भाग-०२ सबस्टेशनमधील मेन पॅनेलमध्ये बसविण्यात येणारे एनर्जी मीटर प्रत्येक मेनस्वीच जवळ न बसविण्यात पॅनेलवर एकाच ठिकाणी सर्व एनर्जी मीटर बसविण्यात आलेले आहे. त्याकरीता मेन पॅनेलमध्ये सेपरेट बसबारची आवश्यकता असल्याने फायनल बीलातील अ.क्र.८(D) मधील ०३ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रक्कम रु.९१,८७२/- तसेच अ.क्र.९(D) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रुपये ९१,८७२/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

d). साई आश्रम भाग-०१ व भाग-०२ सबस्टेशनमधील मेन पॅनेलमध्ये मेनस्वीचकरीता एनर्जी मीटर बसविण्यात आलेले आहेत. त्याकरीता फायनल बीलातील अ.क्र.८(E) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रक्कम रु.१,६७,५८४/- तसेच अ.क्र.९(E) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रुपये १,६७,५८४/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

०३). साई आश्रम भाग-०१ व भाग-०२ सबस्टेशनमधील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा तसेच जनरेटरचा सप्लाय ॲटो / मॅन्युअली बंद चालू होणेकरीता जनरेटरपासून ए.एम.एफ पॅनेलपर्यंत ४ x ४ स्क्वेअर एम.एम.कॉपर केबल वापरण्यात आलेली आहे. तसेच सबस्टेशनमधील ट्रान्सफॉर्मर तसेच व्ही.सी.बी.च्या यंत्रणेकरीता २ x २.५ स्क्वेअर एम.एम.केबल आणि ३२ ॲम्पीअरच्या मेनस्वीच वापरण्यात आलेला आहे. त्याकरीता फायनल बीलातील अ.क्र.८(F) नुसार साई आश्रम भाग-०१ करीता रक्कम रुपये ५८,९५८/- तसेच ९(F) नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रु.५८,९५८/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

०४). मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचे साई आश्रम भाग-०१ कडील जनरेटर व सबस्टेशनचे काम पूर्ण झालेले असल्याने दि.२७ जानेवारी, २०१२ रोजी साईभक्त मा.रमणी सर यांचे हस्ते पुजा करुन जनरेटर व सबस्टेशन रुमची पाहणी केली आणि सुरक्षिततेकरीता तसेच भविष्यात कोणताही अपघात घडू नये, कोणीही कर्मचारी जखमी होऊ नये. याकरीता काही सुचना दिलेल्या आहेत. यामध्ये केबल ट्रेंचवरती चेकर प्लेट बसविणे इत्यादि कामे सुचविलेले होती. तसेच मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांनी जनेरटर सेट बसविण्याचे काम चालू असताना जनरेटर रेडिएटर सिस्टिमकरीता जी.आय.डक्टींग, डिझेल पाईपलाईन आणि सायलेंसर करीता एम.एस. एक्झॉस्ट पाईपिंग इत्यादि कामेही करण्यात आलेली आहे. त्याकरीता झालेल्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

a). साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ कडील चारही जनरेटरसेट रुममध्ये बसविण्यात आल्यामुळे जनरेटरच्या रेडिएटर सिस्टिमकरीता जी.आय.शीट वापरुन डक्टींग करण्यात आले. सदरचे डक्टींग जनरेटरपासून जनरेटर रुमच्या बाहेरपर्यंत तयार करण्यात आल्यामुळे फायनल बीलातील अ.क्र.८(G) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रक्कम रु.५८,१२०/- तसेच अ.क्र.९(G) मधील ०१ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रु.६३,९३२/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

b). साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ कडील चारही जनरेटरसेट रुममध्ये बसविण्यात आल्यामुळे सिस्टिमकरीता एम.एस.पाईप व इतर आयर्न वर्क वापरुन जनरेटरची गरम हवा रुमच्या बाहेर काढण्यात आलेली आहे. तसेच जनरेटरसेटच्या तळाशी असलेली डिझेल टॉकी एअर पकडून असल्याने जनरेटर चालू होण्यास अडचण होत असल्याने वेगळी डिझेल टँक बसविण्यात आलेली आहे. सदर डिझेल टाकीकरीता स्टॅण्ड तयार करण्यात आलेले आहे. तसेच डिझेल टाकीपासून जनरेटर पर्यंत डिझेलकरीता एम.एस.पाईपलाईन करण्यात आलेली आहे. त्याकरीता फायनल बीलातील अ.क्र.८(G) मधील ०२ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रक्कम रु.१,३२,३००/- तसेच अ.क्र.९ (G) मधील ०२ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रु.१,३६,२६९/- इतका खर्च झालेला आहे.

c). साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ कडील सबस्टेशन व जनरेटर रुममध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या पोलमधून क्युबिकल पॅनेलपर्यंत केबल, क्युबीकल पॅनेलपासून व्ही.सी.बी.पॅनेल, व्ही.सी.बी.पॅनेलपासून ट्रान्सफॉर्मर पर्यंत एच.टी.केबल टाकण्यात आलेली आहे. तसेच ट्रान्सफॉर्मरपासून मेन पॅनेलपर्यंत, जनरेटरपासून ए.एम.एफ पॅनेलपर्यंत, ए.एम.एफ.पॅनेल पासून मेन

पॅनेलपर्यंत आणि मेन पॅनेलपासून प्रत्येक इमारतीकरीता टाकण्यात आलेल्या एल.टी.केबलकरीता जनरेटर रुमममध्ये केबल ट्रेंच तयार करण्यात आलेली आहे. या ट्रेंचमध्ये असलेल्या एच.टी.व एल.टी.केबल सुरक्षित राहणेकरीता तसेच भविष्यात कोणताही घडू नये, कोणीही कर्मचारी या ट्रेंचमध्ये पडून जखमी होऊ नये याकरीता मा.रमणी सर यांनी सुचना दिल्याप्रमाणे केबल ट्रेंचवरती चेकर प्लेट बसविण्यात आलेल्या आहेत.त्याकरीता फायनल बीलातील अ.क्र.८(G) मधील ०३ नुसार साईआश्रम भाग-०१ करीता रक्कम रु.४,९५,४६३/- तसेच अ.क्र.९(G) मधील ०३ नुसार साईआश्रम भाग-०२ करीता रक्कम रु.५,२९,२००/- इतका वाढीव खर्च झालेला आहे.

**सारांश :-**

अ). वरील संदर्भीय क्र.०१ च्या कामासंदर्भात विद्युत विभागाची यापूर्वीची टिपणी क्र.१२९० / १४-०२-२०१२ व मा.कार्यकारी अधिकारी कार्यालय आ.नं.८१०/०१ दि.१६-०२-२०१२ अन्वये साईआश्रम भाग-०१ कडील साईटेक प्रोजेक्ट तसेच साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ परिसरातील इमारतींवरील सोलर बॅकअप गिझर सिस्टिममुळे मेन पॅनेलमध्ये कराव्या लागलेल्या बदलाच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत रु.२५,६९,६८९/- इतक्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेसाठी प्रशासनामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतू दि.१९-०२-२०१२ च्या सभेत हा विषय सादर होऊ शकला नाही.

ब). वरील संदर्भीय क्र.०२ च्या कामासंदर्भात विद्युत विभागाची यापूर्वीची टिपणी क्र.१३०० / १५-०२-२०१२ आणि मा.कार्यकारी अधिकारी कार्यालय आवक नं.८१७ / १ दि.१६-०२-२०१२ अन्वये गव्हर्नमेंट ऑडिटर यांचे लेखी सुचनेनुसार साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ कडील प्रत्येक इमारतींचा वीज एनर्जी स्वतंत्रपणे मोजण्याकरीता सबस्टेशनमधील मेन पॅनेलमध्ये बसविण्यात आलेल्या एनर्जी मीटरींग इक्विपमेंटच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत रु.८,१९,८२८/- इतक्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेसाठी प्रशासनामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतू दि.१९-०२-२०१२ च्या सभेत हा विषय सादर होऊ शकला नाही.

क). वरील संदर्भीय क्र.०३ व ०४ च्या कामासंदर्भात विद्युत विभागाची यापूर्वीची टिपणी क्र.१२९५ / १५-०२-२०१२ आणि मा.कार्यकारी अधिकारी कार्यालय आवक नं.८१८ / १ दि.१५-०२-२०१२ अन्वये साईआश्रम भाग-०१ व भाग-०२ कडील सबस्टेशन व जनरेटर रुममध्ये सुरक्षिततेच्या उपायांसाठी कराव्या लागलेल्या वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत रु.९,४९,३७४/- इतक्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेसाठी प्रशासनामार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतू दि.१९-०२-२०१२ च्या सभेत हा विषय सादर होऊ शकला नाही.

उपरोक्तप्रमाणे पूर्वीचे प्रस्ताव (अ+ब+क) एकुण रु.४३,३८,८९१/- इतक्या रकमेचे होते. आता फायनल बील सादर झालेले असून एकुण मंजूर रक्कम रु. २,६२,९९,६२५/- पेक्षा रु.४९,२१,६७५/- इतक्या रकमेचे जादा काम झालेले असून एकुण कामाची रक्कम रु. ३,१२,२१,३००/- इतकी झालेली आहे.

तरी मे.आदिती इलेक्ट्रीकल, नाशिक यांचे उपरोक्त वाढीव कामास व रु. ४९,२१,६७५/- या वाढीव खर्चासहीत फायनल बीलाची रक्कम रु.३,१२,२१,३००/- आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४७** **व्दारावती इमारतीकडील लिफ्टचे (AMC) वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मे. कोने इलेव्हेटर्स ( I ) प्रा.लि., पुणे यांनी द्वारावती इमारतीमध्ये पॅसेंजरकरीता स्टेनलेस स्टील ऑटोमॅटीक डोअर्सच्या चार लिफ्ट बसवून चालू करून दिल्या होत्या.

लिफ्ट चालू झाल्यानंतर मे. कोने इलेव्हेटर्स ( I ) प्रा.लि., पुणे यांनी टेंडरमधील व कार्यादेशातील अटीनुसार सलग तीन वर्ष फ्री सर्व्हिस उत्तम प्रकारे दिली आहे. दि. १८-०९-२००९ रोजी त्यांनी फ्री सर्व्हिस चालू केली असून त्याची मुदत दि. १७-०९-२०१२ रोजी संपत आहे.

आता त्यांनी दिनांक १८-०९-२०१२ ते दिनांक १७-०९-२०१३ या आर्थिक वर्षाकरीता ( रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट् ) मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट्चे कामी लागणाऱ्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे कळविलेला आहे.

जर सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट ( रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप ) केलेले नसेल आणि मशिनरीला मेकॅनिकल प्रॉब्लेम आले व मशिनरीचे मेकॅनिकल स्पेअर्स बदलण्याची गरज लागली तर या स्पेअर्सचे वेगळे बील भरावे लागते. शिवाय हे स्पेअर्स लगेच उपलब्ध होतील याची शाश्वती नसते.

या रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टमध्ये सर्व मेकॅनिकल स्पेअर्स हे रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट असल्याने त्या स्पेअर्सची कोणतीही किंमत न घेता स्पेअर्स बदलून मिळतात व शिवाय वर्षातून दरमहा कंपनीचा प्रशिक्षित एक्स्पर्ट मेकॅनिक येऊन मशिनरीची साफसफाई करून क्लिनींग करून सेटींग करून देत असतो. जेणेकरून लिफ्ट सुरळीत चालू राहणे शक्य होणार आहे. सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट ( रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप ) पिरिअडमध्ये मशिनरीचा कोणताही मेकॅनिकल पार्ट

नैसर्गिकरित्या (मशिनरीशी कन्झुमरने कोणतीही छेडछाड केलेली नसल्यास) खराब झाल्यास तो बदलून देणे कंपनीला सक्तीचे आहे.

| अ. नं. | तपशील | संख्या | कालावधी | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | द्वारावती **ए** बिल्डींग लिफ्ट क्र. ५५८६१ | ०१ | दि. १८-०९-२०१२ ते दि. १७-०९-२०१३ | रु. १,३३,६०२/- | रु. १,३३,६०२/- |
| २ | द्वारावती **बी** बिल्डींग लिफ्ट क्र. ५५८६२ | ०१ | दि. १८-०९-२०१२ ते दि. १७-०९-२०१३ | रु. १,३३,६०२/- | रु. १,३३,६०२/- |
| ३ | द्वारावती **बी** बिल्डींग लिफ्ट क्र. ५५८६३ | ०१ | दि. १८-०९-२०१२ ते दि. १७-०९-२०१३ | रु. १,३३,६०२/- | रु. १,३३,६०२/- |
| ४ | द्वारावती **सी** बिल्डींग लिफ्ट क्र. ५५८६४ | ०१ | दि. १८-०९-२०१२ ते दि. १७-०९-२०१३ | रु. १,३३,६०२/- | रु. १,३३,६०२/- |
| | | | | **एकुण** | **रु. ५,३४,४०८/-** |

दिनांक २०-०५-२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.३३ निर्णय नं.३८६ अन्वये ( ठरावाची प्रत सोबत माहितीसाठी जोडली आहे. ) दरवर्षी संस्थानमधील महत्त्वाच्या मशिनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशिनरी, विद्युत विभागातील विविध मशिनरी, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईबाबा रुग्णालयातील विविध मशिनरी, एअरकंडीशनरस्, वायुवीजन यंत्रणा, वगैरे ) वार्षिक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशिनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशिनरींच्या उत्पादक कंपनीने निर्देशित केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डिलरला देण्यात यावे, असे ठरलेले आहे.

तरी उपरोक्त ठरावानुसार लिफ्टची उत्पादक कंपनी मे. कोने इलेव्हेटर्स ( I ) प्रा.लि., पुणे यांना दिनांक १८-०९-२०१२ ते दिनांक १७-०९-२०१३ या कालावधीकरीता व्दारावती लिफ्टचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट ( रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप) देणेकामी रक्कम रुपये रु. ५,३४,४०८/- इतकी रक्कम आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त प्रस्तावावर विचार होऊन प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७६८ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे लिफ्टची उत्पादक कंपनी मे. कोने इलेव्हेटर्स (I) प्रा.लि., पुणे यांना दिनांक १८-०९-२०१२ ते दिनांक १७-०९-२०१३ या कालावधीकरीता व्दारावती इमारतीचे लिफ्टचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (रिस्क प्रोटेक्शन कॉन्ट्रॅक्ट टाईप) देणेकामी रक्कम रुपये रु. ५,३४,४०८/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.४८ डॉट मॅट्रिक्स प्रिंटर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** माहिती तंत्रज्ञान विभागाकडे सध्या ०६ डॉट मॅट्रिक्स प्रिंटर असून ते विविध विभागांना वापरासाठी देण्यात आलेले आहेत. त्यांचे दुरुस्ती देखभालीचे काम विभागांतर्गत करण्यात येत आहेत. साईटेक प्रकल्पातील ४० नग डॉट मॅट्रिक्स प्रिंटर विविध ठिकाणी वापरण्यात येत आहे. त्यामुळे सध्या साईटेकचे करारनाम्यानुसार सर्व डॉट मॅट्रिक्स प्रिंटर वापरण्यात येत आहे. परंतु सध्या ०४ नग प्रिंटरची इकडील विभागास आवश्यकता आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून घेतल्यास २४ महिन्यांसाठी अंदाजे रक्कम रुपये २,५२,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे. परंतु सदरचे प्रिंटर संस्थानमार्फत खरेदी केल्यास २४ महिन्यांसाठी अंदाजे रक्कम रुपये ५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तूर्त ०४ नग डॉट मॅट्रिक्स प्रिंटर विहीत पध्दतीने कोटेशन मागून न्युनत्तम कोटेशन धारकाकडून खरेदी करण्यात यावे, असे नम्र मत आहे.

तरी, ०४ नग डॉट मॅट्रिक्स प्रिंटर विहीत पध्दतीने न्युनत्तम कोटेशनधारकाकडून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेसाठी सदर प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.७६९ यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागासाठी ०४ नग डॉट मॅट्रिक्स प्रिंटर विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- आय.टी. विभागप्रमुख)

---

**विषय नं.४९ साईआश्रम भाग ०१ व साईआश्रम भाग ०२ साठी फायर एक्स्टीग्युंशर सिलेंडर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे दर्शनासाठी शिर्डीत येणाऱ्या भक्तांची संख्या दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढत आहे. यामुळे येणाऱ्या भक्तांचे निवासासाठी साईबाबा भक्त निवासस्थानचे दक्षिणेकडील बाजुस साईआश्रम भाग ०१ आणि निमगाव कोऱ्हाळे परिसरात साईआश्रम भाग -०२ अशा नव्याने इमारती बांधण्यात

आलेल्या आहेत. सदरची दोन्ही निवासस्थाने पुढील महिण्यात भक्तांचे निवासासाठी सुरु करावयाचे नियोजन आहे.

करीता साईआश्रम भाग ०१ व ०२ चे परिसरासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने आग प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन दि.२०.०६.२०१२ रोजी संरक्षण विभागातील फायर फायटरचे काम पहणारे कर्मचारी श्री प्रताप संपतराव कोते यांनी दि.२०.०७.२०१२ रोजी राऊंड घेऊन सदर परिसराचा सर्व्हे केला व खालील नमुद केलेल्या ठिकाणी साईआश्रम भाग ०१ व ०२ साठी आवश्यकतेनुसार ०५ किलो क्षमतेचे ABC टाईप सिलेंडर बसविणे अत्यंत आवश्यक आहे. सदर ABC टाईपचे सिलेंडर हे मल्टीपर्पज सर्व प्रकारच्या आगीवर उपयुक्त असुन मेन्टेनन्ससाठी सुलभ आहे.

**साईआश्रम भाग ०१**

| अ नं. | फायर एस्टींग्युशर बसविण्याचे ठिकाण | प्रकार | | नग संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | **बिल्डींग नं.०१,** | | | | |
| | तळमजला ,चार पॅसेज व स्टोअर रुम | ABC | DRY POWDER | ६ | |
| | पहिलामाळा ,चार पॅसेज व स्टोअर रुम | ABC | DRY POWDER | ६ | |
| | दुसरामाळा ,चार पॅसेज व स्टोअर रुम | ABC | DRY POWDER | ६ | |
| | तिसरामाळा ,चार पॅसेज व स्टोअर रुम | ABC | DRY POWDER | ६ | |
| | **एकुण सिलेंडर** | ABC | **DRY POWDER** | **२४** | |
| | | | | | |
| | **एका बिल्डींगसाठी २४ असे एकुण १२ बिल्डींगसाठी** | **ABC** | **DRY POWDER** | २८८ | |
| २ | **तळमाळा आर ब्लॉकसाठी** | | | | |
| | तळमजला ,वेटींग हॉल | ABC | DRY POWDER | २ | |
| | तळमजला ,बुकींग हॉल | ABC | DRY POWDER | २ | |
| | ऑफिस | ABC | DRY POWDER | १ | |
| | तळमजला मेंन्टेन्स रुम | ABC | DRY POWDER | ४ | |
| | इलेक्ट्रीक पॅनल बोर्ड | ABC | DRY POWDER | १ | |
| | लॉड्री रुम | ABC | DRY POWDER | १ | |
| | डी.जी.रुम (जनरेटर रुम ) | ABC | DRY POWDER | २ | |
| | पाणीपुरवठा पंप रुम | ABC | DRY POWDER | १ | |
| | उत्तर बाजू लिप्ट | ABC | DRY POWDER | २ | |
| | **एकुण सिलेंडर** | ABC | DRY POWDER | **१६** | |
| | | | | | |
| ३ | **आर ब्लॉक पहिला मजला** | | | | |
| | किचन हॉल | ABC | DRY POWDER | १ | |
| | स्टोअर रुम | ABC | DRY POWDER | १ | |
| | भोजन हॉल | ABC | DRY POWDER | ४ | |
| | **एकुण सिलेंडर** | | | **६** | |
| | | | | | |
| ४ | **साईआश्रम भाग १ परिसर** | | | | |
| | सुरक्षा कॅबीन | ABC | DRY POWDER | ७ | |
| | ओ.ए.टी रुम | ABC | DRY POWDER | २ | |
| | एस.टी.पी फिटर प्लॅंट | ABC | DRY POWDER | १ | |
| | **एकुण सिलेंडर** | ABC | **DRY POWDER** | **१०** | |
| | | | | | |
| | **वरील अ नं.०१ ते ०४ नुसार साईआश्रम भाग -१ साठी एकुण सिलेंडर** | ABC | **DRY POWDER** | **३२०** | |

**साईआश्रम भाग ०२**

| अ नं. | फायर एस्टींग्युशर बसविण्याचे ठिकाण | प्रकार | | नग संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ५ | **बिल्डींग नं.०१,** | | | | |
| | तळमजला हॉल व पॅसेज | ABC | DRY POWDER | ४ | |
| | पहिला मजला हॉल व पॅसेज | ABC | DRY POWDER | ४ | |
| | दुसरा मजला हॉल व पॅसेज | ABC | DRY POWDER | ४ | |
| | तिसरा मजला हॉल व पॅसेज | ABC | DRY POWDER | ४ | |
| | **एकुण सिलेंडर** | ABC | DRY POWDER | **१६** | |
| | | | | | |
| | **बिल्डींग नं.०२ते०६ ( बिल्डींग साठी)** | ABC | DRY POWDER | **८०** | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | आर ब्लॉक तळमजला | | | | |
| ६ | तळमजला ,वेटींग हॉल | ABC | DRY POWDER | २ | |
| | तळमजला ,बुकींग  हॉल | ABC | DRY POWDER | २ | |
| | बुकिंग ऑफीस | ABC | DRY POWDER | १ | |
| | तळमजला मेंटनन्स रुम | ABC | DRY POWDER | ४ | |
| | इलेक्ट्रीक पॅनल बोर्ड | ABC | DRY POWDER | १ | |
| | लॉंड्री रुम | ABC | DRY POWDER | १ | |
| | डी.जी.रुम (जनरेटर रुम ) | ABC | DRY POWDER | २ | |
| | पाणीपुरवठा पंप रुम | ABC | DRY POWDER | १ | |
| | दक्षिण बाजू लिप्ट | ABC | DRY POWDER | २ | |
| | **एकुण सिलेंडर** | ABC | DRY POWDER | **१६** | |
| | | | | | |
| | आर ब्लॉक पहिला मजला | | | | |
| ७ | किचन हॉल | ABC | DRY POWDER | १ | |
| | स्टोअर रुम | ABC | DRY POWDER | १ | |
| | भोजन हॉल | ABC | DRY POWDER | ४ | |
| | **एकुण सिलेंडर** | | | **६** | |
| | | | | | |
| | साईआश्रम भाग २ परिसर | | | | |
| ८ | सुरक्षा कॅबीन | ABC | DRY POWDER | ३ | |
| | एस.टी.पी फिटर प्लॅट | ABC | DRY POWDER | १ | |
| | **एकुण सिलेंडर** | ABC | DRY POWDER | **४** | |
| | | | | | |
| | **अ नं.०५ ते ०८ नुसार साईआश्रम भाग - २ एकुण सिलेंडर** | ABC | DRY POWDER | १२२ | |

उपरोक्त ठिकाणानुसार साईआश्रम भाग ०१ साठी एकुण ३२० व साईआश्रम भाग ०२ साठी १२२ असे एकुण ४४२ ABC  टाईपचे सिलेंडरची आवश्यकता आहे.सदर ०५ किलो क्षमतेचे ABC टाईप सिलेंडरचे खरेदीसाठी अंदाजे ६,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.

तरी फायर एक्स्टीग्युशर सिलेंडर खरेदीसाठी अंदाजे रु.६,००,०००/-(अ.रु.सहालाख मात्र) येणाऱ्या खर्चास तसेच त्या संबधीत वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन निविदाधारकांकडून निविदा मागविणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७७० यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे साईआश्रम भाग ०१ व साईआश्रम भाग ०२ याकरीता आवश्यक असणारे फायर एक्स्टीग्युंशर सिलेंडर वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन निविदाधारकांकडून निविदा मागणी करुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.५०** **मंदीर सुरक्षेसाठी पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांचे कार्यालयासाठी जागा, फर्निचर, सी.सी. टी.व्ही. संच मिळणेबाबत मा.अप्पर पोलिस अधिक्षक, श्रीरामपूर यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.७७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.५१** **श्रीमती स्वाती मित्रा यांचा दि.१९.०८.२०१२ रोजीची आपत्ती व्यवस्थापनाबाबतचा रिपोर्ट.**

**प्रस्ताव-** श्रीं चे दर्शनासाठी शिर्डी येथे येणा-या भाविकांची गर्दी दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढतच आहे. श्रींचे समाधी मंदिर व येणा-या भक्तांची सुरक्षितता लक्षात घेता संस्थान मार्फत आपत्ती नियोजन व आराखडा तयार करणेत आलेला आहे.  त्यानुसार दि.१८/०८/२०१२ रोजी मा.उपकार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षात श्रीमती स्वाती मित्रा यांचे मार्गदर्शनाखाली संस्थानचे आपत्ती नियोजन व आराखडयाबाबत मिटींग घेण्यात आली होती. त्यानंतर श्रीमती स्वाती मित्रा यांनी संस्थानच्या परिसराची पहाणी केली.

संदर्भिय पत्रास अनुसरुन त्यांनी श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचे व्यवस्थापन, संस्थानचे विभाग, विभागांतर्गत केली जाणारी कामे, संस्थानचा कर्मचारी वर्ग इत्यादी बाबत जाणून घेतलेली माहिती कळविलेली आहे.  तसेच त्यांनी गर्दीचे नियोजन, मंदिराचे पुर्व बाजुस असलेले शॉपींग कॉम्प्लेक्स पश्चीम बाजुस असलेला राज्य महामार्ग, उत्तर बाजुस असलेल्या भक्तांच्या दर्शन रांगा व दक्षिण बाजुस असलेली दुकाने, लॉजेस, फायर, अन्नातील विषबाधा, प्रथमोपचार केंद्र याशिवाय अन्य सर्वसाधारण बाबी संबंधी माहिती दिलेली असून त्या अनुषंगाने या बार्बीवर भविष्यात करावयाची कार्यवाही बाबतचा अहवाल संस्थान प्रशासनास सादर केलेला असुन तो अहवाल सोबत जोडलेला आहे.

सदर अहवालावर चर्चा होऊन निर्णय होणे आवश्यक आहे.  चर्चेचे वेळी डॉ.श्रीमती स्वाती मित्रा हया खर्चाचा तपशील समक्ष सादर करणार आहेत.

**निर्णय क्र.७७२ मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.०९.२०१२ रोजीचे सभेत ठरलेप्रमाणे श्रीमती स्वाती मित्रा हया आजचे सभेत उपस्थित होत्या. आजचे सभेत त्यांनी आपत्ती व्यवस्थापन या याबाबत सविस्तर माहिती देऊन, सदर बाबतचे (प्रेझेंटेशन) सादरीकरण केले. त्यावर मा.जिल्हाधिकारी यांनी याबाबत प्रथमत: पहिल्या टप्प्यातील Need Assessment करुन घ्यावे, त्यासाठीचे detailed estimate द्यावे अशी सूचना मांडली. त्यानुसार श्रीमती स्वाती मित्रा यांनी रु.१,६४,०००/- मात्र रकमेचे Assessment दिले व ते मा.व्यवस्थापन समितीने मान्य केले. त्यानुसार श्रीमती स्वाती मित्रा यांनी संस्थानचे संरक्षण विभागामार्फत सर्व विभागांशी समन्वय साधून पुढील कार्यवाही करावी. त्यासाठी त्यांना व त्यांचे सहकारी यांना शिर्डी येथे येणे-जाणेसाठी येणारा प्रत्यक्ष खर्च तसेच शिर्डी येथे आल्यानंतर वाहन व्यवस्था, निवास व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.५२ परराज्यातून देणगी मिळालेल्या रुग्णवाहीका वाहनांचा प्रवेशकर (Entry Tax) बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता सद्‌भावना सेवा संस्थान, नोएडा यांनी दोन मारुती इको रुग्णवाहीका (A/C) देणगी दिलेल्या आहेत. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. नं. | इंजिन नंबर | चेसी नंबर | मुळ शोरुम किंमत | व्हॅट @ १२.५ % | वाहनाची एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | G१२BN१३०६७३. | MA३ERLF१S००१५०३४४. | ३,१०,३२८.७६ | ३८,७९१.०९ | ३,४९,११९.८५ |
| ०२. | G१२BN१२९८२७. | MA३ERLF१S००१४७३८४. | ३,१०,३२८.७६ | ३८,७९१.०९ | ३,४९,११९.८५ |

उपरोक्त देणगी मिळालेली वाहने परराज्यातुन आलेली असलेने आर.टी.ओ., कार्यालयात कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या नांवे रजिस्ट्रेशन करणेपुर्वी सेल्स टॅक्स अधिकारी (प्रवेशकर) यांचे NOC ची आवश्यकता असलेने, त्यांना NOC देणे बाबत इकडील जा.नं.एसएसएस/१४९३/२०१२, दि.०६/०७/२०१२ ने पत्र दिले तसेच अहमदनगर येथील कार्यालयात जाउन प्रत्यक्ष भेट घेतली असता, दोन्ही रुग्णवाहीका संस्थानला सद्‌भावना सेवा संस्थान यांनी त्यांचे नांवे खरेदी केलेल्या आहेत. त्यानंतर त्यांनी संस्थानला देणगी दिलेल्या आहेत. तसेच वाहन खरेदी करुन ३६ महिण्यापेक्षा कमी कालावधी झालेला आहे, त्यामुळे NOC साठी रुग्णवाहीकेच्या मुळ किंमतीवर १२.५% एन्ट्री टॅक्स संस्थानला भरावा लागेल, असे सांगितले.

दि.३१/०८/२०१२ रोजी खालील प्रमाणे रक्कम सेल्स टॅक्स कार्यालयात भरुन रुग्णवाहीका रजिस्ट्रेशन करीता NOC घेण्यात आलेली आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| ०१) | दोन्ही रुग्णवाहीकेची एकुण मुळ किंमत रु.६,२०,६५८/- त्यावर (टॅक्स १२.५%) | ७७,५८२.०० |
| ०२) | माहे मार्च-२०१२ मध्ये RTO, नोएडा यांनी NOC दिलेली आहे. त्यामुळे माहे एप्रिल-२०१२ ते जुलै-२०१२ पर्यंत दंड रक्कम | ७,७५८.०० |
| | **एकुण भरावयाची रक्कम (रु.)** | **८५,३४०.००** |

तरी सद्‌भावना सेवा संस्थान नोएडा यांचेकडून देणगी मिळालेल्या दोन रुग्णवाहीका वाहनाचे प्रवेशकर भरणे करीता झालेल्या एकुण रक्कम रु.८५,३४०/- (अक्षरी रक्कम रु. पंच्याऐंशी हजार तिनशे चाळीस) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७७३ यावर सविस्तर चर्चा होऊन, सद्‌भावना सेवा संस्थान नोएडा यांचेकडून देणगी मिळालेल्या दोन रुग्णवाहीका वाहनाचे प्रवेशकर भरणेकरीता झालेल्या एकुण रक्कम रु.८५,३४०/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.५३ जुने टायर्स रिमोल्डींग करणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या बसेस व ट्रॅक्टर या वाहनांचे टायर्स सततचे वापरामुळे खराब झालेले आहेत. सदरचे टायर्स रिमोल्डींग करुन वापरता येतील. रिमोल्डींग करता येणाऱ्या टायर्सचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | टायर्स साईज | वापर | नग |
|---|---|---|---|
| ०१. | १० X ०० X २० | पॅसेंजर बसेस | १२ |
| ०२. | ९ X ०० X २० | स्कुलबस | ०४ |
| ०३. | १३ X ६ X २८ | ट्रॅक्टर | ०२ |
| | **एकुण टायर्स** | | **१८** |

उपरोक्त प्रमाणे विविध साईजचे जुने १८ टायर्स रिमोल्डींग करुन घेणे कामी सध्याचे मार्केट दरानुसार अंदाजे रु.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख मात्र) खर्च अपेक्षीत आहे.

सदरचे टायर्स परिसरातील टायर्स रिमोल्डींग वर्क्स यांचेकडून कोटेशन बोलावुन रिमोल्डींग करुन घेता येतील.

तरी वरील प्रमाणे जुनी वापरलेले १८ टायर्स रिमोल्डींग करुन घेणेस व या कामी येणाऱ्या अंदाजे रु.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख मात्र) मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे वाहन विभागाकडील वापरात असलेल्या बसेस व ट्रॅक्टर या वाहनांचे जुने वापरलेले १८ टायर्स रिमोल्डींग करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.५४ लाडू पॅकींग प्लास्टीक पिशवीचे बीलाची रक्कम आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** खरेदी विभागाकडून आर्थिक वर्षानूसार (दि.०१/०४/२०११ ते ३१/०३/२०१२ अखेर) प्लास्टीक पिशवी खरेदी करुन मिळत असे. मागील वर्षाचा कार्यकाल ३१/०३/२०१२ ला संपला होता. खरेदी विभागाकडून प्लास्टीक पिशवी आवश्यकतेनूसार उपलब्ध होत नव्हती तसेच उन्हाळी सुट्टीचा कालावधी असल्यामुळे साईभक्तांची मोठयाप्रमाणात गर्दी होती. प्लास्टीक पिशवीअभावी साईभक्तांना प्रसादलाडूची गैरसोय होऊ नये म्हणून खरेदी विभागाकडून आवश्यकतेनूसार प्लास्टीक पिशवीचा पुरवठा न झाल्यामुळे वेळोवेळी प्लास्टीक पिशवी बाहेरुन खरेदी/देणगी घेवून वापरलेली आहे.

दि.०९/०५/२०१२ रोजी मध्यवर्ती भांडारमधून लाडू पॅकींगसाठी ५x६.१/२ या साईजची ३५० किलो प्लास्टीक पिशवी प्रसादालयाकडे आणलेली होती. सदर पिशवीचा वापर दि.१४/०५/२०१२ पर्यंत झालेला आहे. दि.१५/०५/२०१२ रोजी लाडू पॅकींगसाठी प्लास्टीक पिशवीची गरज होती. मात्र मध्यवर्ती भांडारकडे प्लास्टीक पिशवी शिल्लक नव्हती. लाडू पॅकींगसाठी प्लास्टीक पिशवी अभावी साईभक्तांची प्रसादलाडूची गैरसोय होऊ नये यासाठी स्थानिक बाजार पेठेतून मे.ए.एस.गंगवाल, शिरडी यांचेकडून बील नं.५०८ दि.१५/०५/२०१२ नूसार १०० किलो प्लास्टीक पिशवी तातडीची गरज म्हणून खरेदी करण्यात आलेली आहे. त्यानंतर दि.१६/०५/२०१२ रोजी मध्यवर्ती भांडारकडे ७५० किलो प्लास्टीक पिशवीची आवक झाली होती. दिनांक २२/०५/२०१२ रोजी १०२ किलो, दि.२४/०५/२०१२ रोजी १५० किलो व दि.२५/०५/२०१२ रोजी १५० किलो प्लास्टीक पिशवी देणगी आलेली होती. भांडारकडे दि.१६/०५/२०१२ रोजी आवक झालेली ७५० किलो प्ला.पिशवी + देणगी आलेली १०२+१५०+१५०=४०२ किलो अशी एकूण ११५२ किलो प्लास्टीक पिशवी दि.१६/०५/२०१२ ते दि.३०/०५/२०१२ रोजीपर्यंत लाडू पॅकींगसाठी वापरण्यात आली. मात्र दि.३१/०५/२०१२ रोजीकरीता लागणारी प्लास्टीक पिशवी मध्यवर्ती भांडारमध्ये शिल्लक नसल्यामुळे लाडू पॅकींगचे कामात अडथळा येऊन साईभक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून दि.३१/०५/२०१२ रोजी स्थानिक बाजारातून मे.गंगवाल ए.एस.ॲण्ड कं.,शिर्डी यांचेकडून बील नं.११९३ ने १५० किलो प्लास्टीक पिशवी खरेदी करुन वापरणेत आली आहे. त्यानंतर दि.०२/०६/२०१२ रोजी मध्यवर्ती भांडारकडे ७५ किलो प्लास्टीक पिशवीची आवक झाली होती.

मात्र सदर प्लास्टीक पिशवी अत्यंत कमी असल्यामुळे दि.०२/०६/२०१२ रोजी स्थानिक बाजार पेठेतून मे.गंगवाल ए.एस.ॲण्ड कं.,शिर्डी यांचेकडून बील क्रं.१२६५ ने १५० किलो प्लास्टीक पिशवी खरेदी करुन वापरलेली आहे. त्यानंतर दि.०३/०६/२०१२ रोजी १५० किलो प्लास्टीक पिशवी देणगी आली होती. सदर पिशवींचा लाडू पॅकींगसाठी वापर करण्यात आलेला आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे तातडीची गरज म्हणून खरेदी केलेली प्लास्टीक पिशवीची रक्कम खालीलप्रमाणे आदा करणेस मान्यता असावी ही विनंती.

| **अ.नं.** | **पुरवठादाराचे नांव** | **मालाचा तपशील** | **बील क्रं. व तारीख** | **परिमाण** | **दर** | **रक्कम रु. पै.** |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | मे.गंगवाल ए.एस.ॲण्ड कं., शिर्डी | प्ला.पिशवी साईज-५x७ | ५०८ १५/०५/१२ | १०० किलो | १४०/- व्हॅटसह | १४,०००/- |
| २) | मे.गंगवाल ए.एस.ॲण्ड कं., शिर्डी | प्ला.पिशवी साईज-५x७ | ११९३ ३१/०५/१२ | १५० किलो | १४०/- व्हॅटसह | २१,०००/- |
| ३) | मे.गंगवाल ए.एस.ॲण्ड कं., शिर्डी | प्ला.पिशवी साईज-५x७ | १२६५ ०२/०६/१२ | १५० किलो | १४०/- व्हॅटसह | २१,०००/- |
| | | | **एकूण रुपये =** | | | **५६,०००/-** |

वरीलप्रमाणे प्लास्टीक पिशवी (साईज ५x७) तातडीची गरज म्हणून वेळोवेळी खरेदी केलेली आहे. तरी उपरोक्तप्रमाणे गरजेनूसार खरेदी केलेल्या प्लास्टीक पिशवीची रक्कम रु.५६,०००/- (अक्षरी रु.छपन्न हजार मात्र) मे. गंगवाल ए.एस.ॲण्ड कं.,शिरडी यांना आदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे लाडू पॅकींगसाठी तातडीची गरज म्हणून वेळोवेळी खरेदी केलेल्या प्लास्टीक पिशवी (साईज ५x७) चे खरेदीची रक्कम रु.५६,०००/- मात्र मे. गंगवाल ए.एस.ॲण्ड कं.,शिरडी यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.५५ स्टे. स्टील वेल्डींग कामाकरीता ऑरगान/ कार्बनवेल्डींग सेट व गॅस कटींग सेटचे प्राप्त दरपत्रक उघडणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालयात प्रसाद भोजन बनविणे, प्रसाद भोजन वाढणे व लाडु सुकविणे कामी स्टे. स्टील धातुचे भांडी, फुड सर्व्हिस ट्रॉलीज, वॉटर सर्व्हिस टॉलीज, लाडु ट्रे, डायनिंग टेबल, स्टीम कुकर्स व मशिनरीज वापरण्यात येतात. श्री साईप्रसादालय ८ जानेवारी २००९ पासुन नव्याने सुरु केलेनंतर स्टे. स्टीलचे सर्व फर्निचर व इक्युपमेंट नविन खरेदी करण्यात आलेले आहे. सदर स्टे. स्टील धातुचे फर्निचर, मशिनरी व उपकरणे सततच्या वापराने तुटतात. फुड व पाणी सर्व्हिस ट्रॉली लिकेज,व्हिल सपोर्ट ब्रॉकेट तुटणे इ. नादुरुस्तीचे कामे करणेसाठी ऑरगान वेल्डींगची आवश्यकता असते. संस्थान मध्ये स्टे. स्टील वेल्डींग करीता आवश्यक ऑरगान व कार्बन वेल्डींगची सुविधा नाही. सदरचे फर्निचर व उपकरणे हे नविन असल्याने दुरुस्ती कमी होती. परंतु दैनंदिन वापराने सदर इक्युपमेंटचे मेन्टेनन्स वाढत आहे.

स्टे. स्टील वेल्डींग करीता आवश्यक असणाऱ्या ऑरगान व कार्बन वेल्डींग सेट खरेदी करणेकामी मा. व्यवस्थापन समिती दि. २४.९.२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.७४९ नुसार कोटेशन मागवून खरेदी करणेस व रक्कम रु. ३,००,०००/- पर्यंत खर्चास मान्यता मिळालेली आहे. उपरोक्त संदर्भिय अ. नं.३ नुसार श्री साईप्रसादालयाकरीता स्टे. स्टील वेल्डींग कामाकरीता अडवाणी ऑर्लीकॉन, सुपरटेक किवा एल ॲन्ड टी कंपनीचे ऑरगॉन, कार्बन वेल्डींग सेट व गॅस कटर सेटची खरेदी करणेकामी खालील पुरवठादार यांचेकडुन दरपत्रक मागविणेत आलेले होते.

| | |
|---|---|
| १. फेथ मशिनरी स्टोअर्स, पिंपरी, पुणे- १८ | ६. समिता इलेक्ट्रीकल्स, नाशिक- ४२२ ००७. |
| २. वर्प इंजिनिअर्स प्रा. लि.कांदीवली, मुंबई-६७ | ७. टेक्नोक्रॉफ्ट इंजिनिअर्स, पुणे-४११ ००४ |
| ३. अडवाणी ऑर्लीकॉन प्रा. लि, नागापूर, अहमदनगर | ८. सपना ट्रेडींग कॉप्रोरेशन, पुणे- ४११ ०१८ |
| ४. लार्सन & टुब्रो लि. पुणे- ०१ | ९. नाम एन्टरप्राईजेस, मुंबई- ४०० ०२३ |
| ५. सुपरटेक सर्व्हिसेस, ठाणे- ४०० ६०४ | १०. कोनिश इंजिनिअरींग प्रा. लि. अबंड, नाशिक- १० |

त्यापैकी खालीलपुरवठादार यांचे दरपत्रक प्राप्त झालेले आहे.

१. वर्प इंजिनिअर्स प्रा. लि.कांदीवली, मुंबई-६७

२. सुपरटेक सर्व्हिसेस, ठाणे- ४०० ६०४

उर्वरीत ८ पुरवठादार यांना दुरध्वनी करुन विचारणा केली असता त्यांनी अडवाणी, ऑर्लीकॉन, सुपरटेक किंवा एल. ॲन्ड टी कंपनीचे दरपत्रक मुळ डिलर यांचेकडूनच मिळेल असे सांगितलेले आहे. त्यापैकी सुपरटेक सर्व्हिसेस, ठाणे यांचे दरपत्रक ओपन मिळालेले आहे. तरी वर्प इंजिनिअर्स, प्रा. लि. मुंबई यांचे दरपत्रक मा. त्रिसदस्य समिती समोर उघडून दराची तुलना करुन निर्णय घेता येईल.

कंपनीचे डिलर वर्प इंजिनिअर्स प्रा. लि. मुंबई यांनी निविदेत सर्व आयटमचे दर भरलेले नसल्याने त्याचप्रमाणे मागणीनुसार मशिनचा तांत्रिक तपशिल न आढळल्याने तसेच चर्चा वाटाघाटीस प्रतिनिधी उपस्थित नसल्याने निवीदा अपात्र ठरविण्यात आली. दुसरे निवीदाधारक मे. सुपरटेक सव्हिसेस, ठाणे यांचे प्रतिनिधीशी चर्चा वाटाघाटीद्वारे खालील तपशिलानुसार दर मान्य करण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | तपशिल | सुपरटेक सर्व्हिसेस, ठाणे |
|---|---|---|
| १ | दरपत्रक मधील मुळ दर | १,७९,५३१.०० |
| २ | व्हॅट १२.५% | २२,४४१.३८ |
| ३ | एकुण | २,०१,९७२.३८+ ट्रान्सपोर्ट + जकात |
| ४ | चर्चा/ वाटाघाटीत दिलेली सुट | १०,०९८/- (५%) |
| ५ | डिस्काऊंट वजा एकुण रक्कम | १,९१,८७३.७६ |
| ६ | **एकुण पुर्णांकित रक्कम** | **१,९१,८७४.००** |

**निर्णय क्र.७७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रमाणे तांत्रिक दुष्टया पात्र निविदाधारक मे सुपरटेक सर्व्हिसेस, ठाणे यांना ऑरगॉन / कार्बन वेल्डींग सेट व गॅस कटींग सेट पुरवठाकरणे कामी पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.५६ लाडू निर्मिती परवाना नुतनीकरण व लाडू विक्री मर्यादित स्वरुपात करणेबाबत.**

**निर्णय क्र.७७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.५७ लाडू पॅकींग व्यवस्थेत बदल करणेबाबत.**

**निर्णय क्र.७७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.५८ महारतन ब्रॅण्डचे तुपापासून तयार केलेले, कडवट चव असलेले लाडू, बुंदी व कढईतील जळालेले तुप साठ्यातून कमी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.त्रिसदस्य समितीने सुचविलेनूसार दि.२३/०५/२०१२ चे आदेशाने किराणा मालाचे सुयोग्य नमुने निवडणेसाठी त्या क्षेत्रातल्या तज्ञ सदस्यांची समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर तज्ञ समितीने दिनांक २८/०५/२०१२ रोजी किराणा मालाचे सुयोग्य नमुने निवडले होते.

मा.त्रिसदस्य समिती दिनांक ३०/०५/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३९९ अन्वये तज्ञ समितीने निवडलेल्या किराणा मालाचे (शुध्द तुपासह) सुयोग्य नमुन्याच्या निवीदाधारकांची चर्चा / वाटाघाटीव्दारे निव्वळ दराबाबत चर्चा करुन न्युनतम दर घेण्यात आले होते. त्यामध्ये एकूण १३ ब्रॅण्ड शुध्द तुपाचे नमुने खरेदी विभागामार्फत दिनांक ०१/०६/२०१२ रोजी अहमदनगर व नाशिक येथे जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणेत आले होते. जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर यांचा दि.०८/०६/२०१२ रोजी व जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा यांचा दि.११/०६/२०१२ रोजी तपासणी अहवाल प्राप्त झाला होता. दोन्ही तपासणी अहवालामध्ये उपरोक्त १३ ही ब्रॅण्डचे शुध्द तुप "फुड सेफ्टी ॲण्ड स्टँडर्ड ॲक्ट २००६" व "रुल्स ॲण्ड रेग्युलेशन २०११" नूसार खाण्यायोग्य असल्याचे नमूद केलेले होते. मा.त्रिसदस्य समिती दि.०३/०७/२०१२ चे सभेमध्ये १३ ब्रॅंडचे शुध्द तुपापैकी महारतन ब्रॅण्ड तुपाचे दर सर्वात कमी असल्याने बाफना बाजार, नाशिक यांचेकडून महारतन ब्रॅण्डचे तुप खरेदीसाठी पुरवठा आदेश देणेत यावा असा निर्णय झालेला आहे. त्यानूसार बाफना बाजार, नाशिक यांना खरेदी विभागामार्फत जा.नं.एसएसएस/वशि/खरेदी-प्रसादा/४२७/२०१२ दि.०३/०७/२०१२ ने पुरवठा आदेश देण्यात आला होता. सदर पुरवठा आदेशानूसार बाफना बाजार, नाशिक यांनी दि.१३/०७/२०१२ रोजी महारतन ब्रॅण्डचे ७५००/- किलोचा प्रथम पुरवठा केला होता.

महारतन ब्रॅण्डचे तुपाचा दि.१५/०७/२०१२ रोजी वापर सुरु केलेला आहे. सदर तुपाचा वापर सुरु केल्यानंतर दि.१९/०७/२०१२ रोजी खरेदी विभागामार्फत पुन्हा तुपाचा दर्जा तपासणेसाठी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर येथे तपासणीकरीता पाठविणेत आला होता. त्याचा तपासणी अहवाल दि.०६/०८/२०१२ रोजी पत्राने मिळाला. त्यामध्ये "फुड सेफ्टी ॲण्ड स्टँडर्ड ॲक्ट २००६" व "रुल्स ॲण्ड रेग्युलेशन २०११" नूसार सदरील तुप खाण्यायोग्य असलेबाबत नमूद केलेले होते.

श्री सत्यनारायण महाप्रसादाचे चवीबाबत स्थानिक नागरीकांकडून/भाविकांकडून तोंडी तक्रारी आल्यामुळे दिनांक ११/०८/२०१२ चे पत्रान्वये महारतन तुप, रवा, साखर या साहित्याचा दर्जा तपासणीसाठी खरेदी विभागामार्फत जिल्हा आरोग्य प्रयोग शाळा, अहमदनगर यांचेकडे पाठविणेत आला होता. सदर अहवाल प्रयोग शाळेकडून दि.१७/०८/२०१२ रोजी प्राप्त झाला असून त्यामध्ये तीनही साहित्य "फुड सेफ्टी ॲण्ड स्टँडर्ड ॲक्ट २००६" व "रुल्स ॲण्ड रेग्युलेशन २०११" नूसार खाण्या योग्य असल्याचे नमूद केलेले होते.

तरीही स्थानिक नागरीकांकडून/भाविकांकडून लाडूच्या चवीबाबत तोंडी तक्रारी येत राहील्याने दि.२४/०८/२०१२ रोजी प्रसादालय विभागाकडून गोपनीयरित्या "महारतन" शुध्द तुपाचा नमुना जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक व "अश्वमेध" प्रयोगशाळा,नाशिक येथे तपासणीसाठी पाठविण्यात आला होता. सदर दोनही प्रयोग शाळेकडून सुमारे ८ दिवसांनी तपासणी अहवाल प्राप्त होणार होता.

दिनांक २५/०८/२०१२ रोजी "दैनिक लोकमत" या वृत्तपत्रामध्ये लाडू कडवट झाल्याचे वृत्त प्रसिध्द झाले. त्यामुळे मा.त्रिसदस्य समितीने प्रसादालयात प्रत्यक्ष लाडू किचनमध्ये पहाणी करुन लाडू प्रसाद बनविणेची प्रक्रियेची माहीती घेतली. व स्वतः लाडूची चव घेतली. लाडू प्रसाद खालेवर शेवट अल्प कडवट चव लागत असल्याने बाफना बाजार, नाशिक यांचेकडील "महारतन" ब्रॅण्डचा तुपाचा पुरवठा त्वरीत बंद करणेचा निर्णय घेण्यात आला.

साईभक्तांना विना विलंब लाडूचा पुरवठा चालू रहाणेसाठी तातडीची पर्यायी व्यवस्था म्हणून मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्ट, गोखली यांचा सोनाई ब्रॅण्डचे शुध्द तुप खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानूसार दि.२७/०८/२०१२ रोजी सोनाई ब्रॅण्डचे तुप शिरडी येथे पोहच झाले. दि.२७/०८/२०१२ रोजी दिवसभर बुंदी तयार करुन रात्रौ लाडू वळल्यानंतर दि.२८/०८/२०१२ रोजी सकाळी ६.०० वाजता सोनाई ब्रॅण्डचे तुपापासून तयार केलेले लाडू साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले.

दिनांक २८/०८/२०१२ रोजी सकाळी १०.०० वाजता अन्न व औषध, (म.रा.) अहदमनगर कार्यालयातील श्री के.एस.शिंदे व श्री पी.बी. कुटे, अन्न सुरक्षा अधिकारी हे श्री साई प्रसादालयात आले

होते. त्यांनी श्री साई प्रसादालयातील लाडू किचन, जुने प्रसादालय लाडू किचन, चहा कॅन्टीन, मध्यवर्ती भांडार / खरेदी विभागात समक्ष पहाणी केली आहे. पहाणीनंतर मध्यवर्ती भांडारमध्ये महारतन ब्रॅण्डचे १३३१ तुपाचे डब्यांचा साठा सील केला असून त्यातील दोन बॅचमधील प्रत्येकी ८०० ग्रॅम तुपाचे नमुने घेवून तपासणीसाठी पाठविणेकामी खरेदी केलेले आहेत. तसेच श्री साई प्रसादालयातील लाडू किचनमध्ये येऊन "महारतन" तुपापासून तयार असलेले कडवट चवीचे एकूण ६७९८.९५० किलो - २/- किलो = ६७९६.९५० किलो लाडू (नग १,३५,९७९ - ४० = १,३५,९३९/- x ६/- रु प्रती नग प्रमाणे रु.८,१५,६३४/-) मनुष्य सेवनास अयोग्य असल्याने सदर लाडूचा साठा जप्त करुन नष्ट करण्याचे आदेश दिलेले होते. त्याचप्रमाणे महारतन तुपाची तळलेली बुंदी ७२२/- किलो (रु.१,२७,०९७/-) वापरणेस योग्य नसल्याने उपरोक्त लाडू बरोबर तळलेली बुंदी नष्ट करण्यात आलेली आहे. तसेच जळालेले तुप ९६५/- किलो रु. २१७.३५ प्रती किलो प्रमाणे = रक्कम रु.२,०९,७४२.७५ हे खड्डयात टाकणेऐवजी साबण उत्पादकास विक्री करावी असे अन्न व औषध प्रशासनाचे श्री के.एस.शिंदे व श्री पी.बी. कुटे, अन्न सुरक्षा अधिकारी यांनी तोंडी सांगितले. त्यानूसार सदर तुप विक्रीसाठी दरपत्रक मागविणेत येत आहेत.

तसेच सोनाई ब्रॅण्डचे दि.२८/०८/२०१२ रोजी आलेले बॅच नं. SD०१A चे ८०० ग्रॅम गावराण तुप (रु.१९९/-) व बेसन आटा २/- किलो (रु.११०/-) व महारतन ब्रॅण्डचे २/- किलो लाडू नग ४० (रु.२४०/-) सील करुन अन्न व औषध प्रशासन (म.रा.), अहमदनगर हे घेऊन गेलेले आहेत. त्यांनी त्याची रक्कम रु.१९९/- + रु.११०/- + रु.२४०/- = रु.५४९/- संस्थानकडे पा.नं.९१५ ने जमा केलेली आहे.

दि. २८/०८/२०१२ रोजी अन्न सुरक्षा अधिकारी यांचे आदेशान्वये कडवट लाडू ६७९६.९५० किलो व तळलेली बुंदी ७२२/- किलो ही ४ स्थानिक नागरीक, पंचासमक्ष तसेच मुख्याधिकारी, शिरडी नगरपंचायत, सर्कल अधिकारी, शिरडी यांचे उपस्थितीत खोल खड्डा घेऊन पुरण्यात (नष्ट करण्यात) आलेले आहेत व जळालेले तुप ९६५/- किलोची विक्री करण्यासाठी दरपत्रक मागवून विक्री करण्यात येत आहे.

महारतन ब्रॅण्डचे तुपापासून तयार केलेल्या खालीलप्रमाणे लाडू, बुंदी व जळालेले तुप यांची खालीलप्रमाणे होणारी रक्कम महारतन ब्रॅण्डचे तुपाचे पुरवठादार बाफना बाजार, नाशिक यांचेकडून वसूल करणेकामी खरेदी विभागामार्फत कार्यवाही चालू आहे.

१) एकूण लाडू ६७९८.९५० किलो - २/- किलो = ६७९६.९५० किलो
= लाडू नग १,३५,९७९
लाडू नग - <u>४०</u> (अन्न सुरक्षा अधिकारी यांनी तपासणीकामी नेलेले )
**= लाडू नग १,३५,९३९ x ६/-** = रु. ८,१५,६३४.००

२) तळलेली बुंदी ७२२/- किलोकरीता लागणारे साहित्य

| | | |
|---|---|---|
| बेसन ३९०/- किलो x ५५.४१ | = रु. | २१,६०९.९० |
| गावराण तुप ४५०/- किलो x २१७.३५ | = रु. | ९७,८०७.५० |
| गॅस १२०/- किलो x ६४/- | = रु. | ७,६८०.०० |

**पुर्णांकीत एकूण रक्कम = रु. १,२७,०९७.००**

३) जळालेले तुप ९६५/- किलो x २१७.३५ = रु. <u>२,०९,७४२.७५</u>

**<u>एकूण पुर्णांकीत रक्कम रु.= ११,५२,४७४/-</u>**

अक्षरी रक्कम रुपये अकरा लाख बावन्न हजार चारशे चौऱ्याहत्तर मात्र.

तरी वरीलप्रमाणे ६७९८.९५० किलो लाडू (१,३५,९७९ लाडू नग) , ७२२/- किलो तळलेली बुंदी व ९६५/- किलो जळालेले तुप साठयातून कमी करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७९ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे एकूण ६७९८.९५० किलो कडवट चव येत असलेले प्रसादलाडू (१,३५,९७९ लाडू नग), तळलेली बुंदी ७२२/- किलो तसेच कढईतील जळालेले तूप ९६५ किलो रेकॉर्डवरुन (साठयातून) कमी करणेस मान्यता देण्यात आली.**

**मात्र जळालेले ९६५ किलो तुप दरपत्रके मागणी करुन विक्री करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.५९ ५०० रुम कॅन्टिनमध्ये सिलेंडर मेनी फोर्ड यंत्रणा बनवून घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** नविन भक्त निवास येथे श्री साईभक्तांना कॅन्टिन विभागामार्फत चहा, कॉफी व दुध पुरविण्यात येते. सध्या कार्यान्वित असलेल्या कॅन्टिनमध्ये एल. पी. गॅस सिलेंडर प्रत्येक भट्टीसाठी स्वतंत्र जोडले जाते. आजमितीस तीन भट्टया कार्यन्वित असून प्रत्येक भट्टीच्या जवळ सिलेंडर जोडून वापर करणे सुरक्षाच्या दृष्टीने धोकादायक आहे. मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी कॅन्टिनच्या खिडकीजवळ असलेल्या जाळीमध्ये पाच सिलेंडरची सिलेंडर मेनीफोल्डची यंत्रणा कार्यन्वित करणेची सुचना दिलेली आहे.

सदर किचनमध्ये सिलेंडर यंत्रणा कार्यन्वित करणेकामी अधिकृत एजन्सीमार्फत सदरचे काम करुन घ्यावे लागणार आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे स्पेअरपार्टची आवश्यकता लागणार आहे.

| No. | Description | Make | Qty. |
|---|---|---|---|
| 1 | MANIFOLD FOR 10 Cylinder ( 5 x2 ) with "1" F.E.150# IN M.S. | Std | 01 nos. |
| 2 | Flexible Cylinder Suraksha Pigtails "36" | ISI Mark | 5 nos. |
| 3 | Click on Adaptor | UNITED | 5 nos. |
| 4 | Non Return Valve | UNITED | 5 nos. |
| 5 | "F" Type Washers | Std | 20 nos. |
| 6 | "M" Clamp "1" | Std | 20 nos. |
| 7 | Pressure Guage "4" dia 10 kg 3/8" ot BOTTOM ENT. | warree | 4 nos. |
| 8 | MS PIPE BEND "1" Seamless | Std | 10 nos. |
| 9. | MS Flanges "1" 150 # WITH GASKET NUT BOLT | Std | 06 set |
| 10 | Multimillioner Regulator "1" S.E. | Vannaz | 1 nos |
| 11 | Emergency Ball Valve "1" 150 # F.E. | Vergo/ LT | 02 nos |
| 12 | MS Adaptor "3/8' | Std | 4 nos |
| 13 | NEEDLE Control Valve "3/8" | Std | 4 nos |
| 14 | Stop & nut "3/8" Brass | Std | 1 nos |
| 15 | | | |
| 16 | Flame Arrestor "1" F.E. 150 # | UNITED | 1 nos |
| 17 | MS Elbow "3/8" | Std | 2 nos |
| 18 | MS Cuppling for Pressure Guage "3/8" | Std | 2 nos |
| 19 | MS Baral Nipple "1" x 9" Seamless | Std | 2 nos |
| 20 | MS Pipe "1" sd 40 | TATA | 80 Feet |

सदर नविन गॅस पाईप लाईन व सिलेंडर मेनीॅफोल्ड यंत्रणा उभारणीचे काम त्या क्षेत्रातले तज्ञ व एक्सप्लोझीव्ह विभागाचे मान्यताप्राप्त एजन्सी यांचेकडुन विहित पद्धतीने दरपत्रक मागवून करता येईल. उपरोक्त प्रमाणे साहीत्य व मजूरी कामासाठी अंदाजे रक्कम रु. ७०,०००/- (अक्षरी रुपये सत्तर हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे नविन भक्तनिवास कॅन्टिनमध्ये सिलेंडर मेनीफोर्ड यंत्रणा बनविणेकामी एक्सप्लोझीव्ह विभागाचे मान्यताप्राप्त एजन्सीकडून विहीत पद्धतीने दरपत्रक मागविण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ७०,०००/- (अक्षरी रुपये सत्तर हजार मात्र) पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळणेकामी मा. त्रिसदस्यीय समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नविन भक्तनिवास कॅन्टिनमध्ये सिलेंडर मेनीफोर्ड यंत्रणा बनविणेकामी एक्सप्लोझीव्ह विभागाचे मान्यताप्राप्त एजन्सीकडून विहीत पद्धतीने दरपत्रक मागविण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.६०** **पॉलिकप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे खरेदी विभागामार्फत मुख्यकॅन्टीन व ५०० रुम चहा कॅन्टीनला पॉलिकपाचा पुरवठा कॅन्टीनचे मागणीनुसार होत आहे. मुख्य कॅन्टीनला अंदाजे दररोज सरासरी ६०,००० नग पॉलिकप लागतात व ५०० रुम कॅन्टीनला अंदाजे दररोज सरासरी ४०,००० नग पॉलिकप लागतात. म्हणजेच दोन्ही कॅन्टीन मिळून दररोज सरासरी १,००,००० पॉलिकपाचा वापर होतो.दिनांक १७/०८/२०१२ अखेर खालिलप्रमाणे पॉलिकपाचा साठा शिल्लक दिसून येतो.

| मालाचा तपशिल | भांडार शिल्लक | विभागाकडील शिल्लक |
|---|---|---|
| पॉलिकप<br>व्हर्जीन फुड ग्रेड, १०० मि.ली क्षमता | ११,९०,००० कप | १,००,००० |

उपरोक्तप्रमाणे दर्शविलेला पॉलिकपाचा साठा अंदाजे १२ दिवस पुरेल एवढा असुन माहे सप्टेंबर २०१२ या महिन्याकरिता अंदाजे ४०,००,००० ( चाळीस लाख) पॉलिकप खरेदी करणे आवश्यक आहे. तरी मागील मंजुर टेंडर दराने पॉलिकप खरेदी करणेस व ४०,००,००० X ३१५ ( प्र. हजारी) = १२,६०,०००=०० (अक्षरी रुपये बारा लाख साठ हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे.तरी पॉलिकप खरेदी करणेचे प्रस्तवावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागासाठी आवश्यक असणारे पॉलीकप ऐवजी पेपर कप खरेदीकरणे व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात तसेच पुर्वी खरेदी करण्यात आलेले तसेच कॅन्टीन व भांडार विभागात शिल्लक असलेले पॉलीकप भक्तांना चहा देणेकामी प्रथम वापरण्यात यावेत, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.६१** **साईआश्रम १ व २ येथील कॅन्टीन मधील पदार्थ व दराबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम १ व २ चे काम पूर्ण होत आले असून लवकरच साईभक्तांच्या वास्तव्यासाठी रूमचा व हॉलचा वापर सुरू करण्यात येणार असल्यामुळे भक्तांच्या प्राथमिक गरजा भागविता याव्यात म्हणून

या दोन्ही ठिकाणी कॅन्टीन सुरू करून भक्तांना चहा,कॉफी,दूध, अल्पोपहार,जेवण पुरविणे गरजेचे आहे. साईआश्रम १ व २ कॅन्टीन कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने चालविणेस देणे कामी व खालील पदार्थ ठेवण्यास तत्वतः प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

| अ. नं | पदार्थचे नाव | नग | प्रमाण (वजन) | पदार्थाचे दर (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १ | वडा/पाव खोबरा चटणीसह हिरवी तळलेली मिरची | १ नग वडा १ पाव | प्रत्येकी १५० ग्रॅम | **०८ =००** |
| २ | मिसळ पाव | १ प्लेट मिसळ २ पाव | प्रत्येकी २५० ग्रॅम | **१५ =००** |
| ३ | रस्सा वडा व २ पाव | १ प्लेट रस्सा २ नग वडे | प्रत्येकी १०० ग्रॅम | **१५ =००** |
| ४ | शिरा | १ प्लेट | प्रत्येकी १५० ग्रॅम | **१५ =००** |
| ५ | कांदा पोहा | १ प्लेट | प्रत्येकी १५० ग्रॅम | **१० =००** |
| ६ | कांदा भजी - मिक्स मिरचीसह | १ प्लेट | प्रत्येकी १०० ग्रॅम | **१० =००** |
| ७ | बटाटा भजी - चटणी | १ प्लेट | प्रत्येकी १०० ग्रॅम | **१० =००** |
| ८ | पुरी भाजी | १ प्लेट | ४ पुरी, २०० ग्रॅम भाजी | **१८ =००** |
| ९ | इडली सांबर- चटणीसह | २ नग इटली | प्रत्येकी १०० ग्रॅम | **१५ =००** |
| १० | मसाला डोसा/सांबर चटणी | १ प्लेट | मसाला डोसा २५० ग्रॅम | **२२ =००** |
| ११ | साधा डोसा - सांबर चटणी | १ प्लेट | डोसा १५० ग्रॅम | **१८ =००** |
| १२ | मेदू वडा - सांबर चटणीसह | १ प्लेट सांबर २ नग मेदू वडा | प्रत्येकी १०० ग्रॅम | **२० =००** |
| १३ | दही वडा -आचारसह | १ प्लेट दही २ नग वडे | प्रत्येकी १०० ग्रॅम | **१८ =००** |
| १४ | उपमा - चटणी | १ प्लेट | प्रत्येकी २०० ग्रॅम | **१२ =००** |
| १५ | दही भात | १ प्लेट | प्रत्येकी ३०० ग्रॅम | **२० =००** |
| १६ | दाल खिचडी, दही व आचारसह | १ प्लेट | प्रत्येकी ३०० ग्रॅम | **३० =००** |
| १७ | चहा | १ कप | १०० मि.ली. | **०५ =००** |
| १८ | कॉफी | १ कप | १०० मि.ली. | **०८ =००** |
| १९ | दूध | १ कप | १०० मि.ली. | **०८ =००** |

वरील पदार्थांचे दर हे साईबाबा हॉस्पीटल मधील कॅन्टीनच्या दराशी मिळते जुळते असावे म्हणून त्यांचेशी चर्चा करुन दोन्ही कॅन्टीनमधील पदार्थांचे दर निश्चित केलेले आहे. ठरावामध्यें जेवणाचा उल्लेख झालेला नाही. परंतु साई आश्रम ०१ व ०२ हे दोनही ठिकाणे प्रसादालयापासुन दूर असल्याने सर्व भक्तांना प्रसादालयात जेवणासाठी येणे शक्य नसल्याने त्याच ठिकाणी कॅन्टीन मधून जेवण दिल्यास भक्तांची गैरसोय दूर होईल.

**<u>जेवणाचा दर खालीलप्रमाणे-</u>**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | मर्यादित राईसप्लेट | चपाती/पूरी<br>साधाभात,<br>सुकीभाजी<br>सांबर,रस्साभाजी,<br>दही,पापड,लोंणचे | चपाती ०४<br>किंवा पूरी ०६ | रु ३०= ०० |
| | ----------------------------- | ----- | ----------------- | ----------- |
| | मागणी नुसार जादा | चपाती | ०१ नग | ०३ = ०० |
| | | पूरी | ०१ नग | ०२ = ०० |
| | | साधा भात | ०१ वाटी | ०६ = ०० |
| | | सुकी भाजी | ०१ वाटी | ०६ = ०० |
| | | सांबर | ०१ वाटी | ०६ = ०० |
| | | रस्सा भाजी | ०१ वाटी | ०६ = ०० |
| | | दही | ०१ वाटी | ०६ = ०० |
| | | पापड | ०१ नग | ०६ = ०० |

**<u>कर्मचारी वर्गासाठी सवलतीचे चहाचे दर खालिलप्रमाणे-</u>**

| अ. नं. | पदार्थाचे नाव | नग | प्रमाण (वजन) | दर (रुपये) |
|---|---|---|---|---|
| ०१ | चहा | १ कप | १०० मि.लि. | ३ = ०० |
| ०२ | कॉफी | १ कप | १०० मि.लि | ५ = ०० |
| ०३ | दुध | १ कप | १०० मि.लि | ५ = ०० |

**कॅन्टीन मधील थंड पेय व ज्युस दर**

| अ.नं. | पदार्थाचे नांव | नग | प्रमाण (वजन) | दर (रुपये) |
|---|---|---|---|---|
| ०१ | बाजारात उपलब्ध असलेले थंड पदार्थ | नग | कंपनी पॅकिंग प्रमाणे | कंपनी दराप्रमाणे |
| ०२ | ज्युस - ( संत्री, मोसंबी, अननस | फुल ग्लास | ३०० मि.ली. | २५ = ०० |
| ०३ | मिल्क शेक (चॉकलेट, आंबा, चिक्कू, कोल्ड कॉफी,) | फुल ग्लास | ३०० मि.ली. | ३० = ०० |

तरी वरील पदार्थ ,थंड पेय, जेवण साईआश्रम १ व २ कॅन्टीन मध्ये ठेवण्यास व ठरविलेल्या दरास मा. व्यवस्थापन मंडळाचे मिटिंगमध्ये चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८२ यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**विषय नं.६२ नामांकित कंपनीचे गावरान तूप खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे प्रसादालय व मंदिर विभागासाठी लाडूप्रसाद व सत्यनारायण प्रसाद बनविणेकामी आवश्यक गावरान तुप हे प्रचलित पद्धतीनुसार निविदा विक्री करुन, दर मागवून, चर्चा वाटाघाटी करुन तसेच नमुने लॅब तपासणी करुन खरेदी केले जाते.

सन २०१२ चे माहे जुन-२०१२ ते सप्टेंबर-२०१२ अखेर गावरान तुप खरेदीकामी देखील उपरोक्त पद्धत अवलंबिली होती. मात्र त्या तुपामध्ये काही अडचणी आल्याने सदरचे तुप खरेदी करणे थांबवून तातडीची गरज म्हणून दुसऱ्या कंपनीचे तुप खरेदी करावे लागेल.

साईभक्तांची गर्दी व लाडू प्रसादाची वाढती मागणी पाहाता गावरान तुपाची आवश्यकता ही दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. त्यामुळे गावरान तुप खरेदीची प्रक्रिया ही अतिशय जाचक व बिकट होत आहे. कारण वेगवेगळे पुरवठाधारक वेगवेगळ्या ब्रॅण्डचे तुपाकरिता निविदा भरतात. प्रयोगशाळेमध्ये तुपाचे नमुने तपासणीसाठी पाठविले असता, त्यांचेकडून सदरचे तुप खाण्यायोग्य आहे किंवा नाही, हा अभिप्राय मिळतो, मात्र नमुन्यांचे दर्जाची क्रमावारी मिळत नाही, त्यामुळे लेखापरिक्षणाच्या नियमानुसार न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत निर्णय घ्यावा लागतो. परिणामी अयोग्य तुपाचा पुरवठा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे यापुढे गावरान तुप खरेदी करतांना निविदेमध्ये नामंकित कंपन्याचाच उल्लेख करणे योग्य ठरेल, तसेच गावरान तुप हे उत्पादकांकडूनच खरेदी करणे योग्य होईल. त्याबाबत निविदेमध्ये उल्लेख करता येईल. यापुर्वी खालील कंपन्यांचे गावरान तुपाचे टेंडर आलेले होते, त्यांचे इतर नावे खालीलप्रमाणे :-

**१.**वारणा, **२.**अमुल, **३.**हटसन, **४.**सोनाई, **५.**प्रभात, **६.**गोकुळ, **७.**स्वराज, **८.**डेरी स्पेशल **९.**गोदावरी **१०.**पंचामृत

गावरान तुपाची उत्पादक कंपनी/संघ तसेच ज्यांचे दुध संकलन आहे अशाच संस्थांकडून गावरान तुप घेणे योग्य होईल. तरी उपरोक्तपैकी कोणत्या ब्रॅण्डचे गावरान तुपाचा उल्लेख निविदेमध्ये करावा तसेच यापुढील किराणा माल खरेदीचे निविदेमध्ये त्यांचा समावेश करणेसाठी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे गावरान तुपाची उत्पादक कंपनी/संघ तसेच ज्यांचे दुध संकलन आहे अशा १.वारणा, २.अमुल, ३.हटसन, ४.सोनाई, ५.प्रभात, ६.गोकुळ, ७.स्वराज, ८.डेरी स्पेशल ९.गोदावरी १०.पंचामृत या ब्रॅण्डच्या गावरान तुपाचा समावेश किराणा माल खरेदीचे निविदेमध्ये करण्यात यावा असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.६३ संस्थानमध्ये वापर करण्यात येत असलेल्या प्लॅस्टीक पिशव्या व पॉलीकपचा वापर बंद करणेबाबत शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि.१३.०८.२०१२ चे पत्राबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगर पंचायत, शिर्डी यांनी दि.१५.०८.२०१२ पासून शिर्डी शहरातून प्लॅस्टिक कॅरीबॅग व तत्सम वस्तुंचा वापर व विल्हेवाटावर निर्बंध घालण्याचा ठराव मंजुर केला असून, प्लॅस्टिक पिशवीची विक्री करणे, हाताळणे, साठा करणे, वाहुन नेणे इ.वर निर्बंध घातला आहे. सबब संस्थान परिसरात त्याबाबत कार्यवाही करावी अशी विनंती केलेली आहे.

यावर पर्यायी बाब म्हणून याबाबत प्लॅस्टिक पिशवीचा पुरवठा करणारे पुरवठाधारक मे.सरस प्लॅस्टिक, अहमदनगर यांचे मालक श्री.गांधी यांना वरील विषयासंदर्भात चर्चा करण्यासाठी शिर्डी येथे समक्ष बोलविण्यात आले होते. सदर दिवशी मा.उप कार्यकारी अधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, अधिक्षक खरेदी यांचे समवेत झालेल्या चर्चेमध्ये श्री.गांधी यांनी प्लॅस्टिक पिशवीबाबत केंद्र शासनाचे पर्यावरण व वन मंत्रालयाच्या दिलेल्या शासन निर्णयात Plastic Waste (Management and Handling) Rules २०११ Press Note चे १ मधील तरतुदीनुसार Plastic Carry bags

shall not less than ४० Microns in thicknees. Under the earlier rules, minimum thickness was २० Microns. असे नमुद केलेले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेले आहेत.

| अ.नं. | तपशिल | प्रचलित पद्धत | शासन निर्णयानुसार पर्यायी पद्धत |
|---|---|---|---|
| ०१. | प्लॅस्टिक पिशवी साईज ४ x ६, | व्हर्जीन फुड ग्रेड, १०० गेज, एलडी | ५० मायक्रॉन/२०० गेज, एल.डी. व्हर्जीन फुड ग्रेड |
| ०२. | लाडू पिशवी ५ x ६, छपाईसह चार रंगात | व्हर्जीन फुड ग्रेड, २०० गेज, पीपी | ५० मायक्रॉन/२०० गेज, पी.पी. व्हर्जीन फुड ग्रेड |
| ०३. | साईज ८ x १०, छपाईसह एक रंगात, | व्हर्जीन फुड ग्रेड, १०० गेज, एलडी | ५० मायक्रॉन/२०० गेज, एल.डी. व्हर्जीन फुड ग्रेड |
| ०४. | पॉलीकप, वजन २ ग्रॅम, १०० मिली क्षमता | व्हर्जीन फुड ग्रेड | ४०० मायक्रॉन/१६०० गेज, व्हर्जीन फुड ग्रेड |

उपरोक्तनुसार शासन निर्णयानुसार पर्यायी पद्धतीनुसार खालीलप्रमाणे वापर करावा लागेल.

**अ) प्लॅस्टिक पिशवी**

१. सध्या वापरात असलेली प्लॅस्टिक पिशवी साईज ४ x ६ ही एल.डी. व्हर्जीन फुड ग्रेड असून २५ मायक्रॉन/१०० ोज आहे. शासन निर्णयानुसार ती ५० मायक्रॉन/२०० गेज, खरेदी करावी लागेल.

२. सध्या वापरात असलेली लाडू पिशवी ५ x ६, ५० मायक्रॉन/२०० गेज पी.पी., व्हर्जीन फुड ग्रेड आहे. शासन निर्णयाप्रमाणे ती योग्य मायक्रॉन/गेजची असल्याने त्यात बदल करण्याची आवश्यकता नाही.

३. सध्या वापरात असलेली साईज ८ x १०, प्लॅस्टिक पिशवी छपाईसह एक रंगात व्हर्जीन फुड ग्रेड, एल.डी. असून २५ मायक्रॉन/१०० गेज आहे. शासन निर्णयाप्रमाणे ती ५० मायक्रॉन/ २०० गेज, खरेदी करावी लागेल.

**ब) पॉलीकप**

१. सध्या वापरात असलेले पॉलीकप हे १०० मिली क्षमता, वजन २ ग्रॅम, ४०० मायक्रॉन/१६०० गेज, व्हर्जीन फुड ग्रेड आहेत. ते शासन निर्णयाप्रमाणे योग्य मायक्रोनचे असलेल्याने त्यात बदल करण्याची आवश्यकता नाही.

सबब **(अ)** माहे ऑक्टोबर २०१२ ते मार्च २०१३ अखेर सहा महिन्यासाठी खरेदी करावयाच्या निविदेत वरीलप्रमाणे अ.नं.१ व ३ मध्ये शासन निर्णयानुसार बदल करावयाचे आहेत.

**(ब)** पुढील नवीन टेंडरनुसार माल पुरवठा सुरु होईपावेतो सध्याचे पुरवठाधारकांकडून शासन निर्णयानुसार अ.नं.१ व ३ मध्ये नमुद केलेप्रमाणे मायक्रॉनच्या आवश्यक प्लॅस्टिक पिशव्या खरेदी कराव्यात असे मत आहे.

तरी वरील प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच समाधी मंदिरात फुल, हार, प्रसाद इत्यादीसाठी भक्तांकडुन प्लॅस्टीक पिशवीचा वापर होतो, प्लॅस्टीक पिशवीचा वापर होऊ नये, याकरीता वर्तमान पत्रात प्रेस नोट देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.६४ शिर्डी नगरपंचायत हद्दीतील गोळा होणारा दैनंदिन कचऱ्याचे तात्पुरते व्यवस्थापन श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे निमगांव शिवारातील गट नं.२५० मधील जागेत करणेसाठी परवानगी मिळणेबाबत मा.तहसिलदार, राहाता व मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.७८५ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.६५ शासकीय दराने जाहिरात देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.संजय भास्कर काळे, कोपरगांव यांनी त्यांचे दिनांक ०२.०७.२०१२ चे पत्रात "श्री साईबाबा संस्थान शिर्डी सन २००४ मध्ये राज्य शासनाने अधिनियमाव्दारे आपल्या नियंत्रणात घेतले. शासनाच्या विधी व न्याय विभाग संस्थानवर कारभार पहाण्यासाठी, कारभार चालवण्यासाठी विश्वस्त मंडळाची नियुक्ती करते. श्री साईबाबा संस्थान विविध वृत्तपत्रात आपल्या जाहिराती देत असते. सदरच्या जाहिरातींवर लक्षावधी रुपयांचा खर्च होतो. सदर जाहिराती या सरकारी दराने देणे संस्थानवर बंधणकारक आहे. गेली अनेक वर्ष जाहिराती व्यापारी दराने दिल्या जातात. त्यामुळे खर्चात प्रचंड वाढ झालेली आहे. संस्थानच्या अधिकाऱ्यांचे व वृत्तपत्राच्या प्रतिनिधींचे त्यामुळे सलगीचे, भागीदारीचे नाते

निर्माण झाले आहे. व्यापारी दर प्रत्येक आवृत्तीला, पानाला वेगवेगळे असतात. राज्य आवृत्तीच्या दरात जाहिरात दिली जाती, व प्रत्यक्षात जाहिरात जिल्हा आवृत्तीत येते. असे प्रकार वारंवार घडतात.

प्रत्येक वृत्तपत्रात आलटून पालटून जाहिरात येत असल्याने व सर्वांनाच त्यांचा लाभ होत असल्याने या विषय कुणीच तक्रार करीत नाही केलेली नाही. श्री साईबाबा संस्थानवर नियंत्रण जर उपजिल्हाधिकारी दर्जा असलेल्या शासकिय अधिकाऱ्याचे आहे तर मग त्याने सर्व जाहिराती शासकिय दरानेच दिल्या पाहिजे. वरील प्रमाणे बदल घडवल्यास संस्थानचे नुकसान वाचेल. मा.कार्यकारी अधिकारी यांनी सदरच्या बाबीकडे का दुर्लक्ष केले ? नुकसान हेतुपुरस्कर केले का ? याचा शोध घ्यावा. संस्थानचा बाकीचा सेवक वर्ग या बाबी पासून अनभिज्ञ असेल, पण उपकार्यकारी अधिकारी व अकाऊंटंट दोघे देखील शासन प्रतिनियुक्तीवर आलेले असल्याने त्यांच्या देखील ही बाब अर्थपुर्ण नजरेतून सुटली कशी ? त्यांचा देखील हेतु याचा शोध व्हावा. संस्थानच्या नुकसानीस जबाबदारी निश्चिती व्हावी. प्राधान्याने प्रथम युध्द पातळीवर येथुन पुढे दिल्या जाणाऱ्या संस्थानच्या सर्व जाहिराती शासनाने आपल्या स्वतः साठी ठरवलेल्या दराने देण्यास सुरुवात व्हावी. शासनाने व आपण संस्थानचे हित सांभाळावे हि विनंती. लवकरात लवकर कारवाईची अपेक्षा." असे कळविलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या जनसंपर्क कार्यालयामार्फत संस्थानच्या विविध विभागांच्या निविदा सूचना, पाहीजेत, सस्नेह निमंत्रण व प्रवेश सूचना आदि प्रकारच्या जाहिराती विविध वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात येतात. या जाहिराती प्रसिध्द करणेसाठी जनसंपर्क कार्यालयास वार्षिक अंदाजपत्रक मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाने मंजूर करण्यात येते. संस्थानच्या जाहिराती वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ३०.०३.२००२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८६ नूसार वर्तमानपत्रांचे स्थानीक प्रतिनिधींमार्फत देण्यात येतात. साधारणपणे जाहिराती देतांना संबंधीत मालाचा पुरवठा, मालाची किंमत आणि माल खरेदीकामी येणारा अपेक्षित खर्च आदि बाबी लक्षात घेवून राज्यातील मोठया शहरांमधून जास्तीत जास्त प्रतिसाद मिळण्याच्या दृष्टीने मुंबई मधील महत्वाची दैनिके, पुण्यातील महत्वाचे दैनिक, नगर, नासिक, औरंगाबाद, नागपूर आदि शहरातील महत्वाच्या दैनिकांच्या विशिष्ट आवृत्तीला, तसेच खरेदी करावयाच्या मालाचे पुरवठादार आणखी दुसऱ्या शहरामध्ये असले तर त्याही शहरातील जास्ती खपाच्या व कमी खर्चाच्या दैनिकात जाहिराती देण्यात येतात.

शासकीय दराने जाहिरात प्रसिध्द करणेकामी पारित झालेल्या शासन निर्णय क्र.जाहिरात २००९/ प्र.क्र.१३७/का-३४ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक ३१.०८.२००९ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे. ९) शासनाच्या कोणत्याही विभागांनी शासकीय जाहिराती जाहीरात अभिकरणांमार्फत (एजन्सीमार्फत) देऊ नयेत. शासनाच्या सर्व जाहिरातींचे वितरण शासनमान्य दराने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत चक्रीय पध्दतीने (रोटेशन) करणे सर्व विभागांवर बंधनकारक राहील. फक्त जाहिरात तयार करण्याकरिताच (क्रिएटीव्ह) अभिकरणांची (एजंन्सीची) मदत घेता येईल. मात्र अशा अभिकरणांची यादी (एजन्सीचे पॅनल) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत तयार करण्यात यावे.

११) दिनांक १ मे, २००१ च्या शासन निर्णयाच्या जोडपत्र-अ मधील नियम क्र. ६ अन्वये शासनाची विविध मंडळे, महामंडळे, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगर परिषदा, शासन पुरस्कृत सहकारी संस्था, आदि स्वायत्त संस्थांना वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देण्यासंदर्भात शासनाच्या धोरणानुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्याबाबत महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांनी अमलबजावणी प्रक्रिया व नियमावली निश्चित करुन दिलेली आहे. तथापी सदर मंडळे, महामंडळे, स्वायत्त संस्थां त्यांच्या वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देण्यासंदर्भात, शासनाच्या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करिता नाहीत असे निदर्शनास आले आहे. म्हणून पून्हा निर्देश देण्यात येत आहेत की, मंडळे, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, इत्यादी स्वायत्त संस्था यांनी त्यांच्या वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देताना शासकीय धोरणाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी व त्यांनी त्यांच्या जाहिराती शासनाच्या जाहिरात वितरण धोरणानुसारच देण्यात आल्या असल्याबाबत संबंधितांसमोर स्पष्ट करावे.

१२) दिनांक १ मे, २००१ च्या शासन निर्णयाच्या जोडपत्र-अ मधील नियम क्र.५-इ मधील वृत्तपत्रनिहाय प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातांची मुल्य मर्यादा खालीलप्रमाणे सुधारित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | एका कामाचे मूल्य | जाहिरात वितरण करण्याचे अधिकार | जाहिरात प्रसिध्दीचे वृत्तपत्र |
|---|---|---|---|
| १ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रु.२० लाखांपर्यंत आहे अशी जाहिरात | जिल्हा माहिती अधिकारी | एक 'क' वर्ग दैनिक व एक साप्ताहिक |
| २ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रु.२० लाखाच्यावर ते ५५ लाखांपर्यंत आहे अशी जाहिरात | विभागीय माहिती उपसंचालक | एक 'ब' वर्ग दैनिक व साप्ताहिक |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मूल्य रु.५५ लाखापेक्षा अधिक आहे अशी जाहिरात | मुख्यालय | १) संबंधित विभागातील 'अ' वर्ग दैनिकास व त्या विभागातील 'ब' व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका 'क' वर्ग दैनिकास आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे सें.मी.चे प्रमाण लक्षात घेऊन जाहिरातीचे वितरण करण्यात येईल. |

त्यानुषंगाने जनसंपर्क विभागाचे टिपणीवर प्राप्त झालेल्या निर्देशानुसार शिर्डी येथील उपजिल्हा माहीती कार्यालयाकडून विविध वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेकामी निर्धारीत केलेले शासकीय दरांची माहीती मागवीण्यात आलेली असून त्या आधारे वर्तमानपत्राचे आवृत्ती निहाय शासकीय दर व व्यावसायीक दर यांचा तक्ता सोबत अवलोकनार्थ सादर केलेला आहे. तसेच सन २०११-१२ या आर्थिक वर्षात वर्तमानपत्र निहाय जाहिरात प्रसिध्द करणेकामी झालेल्या खर्चाचा तक्ताही अवलोकनार्थ सोबत जोडला आहे.

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदी विचारात घेवून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या विविध जाहिराती शासकीय दराने प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावयाची झाल्यास मा.व्यवस्थापन समितीचा यासंबंधीचा दिनांक ३०.०३.२००२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८६ चा ठराव रद्द करुन सदरबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- जनसंपर्क विभागप्रमुख)

---

**विषय नं.६६ निरुपयोगी/ भंगार डेडस्टॉक साहित्याची जाहीर लिलावाने विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमध्ये सततच्या तसेच दैनंदिन वापरामुळे डेडस्टॉक साहित्याची झीज होते. परिणामी अशाप्रकारचे साहित्य खराब होते, निरूपयोगी बनते. श्री साईबाबा संस्थानमध्ये अशा वापरून निरूपयोगी झालेल्या डेडस्टॉक साहित्याची विल्हेवाट लावणेकामी अभिलेख कक्ष हा स्वतंत्र विभाग काम पाहत आहे. डेडस्टॉक साहीत्याच्या रितसर मंजूरी घेवून त्याचे एकत्रित लॉट तयार करून, त्या लॉटच्या अपेक्षित किंमती ठरवून नियमाप्रमाणे मा.व्यवस्थापन समिती सदस्यांचे तसेच संस्थान अधिका-यांचे प्रमुख उपस्थितीत जाहीर लिलाव करणेत येतो.

निरूपयोगी डेडस्टॉकचे साहित्य जास्त काळ पडून राहिल्यास त्याची उन,वारा, पावसामुळे झीज होते. त्यापासून दुर्गंधी सुटते, अडचणीमुळे वेळेवर साफसफाई न झाल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण होऊन आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. विनाकारण जागा अडकून पडल्याने गर्दी/सुट्टीचे काळात साईभक्तांना विविध सुविधा पुरविणेचे दृष्टीने अडचणीचे होते. अशाप्रकारचे भंगार साहित्याची वेळीच विल्हेवाट लावली नाही तर विनाकारण त्याची रक्कम अडकून पडते व त्यात संस्थेची आर्थिक हानी होते. विभागांनी त्यांचेकडे निरूपयोगी अवस्थेत पडून असलेल्या डेडस्टॉक साहित्याची लवकरात लवकर जाहीर लिलावाने विक्री करावी, असे वारंवार कळविले आहे. त्यानुसार संदर्भ क्र.२ चे शासनाकडील मंजूरीप्रमाणे संस्थानची विहीत कार्यपध्दती तसेच शासनाकडील कार्यपध्दती यांचा योग्य मिलाप घालून मौल्यवान नसलेल्या वस्तूंची जाहीर लिलावाने विक्री करणेत यावी व त्याचा पूर्तता अहवाल शासनास कळविणेत यावा, असे निर्देश दिलेले आहेत.

संस्थानचे इतर विभागाकडून वेळोवेळी मंजूरी घेवून जमा झालेले भंगार डेडस्टॉक साहित्य महाराष्ट्र अधिनियम-२००४ मधील तरतूदींशी अधिन राहून नियमाप्रमाणे रू.५०,०००/- आत घसारा किंमत असलेल्या साहित्याची उपरोक्त संदर्भ क्र.३ नुसार वार्षिक कोटेशनचे उच्चत्तम दराने विक्री करणेत येतात. परंतू सध्या खालील विभागांकडून जमा झालेले साहित्य इलेक्ट्रॉनिक स्वरूपाचे असल्याने ते वार्षिक कोटेशनदराने विक्री करणे अडचणीचे होते. अशा साहित्याची विल्हेवाट जाहीर लिलावानेच लावावी लागते.

अभिलेख कक्ष विभागाकडे सध्या १) विद्युत विभागाकडील-१२, २) द्वारावती विभागाकडील-०१, ३) प्रकाशने विभागाकडील-०१, ४) ध्वनीक्षेपन विभागाकडील-०२, ५) साईप्रसादालय विभागाकडील-०१, ६) प्र.शाखा,जावक विभाग-०१, ७) संरक्षण विभाग-०१, अशी लिलाव करणेसंबंधी एकुण-१९ प्रकरणे आलेली आहे. साईप्रसादालय विभाग तसेच विद्युत विभागातील प्रमुखांनी अशा निरूपयोगी साहित्यामुळे खुप जागा अडकून पडलेली आहे, तसेच सदरचे साहित्य पडून असल्यामुळे अंतर्गत लेखापरिक्षकांनी सदर साहित्याची लवकरात लवकर विल्हेवाट लावावी असे कळविलेले आहे. तद्नंतर संदर्भ क्र.४ नुसार ज्या विभागाकडे निरूपयोगी भंगार साहित्याचे जाहीर लिलावाची सरकार मान्यतेची काही प्रकरणे असल्यास त्यांनी इकडील कार्यालयास कळवावे असे कळविले होते, त्यानुसार सर्व विभागांचा अभिप्राय मागविणेत येवून त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली आहे.

लिलावातील वस्तूंची अपेक्षित विक्री किंमत ठरवितांना संबंधीत विभागांनी लेखाशाखेकडून सदरच्या वस्तूंची दि.३१/०३/२०१२ अखेर रिटर्न डाऊन व्हॅल्युची (घसारा वजा किंमत) माहिती घेतलेली आहे. संबंधित विभागांनी लिलावासाठी मंजूर झालेले साहित्य आपल्याच ताब्यात स्वतःचे जबाबदारीवर व्यवस्थितपणे ठेवायचे आहे. उपरोक्त १ ते ७ विभागांपैकी द्वारावती,प्रकाशने,व संरक्षण विभाग यांनी जाहिर लिलावाकरीता कळविलेले साहित्य हे लाकडी फर्निचर आहे. सदर लाकडी साहित्य लिलावात तीनवार बोलीने विक्री न झाल्यास (अपेक्षित किंमत न आल्यास) त्याची चालू वार्षिक कोटेशनचे उच्चत्तम दराने विक्री करता येईल असे नम्र मत आहे,त्यास मान्यता असावी. परंतू इतर विभागांचे साहित्य इलेक्ट्रॉनिक्स स्वरूपाचे असल्याने त्यांची जाहिर लिलावानेच विक्री करता येईल.

अभिलेख कक्ष विभागाकडे बंदीस्त जागा नसलेने तसेच पावसाळी वातावरण असल्याने सदरचे लिलावातील साहित्य उघडयावर न ठेवता संबंधीत विभागाचे ताब्यातच ठेवून **'जेथे आहे जसे आहे'** त्या परिस्थितीत जागेवरच लिलावधारकांना पाहणीकरीता ठेवता येईल व लिलाव झालेनंतर अंतीम बोलीधारकांस तेथेच ताब्यात देता येईल.

निरूपयोगी भंगार साहित्याचे लिलावकामी संस्थानचे इतर विभागाकडून जमा झालेल्या साहित्याचे वेगवेगळे १४ लॉट तयार करणेत आलेले आहेत. माहितीसाठी त्याची यादी सोबत जोडलेली आहे. तरी निरूपयोगी भंगार साहित्याचा लिलाव करणेकामी खालील मसूद्यांना मान्यता मिळावी.

१. जाहीर लिलावाने विक्री करावयाच्या डेडस्टॉक साहित्याचे सोबतचे यादीप्रमाणे प्रस्तावीत केलेले लॉट्सला मंजूरी मिळणेस विनंती.

२. डेडस्टॉक निरूपयोगी भंगार साहित्याचे लिलाव बोली बोलणेकामी अनामत रक्कम रू.१०,०००/- ठेवणेकामी मान्यता असावी.

३. जनसंपर्क कार्यालयामार्फत भंगार साहित्याचे जाहीर लिलावकामी सोबतचे मसूदेप्रमाणे वर्तमान पत्रांमध्ये जाहीरात देणेकामी मंजूरी मिळावी हि विनंती.

४. संबंधीत विभागांनी प्रस्तावीत केलेले निरूपयोगी भंगार साहित्य जाहीर लिलावात तीन वार बोली झालेनंतर विक्री करून त्यानंतर सदर साहित्याची नोंद डेडस्टॉक मधून निर्लेखीत करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७८७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संस्थानकडील निरोपयोगी भंगार डेडस्टॉक साहित्याची जाहीर लिलावाने विक्री करणेत यावी असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, अभिलेख कक्ष)

---

**विषय नं.६७ जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांना सशस्त्र सेना ध्वजदिन- २०१२ निधी संकलनास आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.डॉ.संजीव कुमार, जिल्हाधिकारी अहमदनगर तथा अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अहमदनगर, यांनी जा.क्र.१३१२/१/जिसैका-३/२४२१, दि.१७ जुलै २०१२ चे पत्राने सन २०११ चे उद्दीष्ट पुर्ततेसाठी रु.११ लाख सशस्त्र सेना ध्वजदिन निधी मिळणेसाठी खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

मातृभूमिच्या च्या संरक्षणाबरोबरच देशाअंतर्गत उद्‌भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्था, भुकंप, महापूर, अपघात या सारख्या आपत्तीत नागरिकांच्या सहाय्याला तत्परतेने धावून जाणाऱ्या सैनिकांना दरवर्षी वीरगती प्राप्त होते, तसेच असंख्य सैनिक जखमी व अपंग होतात. अशा वीरांच्या कुटंबाकरीता कल्याणकारी योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडुन दरवर्षी निधी संकलीत केला जातो. यावर्षी अहमदनगर जिल्हयासाठी रुपये ९९ लाखाचे उदिष्ठ ठरवून देण्यात आलेले आहे. सदरचे उद्दिष्ट पुर्ततेसाठी श्री साईबाबा संस्थानकडून या कार्यास रु.११ लाख मदत मिळावी.

मागील वर्षी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/०१/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१३६ अन्वये, कर्मचाऱ्यांकडून खालीलप्रमाणे रक्कम कपात करुन जमा झालेली रक्कम व उर्वरीत संस्थानचा हिस्सा, असे एकुण रुपये ११ लाख सशस्त्र सेना ध्वजदिन निधी देण्यास मान्यता दिलेली होती.

| अ.नं. | वेतनबॅन्ड | वसुल करावयाची रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी | ३०० |
| २ | १५६००-३९१०० | ३०० |
| ३ | ९३००-३४८०० | २४० |
| ४ | ५२००-२०२०० | १२५ |
| ५ | ४६५०-१७४०० | १०० |
| ६ | ४४४०-७४४० | ७५ |
| ७ | ५०,००० (फिक्स पे) | ३०० |
| ८ | ३०,००० ते ३५,००० (फिक्स पे) | ३०० |
| ९ | २७,००० (फिक्स पे) | २५० |
| १० | २१,००० (फिक्स पे) | २०० |
| ११ | १०,००० ते १२,००० (फिक्स पे) | १०० |

| | | |
|---|---|---|
| १२ | ७५०० (फिक्स पे) | ७० |
| १३ | २००० ते ५५०० (फिक्स पे) | २५ |

मा.व्यवस्थापन समितीचा उपरोक्त निर्णय क्र.१३६ नुसार वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांकडून रक्कम कपात करुन रु.२,७६,७५५/- एवढी रक्कम जमा झालेली होती व उर्वरीत संस्थानच्या हिस्स्याची रक्कम रुपये ८,२३,२४५/- असे एकुण रुपये ११ लाख ध्वजदिन निधीसाठी, युनियन बँक शाखा शिर्डीचा चेक क्र.११७३६, दि.१९.४.२०१२ अन्वये दिलेले आहेत.

सन २००४ चा अधिनियम क्र.१७ (२) (ण) मानव जातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. तसेच अधिनियम क्र.१७ (६) या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. अशी तरदुत आहे. सदरच्या तरतुदीनुसार अशा प्रस्तावास शासनाची मान्यता घेणे आवश्यक नाही.

दि.१७ जुलै २०१२ चे पत्रातील मागणीस अनुसरुन सशस्त्र सेना ध्वनदिनासाठी रु.११ लाख निधी देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २००४ चा अधिनियम कलम १७(०२) (ण( व कलम १७(६) मधील तरतूदीस अधीन राहून समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्य व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. सदर तरतूदीनुसार प्रस्तावास शासनाची मान्यता घेणे आवश्यक नसल्याने मागील वर्षाप्रमाणे कर्मचाऱ्यांकडून रक्कम कपात करुन जमा होणारी रक्कम व उर्वरीत संस्थानची रक्कम असे रुपये ११ लाख जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अहमदनगर यांना, सन २०१२-१३ चा सशस्त्र सेना ध्वजदिनी निधी संकलनास आर्थिक मदत देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.६८** **दिपावली (लक्ष्मीपुजन) या दिवशी तेलाचे दिवे लावणे या कार्यक्रमासाठी साईनगर मैदान मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.अरुण गायकवाड, विश्वस्त, साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट,शिर्डी यांनी मंगळवार दि.१३/११/२०१२ रोजी दिपावली (लक्ष्मीपूजन) या दिवशी तेलाचे दिवे लावणे याबाबतच्या कार्यक्रमासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून दि.१०/११/२०१२ ते १३/११/२०१२ अखेर ३ दिवस साईनगर मैदानाचा वापर करणेस परवानगी मिळावी. अशी विनंती केलेली आहे.

श्री.अरुण गायकवाड , विश्वस्त, साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट,शिर्डी यांनी या वर्षी तेलाचे दिवे लक्ष्मीपुजन ( दिपावली ) दिवशी लावणेकरीता साईनगर मैदान वापरास मिळणेस विनंती केलेली आहे. यांची नोंद ग्रिनीज बुकात होणार असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

यापुर्वी साईनगर मैदान धार्मिक, सांस्कृतिक, साईभजन संध्या हे कार्यक्रम करणेस व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनंतर देण्यात आलेले आहे. सदर कार्यक्रम स्थानीक असल्याने खालील अटी शर्तीवर साईनगर मैदान देणेबाबत निर्णय होणेकरीता सदरचा विषय मा.त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ ठेवण्यास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**<u>अटी व शर्ती -</u>**

१) साईनगर मैदानाचा रुपये २०००/- एक दिवसाचा याप्रमाणे तीन दिवसाचे रक्कम रुपये ६०००/- स्वच्छता आकार साईप्रसाद निवासस्थान येथे भरावा लागेल.

२) सदर कार्यक्रमासाठी आवश्यक त्या परवानग्या आयोजकास घ्याव्या लागतील.

३) कार्यक्रमासाठी स्टेज, मंडप, ध्वनीक्षेपण, विद्युत व्यवस्था आपल्या ट्रस्टला स्वखर्चाने करावी लागेल.

४) परिसरातील राहणारे कर्मचारी व साईबाबा हॉस्पीटलमधील रुग्णांना आवाजाचा त्रास होणार नाही यांची खबरदारी घ्यावी.

५) परिसरात स्वच्छता ठेवावी.

६) दिव्यांचा कार्यक्रम असल्याने अपघात होऊ नये यासाठी खबरदारी घ्यावी.

७) कोणत्याही परीस्थीतीत फटाके/आतिषबाजी करु नये.

८) फायर फायटरची व्यवस्था आयोजकामार्फत करणेत यावी.

**निर्णय क्र.७८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.अरुण गायकवाड, विश्वस्त, साईभक्त लक्ष्मीबाई शिंदे ट्रस्ट, शिर्डी यांना दिनांक १०/११/२०१२ ते १३/११/२०१२ अखेर ३ दिवस तेलाचे दिवे प्रस्तावात नमुद केलेल्या अटी व शर्तीवर साईनगर मैदानात लावण्यास परवानगी देण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही- प्रशासन शाखा, वशी-०५)

---

**विषय नं.६९** **श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, ऑफिस असिस्टंट, माहिती केंद्र, सिकंदराबाद यांचा मुदतवाढ मिळणेबाबतच्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीमार्फत श्री साईभक्तांना सोई व सुविधा मिळणेकामी सिकंदराबाद येथे माहिती केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. सदर ठिकाणी सुरु करण्यात आलेल्या माहिती सुविधा केंद्रामध्ये श्री चंद्रकांत माणकचंद सुराणा यांची ऑफिस असिस्टंट या पदावर दरमहा एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांना जा.नं.एसएसएस वशी ०१/३०४६/२०११ दि.१५/०९/२०११ अन्वये देण्यात आलेल्या मुदतवाढीची मुदत दि.२३/०८/२०१२ रोजी संपुष्ठात येत आहे. श्री सुराणा यांनी दि.१३/०८/२०१२ चे विनंती अर्जाने मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर अधीक्षक, प्रकाशने विभाग यांनी " श्री सुराणा यांचे काम समाधानकारक असुन ते प्रामाणिक आहेत त्यांना एक वर्षासाठी मुदतवाढ देणेस हरकत नाही. " असे अभिप्राय दिलेले आहेत.

श्री चंद्रकांत सुराणा, ऑफिस असिस्टंट, सिकंदराबाद यांचे अर्जातील विनंती व अधीक्षक, प्रकाशने विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना लगतच्या तारखेपासून पुढे एक वर्ष मुदतवाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७९० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री चंद्रकांत सुराणा, सिकंदराबाद, ऑफिस असिस्टंट, या पदावर दि.२४.०८.२०१२ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी पुर्वीचेच अटी, शर्तीवर व मासिक मानधनावर कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७० परिविक्षाधीन कालावधीसाठी लिपीक-टंकलेखक व दुरध्वनी चालक पदावर पदस्थापना केलेल्या कर्मचाऱ्यांच्या विभागीय परिक्षेत उत्तीर्ण झालेबाबत संस्थान सेवेत कायम करुन त्यांना वेतनवाढ लागू करणेबाबत.**

**प्रस्ताव-** वर्ग-४ च्या पदावरील कर्मचाऱ्यांच्या लिपीक-टंकलेखक तसेच दूरध्वनी चालक पदावर दि.०७/०८/२००९ व दि.०१/११/२०१० पासून एक वर्षाचे परिविक्षाधीन कालावधीसाठी पदस्थापना करण्यात आलेल्या आहेत.

मा.व्यवस्थापन समिती दि.१९/११/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७६५ (४-अ) नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

परिविक्षाधीन कालावधीसाठी पदस्थापना केलेल्या कर्मचाऱ्यांच्या दि.१४/११/२०१० रोजी लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात आलेल्या कार्यवाहीच्या पदनिहाय प्रश्नोत्तर पत्रिका व गुणपत्रकांच्या याद्यांचे सिलबंद लखोटे आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. परिविक्षाधीन कालावधीसाठी लिपीक-टंकलेखक व इतर तांत्रिक पदांवर पदस्थापना केलेल्या कर्मचाऱ्यांच्या संस्थानमार्फत घेण्यात आलेल्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेत, ज्या कर्मचाऱ्यांना लेखी परिक्षेत किमान ३५% गुण व प्रात्यक्षिक परिक्षेत किमान ४०% गुण मिळाले अशाच कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करण्यात यावे. तसेच नियमानुसार अपात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी १ वर्ष वाढवून त्यांना पुनःश्च एक संधी म्हणून त्यांच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात याव्यात. जोपर्यंत सदरहू कर्मचारी उत्तीर्ण होत नाहीत अशा कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतनवाढ देण्यात येवू नये.

उपरोक्त निर्णयानुसार अनुत्तीर्ण झालेल्या तसेच शैक्षणिक पात्रता अपूर्ण असणाऱ्या १७ कर्मचाऱ्यांना संबंधीतांनी १ वर्षाच्या आत शैक्षणिक पात्रतेच्या अटी पूर्ण करणे तसेच संस्थानने घेतलेल्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेत उत्तीर्ण होणेचे अटीवर त्यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्ष वाढविण्यात आला आहे. सदरची पूर्तता केल्यानंतर संबंधीतांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत तसेच वार्षिक पगारवाढ देणेबाबत विचार करण्यात येईल. असे जा.नं.एसएसएस/वशी-०१/४७८२/२०१२ दि.२३/०१/२०१२ च्या ज्ञापनाने संबंधीतांना कळविण्यात आले आहे. त्याची प्रत सोबत जोडलेली आहे.

सोबतच्या ज्ञापन यादीतील श्री.समाधान चोखा गवई, लिपीक-टंकलेखक, लेखाशाखा विभाग हे सुरूवातीलाच विभागीय परीक्षेत उत्तीर्ण झालेले आहेत. आता त्यांनी MS-CIT ही अपुर्ण शैक्षणिक पात्रता पुर्ण केलेबाबत दि.२६/०६/२०१२ रोजीचे अर्जान्वये MS-CIT चे प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

निकषानुसार १५ अनुत्तीर्ण कर्मचाऱ्यांच्या दि.२६/०२/२०१२ रोजी पुनःश्च लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात आलेल्या आहेत. मा.व्यवस्थापन समिती दि.२८/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-१/११४१/२०१२ दि.१८/०६/२०१२ अन्वये उत्तीर्ण-अनुत्तीर्ण कर्मचाऱ्यांचा निकाल जाहीर करण्यात आलेला आहे. त्यापैकी सोबतच्या यादीतील अ.नं.१ ते ७ कर्मचारी उत्तीर्ण झालेले आहेत. त्याची प्रत सोबत परिशिष्ठ अ म्हणून माहितीसाठी सादर केली आहे.

वार्षिक पगार वाढ देणेबाबत महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

प्रकरण नं.३- वेतन नियम नं.३९ (१) मध्ये अपवाद १ (ए) परिवीक्षाधीन म्हणून एखाद्या पदावर थेट नियुक्त केलेल्या शासकीय कर्मचाऱ्याची वेतनवाढ (वेतनवाढी) परिवीक्षेच्या कालावधीत पुढीलप्रमाणे विनियमित करण्यात यावी:-

**(एक)** अशा कर्मचाऱ्याची पहिली वेतनवाढ, त्याचा एक वर्षाचा परिवीक्षेचा कालावधी पूर्ण झाल्यावर देण्यात यावी आणि नंतरची वेतनवाढ, त्याने परिवीक्षेचा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यावर देण्यात यावी.

**(दोन)** एखाद्या कर्मचाऱ्याचा परिवीक्षेचा कालावधी, विहित अवधीत तो विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यामुळे किंवा परिवीक्षेच्या कालावधीमध्ये त्याने रजा घेतल्यामुळे, लांबलेला असेल आणि अशा कर्मचाऱ्याने परिवीक्षेचा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर दीर्घ मुदतीच्या तत्त्वावर त्याची त्या पदावर नियुक्ती झाली असेल तेव्हा, जर तो परिवीक्षाधीन नसता तर, त्याला जे वेतन मिळाले असते असे वेतन व आनुषंगिक थकबाकी देण्यात यावी.

**(तीन)** काम असमाधानकारक असल्यामुळे ज्याचा परिवीक्षेचा कालावधी लांबलेला आहे अशा कर्मचाऱ्यास, परिवीक्षेचा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्याच्या तारखेपासून फक्त दुसरी वेतनवाढ देण्यात यावी. परंतु तो थकबाकी मिळण्यास पात्र असणार नाही.

वरील वेतन नियम नं.३९ (१) चे नियमानुसार एक वर्षाचा परिवीक्षेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर पहिली वेतनवाढ संबंधीत सर्व कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली आहे.

जा.नं.एसएसएस/वशी-०१/१९१२/२०१२ दि.६/८/२०१२ रोजीचे परिपत्रकान्वये संबंधीत कर्मचाऱ्यांचेबाबत अधिक्षक / विभाग प्रमुख यांचेकडून खालीलप्रमाणे अभिप्राय मागविण्यात आलेले आहेत.

१) संबंधीत कर्मचाऱ्यांची वर्तणूक कशी आहे ?

२) ते हुकूमाप्रमाणे, योग्य रितीने काम करतात किंवा कसे ?

३) त्यांचेबाबत काही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावीत आहेत काय ?

४) संबंधीत कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करावे अगर कसे ?

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

त्यानुसार संबंधीत कर्मचाऱ्यांना कायम करणेबाबत संबंधीत अधिक्षक/विभाग प्रमुख यांनी त्यांचे कामाबाबत अनुकूल अभिप्राय दिलेले आहेत. तसेच श्री.समाधान चोखा गवई, लिपीक-टंकलेखक, लेखाशाखा विभाग यांनी MS-CIT ची अपूर्ण असलेली पात्रता आता पूर्ण केलेली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ नियम क्र.३९ (दोन) नुसार संबंधीत कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे रकाना नं.६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतनवाढ थकबाकीसह देण्यास तसेच रकाना नं.८ मध्ये दर्शविलेल्या तारखेस संबंधीतांना संस्थान सेवेत कायम करणेस मान्यता असावी.

| अ. नं. | कर्मचाऱ्याचे नांव, पदनाम, विभाग व वेतनबँड+ग्रेड वेतन | सध्याचे मुळ वेतन | ग्रेड वेतन | वार्षिक पगारवाढ | वार्षिक पगारवाढी नंतर मुळ वेतन | वेतनवाढीची तारीख | सेवेत कायम करावयाची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | श्री.समाधान चोखा गवई, लिपीक, लेखाशाखा विभाग ५२००-२०२००+१९०० | ६०७०<br>६३१० | १९००<br>१९०० | २४०<br>२५० | ६३१०<br>६५६० | ०१/०७/२०११<br>०१/०७/२०१२ | ०६/०८/२०११ |
| २ | श्री.प्रशांत गजानन पारखे, लिपीक, साईनाथ रुग्णालय ५२००-२०२००+१९०० | ६०७०<br>६३१० | १९००<br>१९०० | २४०<br>२५० | ६३१०<br>६५६० | ०१/०७/२०११<br>०१/०७/२०१२ | ०६/०८/२०११ |
| ३ | श्री.नामदेव सखाहरी सरोदे, लिपीक, साईनाथ रुग्णालय ५२००-२०२००+१९०० | ६०७०<br>६३१० | १९००<br>१९०० | २४०<br>२५० | ६३१०<br>६५६० | ०१/०७/२०११<br>०१/०७/२०१२ | ०६/०८/२०११ |
| ४ | श्री.अण्णासाहेब धोंडीबा शेळके, लिपीक, साईबाबा हॉस्पिटल ५२००-२०२००+१९०० | ६०७०<br>६३१० | १९००<br>१९०० | २४०<br>२५० | ६३१०<br>६५६० | ०१/०७/२०११<br>०१/०७/२०१२ | ०६/०८/२०११ |
| ५ | श्री.सुपेकर विजय बाबुराव, लिपीक, द्वारावती भक्तनिवास ५२००-२०२००+१९०० | ६०७०<br>६३१० | १९००<br>१९०० | २४०<br>२५० | ६३१०<br>६५६० | ०१/०७/२०११<br>०१/०७/२०१२ | ०६/०८/२०११ |
| ६ | श्री.सोमनाथ नारायण वाणी, दूरध्वनी चालक, विद्युत विभाग ५२००-२०२००+१९०० | ६०७०<br>६३१० | १९००<br>१९०० | २४०<br>२५० | ६३१०<br>६५६० | ०१/०७/२०११<br>०१/०७/२०१२ | ०६/०८/२०११ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | श्री.बापुसाहेब कारभारी बागल, दूरध्वनी चालक, विद्युत विभाग ५२००-२०२००+१९०० | ५८३०<br>६०७० | १९००<br>१९०० | २४०<br>२४० | ६०७०<br>६३१० | ०१/०७/२०११<br>०१/०७/२०१२ | ३१/१०/२०१२ |
| ८ | श्री.सुरेश महादेव खराडे दूरध्वनी चालक, विद्युत विभाग ५२००-२०२००+१९०० | ५८३०<br>६०७० | १९००<br>१९०० | २४०<br>२४० | ६०७०<br>६३१० | ०१/०७/२०११<br>०१/०७/२०१२ | ३१/१०/२०१२ |

तसेच निकषानुसार सोबतच्या परिशिष्ठ अ मधील अ.नं.८ ते १५ असे एकूण - ८ कर्मचारी विभागीय परीक्षेत अनुत्तीर्ण झालेले आहेत. अशा सर्व कर्मचाऱ्यांची पुनःश्च लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेऊन त्यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत विचार करता येईल. मान्यतेसाठी सादर

**निर्णय क्र.७९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ नियम क्र.३९ (दोन) नुसार उपरोक्त ०१ ते ०८ कर्मचाऱ्यांना तक्त्यातील रकाना नं.६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वेतनवाढ थकबाकीसह देण्यास तसेच रकाना नं.८ मध्ये दर्शविलेल्या तारखेस संबंधीतांना संस्थान सेवेत कायम करण्यात यावे.**

**तसेच जे कर्मचारी विभागीय परिक्षेत अनुत्तीर्ण झालेले आहेत अशा सर्व कर्मचाऱ्यांची पुनःच लेखी व प्रात्याक्षिक परिक्षा घेण्यात यावी, असे ठरले.**

. (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन शाखा)

---

**विषय नं.७१** **श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सेवामुक्त सहाय्यक संपादक, श्री साईलिला, मुंबई कार्यालय (झालेली सेवा-१० वर्षे, वय-४९ वर्षे) यांना पुन्हा तात्पुरते कामावर हजर/रुजू करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.सुनिल दत्तात्रय राणे, बी.ए. (मराठी), पत्रकारितेचा डिप्लोमा पूर्ण हे जा.नं.एसएसएस/वशी-०१/१०५८८/२००१ दि.०५-१०-२००१ रोजीचे आदेशास अनुसरून संस्थानचे मुंबई कार्यालय येथे सहाय्यक संपादक, श्री साईलिला या पदावर दि.०१-१०-२००१ पासून संस्थान सेवेत कार्यरत होते. श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला, मुंबई कार्यालय यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांना नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतका नोटीस-पे देवून सेवामुक्त करण्यात यावे. अशाप्रकारचा कोणताही प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ व दि.२८-०८-२०११ रोजीचे सभेमध्ये प्रशासनातर्फे सादर करणेत आलेला नव्हता. तथापि, प्रशासनाचा प्रस्ताव नसतांना मा. व्यवस्थापन समितीचे दि.२४-०७-२०११ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा निर्णय क्र.५९५ (०४) व दि.२८-०८-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५९६ अन्वये " मुंबई येथील श्री साईलिला संपादकीय कार्यालय शिर्डी येथे हलविणेत येऊन, या कार्यालयाची संपादकीय जबाबदारी श्री.मोहन जगन्नाथ यादव, जनसंपर्क अधिकारी यांचेवर सोपविणेत यावी. सध्या श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक, श्री साईलिला यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने, त्यांना नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतना इतका नोटीस पे देऊन सेवा मुक्त करण्यात यावे. तसेच श्री साईलिला अंक द्वैमासिक काढण्याऐवजी प्रत्येक महिन्यास काढण्यात यावा. प्रत्येक अंक प्रकाशित करण्यापूर्वी सदरचा अंक मा.विश्वस्त सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.वि.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांना प्रथम दाखविण्यात यावा." असा निर्णय पारीत करणेत आला होता. त्यानुसार श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांना एक महिना मुदतीचे नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतनाइतकी रक्कम नोटीस-पे म्हणून देऊन, जा.नं.एसएसएस/वशी-७ए/३५७२/२०११ दि.०७-११-२०११ रोजीचे आदेशान्वये दि.०९-११-२०११ पासून संस्थान सेवेतून सेवामुक्त (टर्मिनेट) करणेत आले आहे.

सदर सेवामुक्त (टर्मिनेशन) आदेशासंदर्भात श्री.राणे यांनी मा.कामगार न्यायालय (तिसरे), मुंबई येथे १) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी, २) श्री.किशोर रामराव मोरे सो. (कार्यकारी अधिकारी), श्री.जयंत मुरलीधर ससाणे सो., तत्कालीन अध्यक्ष यांचे विरूध्द दि.१३-१२-२०११ रोजी तक्रार (यु.एल.पी) क्र.२०८/२०११ ही कोर्ट केस दाखल केलेली आहे. सदर कोर्ट केसमध्ये श्री.राणे यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.

**a)** That the Hon'ble Court be pleased to hold and declare that the Respondents have engaged in unfair labour practices under Items 1( a ), ( b ), ( d ), ( f ), ( g ) of Schedule IV to the MRTU & PULP Act on and from 9.11.2011,

**b)** That the Respondents be directed to cease and desist from engaging in unfair labour practices complained of hereinabove,

**c)** That the Respondents be directed to reinstate the Complainant with full back wages and continuity of service w.e.f.9.11.2011 and with all incidental benefits,

**d)** Pending hearing and final disposal of main Complaint the Respondents be directed to continue to employ the Complainant or alternatively to pay him full wages every month,

**e)** To Respondents be restrained from recruiting new employee in the Post held by the Complainant on the date of his illegal, improper and unjustified termination.

**f)** To grant Ad-Interim & Interim Relief's in terms of prayer clauses (a) to (b) above,

**g)** To grant any other relief/s which this Hon'ble Court may deem fit and proper.

**h)** To grant costs.

उपरोक्तप्रमाणे श्री.राणे यांनी संस्थान विरूध्द दि.०७-११-२०११ रोजीचा सेवामुक्ती (टर्मिनेशन) आदेश बेकायदेशीर ठरवून रद्द होऊन मिळावा, मागील सेवा सलग धरून, बॅक वेजेससह पुर्ववत कामावर रूजू करून घेणेत यावे. याकरीता दाखल केलेल्या तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ कोर्ट केसमधील निशाणी यु-२ चे अर्जा संदर्भात मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी दि.२१-०८-२०१२ रोजी खालीलप्रमाणे अंतरिम आदेश दिलेला आहे.

<u>ORDER</u>

1. Application is partly allowed.
2. The Respondents are hereby directed to allow the complainant temporarily to work on his previous post till pending and final disposal of the main complaint.
3. If the Respondents are not willing to allow him to resume duties temporarily, in that event, his 50% salary be paid to him till pending and final disposal of the main complaint from the date of his termination.

Mumbai :

Dated :21.08.2012

(G.G.Hulsure)
Presiding Officer,
Third Labour Court, Mumbai

उपरोक्तप्रमाणे मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ मधील निशाणी यु-२ संदर्भात दि.२१-०८-२०१२ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशा संदर्भात संस्थान ॲडव्होकेट श्री.सचिन एस.शानभाग, मुंबई यांचेशी दि.२८-०८-२०१२ रोजी दुरध्वनीवरून चर्चा केली आहे. चर्चेअंती ॲडव्होकेट श्री.सचिन एस.शानभाग यांनी मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांचे दि.२१-०८-२०१२ रोजीचे अंतरिम आदेशास अनुसरून श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना पुर्वीप्रमाणेच सहाय्यक संपादक, श्री साईलिला या पदावर मुंबई किंवा शिरडी कार्यालय येथे सेवामुक्त करणेपूर्वी जे मासिक वेतन/पगार, अनुज्ञेय भत्ते व वेतन बॅन्ड देय्य होते. त्याच मासिक वेतन/पगारावर नियमित वार्षिक वेतनवाढीसह वेतन/पगार अधिक अनुज्ञेय भत्ते/वेतन बॅन्ड,ग्रेड-पे इत्यादीसह तात्पुरते स्वरूपात कामावर(सेवेत) हजर(रूजू) करून घेणेत यावे.

किंवा मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी दि.२१-०८-२०१२ रोजी दिलेल्या अंतरीम आदेशास स्थगिती मिळावी, सदरचा अंतरिम आदेश बेकायदेशीर ठरवून, रद्द होऊन मिळावा या कामी श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांचे विरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे संस्थानचे वतीने दि.२०-०९-२०१२ अखेर रिव्हीजन अर्ज दाखल करणेत यावा. अशा सुचना चर्चेअंती दिल्या आहेत.

याप्रमाणे कार्यवाही न केल्यास मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांचे दि.२१-०८-२०१२ रोजीचे अंतरिम आदेशास अनुसरून श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना जर तात्पुरते स्वरूपात कामावर हजर करून घेतले नाही तर त्यांना त्यांचे सेवामुक्तीचे (टर्मिनेशनचे) तारखेपासून म्हणजे दि.०९-११-२०११ पासून ते सदर कोर्ट केसबाबत अंतिम आदेश/निर्णय होईपर्यंत दरमहा ५०% मासिक पगार/वेतन अनुज्ञेय भत्त्यासह आदा करावे लागेल असे मत आहे.

**सबब, अ)** श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांचे तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ मधील निशाणी यु-२ संदर्भातील दि.२१-०८-२०१२ रोजीचे अंतरिम आदेशास अनुसरून सहाय्यक संपादक, श्री साईलिला या पदावर मुंबई कार्यालय येथे तात्पुरते स्वरूपात (मा.तिसरे कामगार न्यायालयाचा अंतिम आदेश होईपर्यंत) कामावर(सेवेत) हजर (रूजू) करून घेणेस, तसेच त्यांना सेवामुक्त (टर्मिनेशन) करणेपूर्वी जे मासिक पगार/वेतन आदा करण्यात येत होते. त्याचप्रमाणेच वेतन, अनुज्ञेय भत्ते, वेतन बॅन्ड, ग्रेड-पे, इत्यादी वार्षिक वेतनवाढीसह मासिक पगार/वेतन आदा करणेस मान्यता असावी.

**ब) किंवा** मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांनी तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ मधील निशाणी यु-२ संदर्भातील दि.२१-०८-२०१२ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशास स्थगिती मिळावी, तसेच सदर अंतरिम आदेश बेकायदेशीर ठरवून रद्द होऊन मिळावा याकरीता संस्थानचे

वतीने श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांचे विरूध्द मा.औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे दि.२०-०९-२०१२ अखेर रिव्हीजन ॲप्लीकेशन ॲडव्होकेट श्री.सचिन एस.शानभाग, मुंबई यांचेमार्फत दाखल करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.७९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.सुनिल दत्तात्रय राणे यांना मा.तिसरे कामगार न्यायालय, मुंबई यांचे तक्रार (यु.एल.पी.) क्र.२०८/२०११ मधील निशाणी यु-२ संदर्भातील दि.२१-०८-२०१२ रोजीचे अंतरिम आदेशास अनुसरून सहाय्यक संपादक, श्री साईलिला या पदावर मुंबई कार्यालय येथे तात्पुरते स्वरूपात (मा.तिसरे कामगार न्यायालयाचा अंतिम आदेश होईपर्यंत) कामावर (सेवेत) हजर (रूजू) करून घेणेस, तसेच त्यांना सेवामुक्त (टर्मिनेशन) करणेपूर्वी जे मासिक पगार/वेतन आदा करण्यात येत होते. त्याचप्रमाणेच वेतन, अनुज्ञेय भत्ते, वेतन बॅन्ड, ग्रेड-पे, इत्यादी वार्षिक वेतनवाढीसह मासिक पगार/वेतन आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **गुंतवणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** माहे **ऑक्टोबर, २०१२** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | आंध्र बँक, शिर्डी ( NPAY ) | १/१०/२०१२ | ३२,२५,४२२/- |
| ०२ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १/१०/२०१२ | १,६५,३२,९७७/- |
| ०३ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी | १/१०/२०१२ | ६,०६,२०,९१४/- |
| ०४ | आंध्र बँक, शिर्डी | ४/१०/२०१२ | ५,८८,४१,०४५/- |
| ०५ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी ( SSNY) | ५/१०/२००९ | १,५९,६६,०६७/- |
| ०६ | आंध्र बँक, शिर्डी ( NPAY ) | १०/१०/२०१२ | २०,००,५९६/- |
| ०७ | सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी ( SBF ) | ११/१०/२०१२ | ४,३३,५६४/- |
| ०८ | बँक ऑफ बरोडा, नासिक | १५/१०/२०१२ | १२,११,२३,५४४/- |
| ०९ | बँक ऑफ बरोडा, नासिक | १५/१०/२०१२ | १३,२०,९६,०८२/- |
| १० | दैनंदिन खर्च वजा जाता माहे ऑक्टोबर २०१२ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००/- |
| | | **एकूण रक्कम -** | **५१,०८,४०,२११/-** |

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. ५१.०८ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

तथापि अ.नं. १ व ६ आंध्र बँक, शिर्डी यांचेकडील नित्यप्रसादालय अन्नदान योजनेतील रक्कम व अ.नं.७ सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी यांचेकडील स्टाफ बेनेफीट फंडातील रक्कम ही सदर योजनेतील तरतुदीनुसार त्यांचेकडेच गुंतवावी लागणार आहे. त्यामुळे सदरची रक्कम वजा जाता उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
८) युको बँक, शिर्डी
९) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
११) विजया बँक, शिर्डी
१२) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १२ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम **रु.**

**५१.०८ कोटीची** टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीच्या सभेत निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.७९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन,दैनंदिन व इतर आवश्यक खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम रु. ५१.०८ कोटी वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते १२ बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, तसेच आंध्रा बँक, (NAPY) व सेंट्रल बँक (SBF) यांच्या मुदतपूर्तीनंतरच्या रक्कमा प्रचलित पध्दतीने त्यांच्याकडेच गुंतविण्यात याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **गावरान तुप खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** दि.३०.०५.२०१२ चे मा. त्रीसदस्य समिती सभेत झालेल्या चर्चा-वाटाघाटीमध्ये मे बाफना बजार, नासिक यांचे महारतन बॅण्डचे गावरान तूप न्यूनतम दर रु.२०,७००/- + ५ % व्हॅट असे एकूण रु.२१,७३५/- प्रति क्विंटल या दराने मान्य करण्यांत येऊन त्यांना जा.नं.एसएसएस/वशी/खरेदी-प्रसाद/१४२७/१२, दि.०३.०७.२०१२ अन्वये दि.०१.०७.१२ ते ३१.१०.१२ अखेर २४३० क्विंटल गावरान तूप पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यांत आला आहे. त्यानुसार मे.बाफना बजार, नासिक यांनी दि.२४.०८.२०१२ अखेर १२०४.५० क्विंटल गावरान तूपाचा पुरवठा केला असून १२२५.५० क्विंटल गावरान तुपाचा पुरवठा करणे बाकी आहे.

मात्र सदर तुपापासून बनविण्यांत येणारे लाडू व सत्यनारायण पुजेसाठी बनविवण्यांत येणा-या शिरा प्रसादाची चव कडवट लागत असलेबाबत स्थानिक नागरिक व साईभक्तांच्या तकारी आल्याने व त्याबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्दी आल्याने दि.२५.०८.२०१२ रोजी मा.त्रीसदस्य समितीने प्रसादालयात प्रत्यक्ष पाहाणी करुन लाडू प्रसाद बनविणेचे प्रकियेबाबत माहिती घेऊन स्वतः लाडूची चव घेतली. त्यामध्ये कडवटपणा आढळल्याने त्यांनी महारतन बॅण्डचे गावरान तूपाचा पुरवठा त्वरीत बंद करुन दुस-या कंपनीचे गावरान तूप खरेदी करणेबाबत निर्णय घेतला. याबाबत प्रसारमाध्यमांशी बोलतांना महारतन बॅण्डचे गावरान तूपाचा पुरवठा त्वरीत बंद करुन दुस-या कंपनीचे तूप खरेदी करण्यांत येईल असे सांगण्यांत आले.

वरील निर्णया नुसार दि.२५.०८.२०१२ रोजी रात्रौ ८.१५ वा.चे दरम्यान मे बाफना बजार, नासिक यांना दूरध्वनीवरुन महारतन बॅण्डचे गावरान तूपाचा पुरवठा बंद करणेबाबत कळविण्यांत आले.

त्यानंतर तातडीचे पर्यायी व्यवस्थेबाबत यापुर्वी पुरवठा केलेल्या तुपाचे ब्रॅण्डबाबत खालील पुरवठाधारकांशी चर्चा केली. (१) प्रभात डेअरी प्रा.लि.टिळकनगर, प्रभात ब्रॅण्ड (२) मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस. गोखळी सोनाई ब्रॅण्ड (३) मे बाफना बजार, नासिक यांचे हटसन ब्रॅण्डचे तूपाचे उपलब्धतेबाबत दूरध्वनीवरुन विचारणा करण्यांत येऊन दराबाबत माहिती घेण्यांत आली त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं | पुरवठाधारकाचे नांव | तुपाचा ब्रॅण्ड | दर प्रति कि लो | उपलब्धतेबाबतचा तपशील. |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे.प्रभात डेअरी प्रा.लि.टिळकनगर, | प्रभात | - | मालाचा तुटवडा असल्याने किमान ०१ महिना पुरवठा करु शकत नाही. |
| ०२ | मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी | सोनाई | रु.२३७ + ५ % व्हॅट | पुरवठा तातडीने करु शकतो. |
| ०३ | मे बाफना बजार, नासिक | हटसन | रु.२३७ + ५ % व्हॅट | पुरवठा करणेस सात दिवस लागतील. |

वरील दराबाबत व पुरवठयाबाबत झालेल्या चर्चेबाबतची माहिती त्रीसमिती सदस्य तथा मा. जिल्हाधिकारी याना दूरध्वनीवरुन देण्यांत आली व मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस. गोखळी यांचे सोनाई ब्रॅण्डचे गावरान तुप रु.२३,७००/- + ५ % व्हॅट रु.११८५/- असे एकूण रक्कम रु.२४,८८५/-. (रु.चोवीस हजार आठशे पंच्याऐंशी) मात्र प्रति क्विंटल या दराने त्वरीत उपलब्ध करुन देणार असल्याने त्यांचेकडून गावरान तुपाबाबत निर्णय होईपर्यंत खरेदी करण्यांत यावे असे ठरले.

त्यानुसार मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांना इकडील जा.क्र. २४५९/२०१२ दि.०३.०९.२०१२ अन्वये सोनाई ब्रॅण्डचे गावरान तुप रु.२३,७००/- + ५ % व्हॅट रु.११८५/- असे एकूण रक्कम रु.२४,८८५/-. (रु.चोवीस हजार आठशे पंच्याऐंशी) मात्र प्रति क्विंटल या दराने ६०० क्विंटल गावरान तुप पुरविणेबाबत पुरवठा आदेश देणेत आलेला आहे. पुरवठा आदेशानुसार आज अखेर त्यांचेकडून ४५० क्विंटल गावरान तुपाचा पुरवठा झालेला असून, त्यांचेकडून फक्त १५० क्विंटल गावरान तुपाचा पुरवठा होणे बाकी आहे. त्यांचेकडून पुरवठा झालेले तीन गाड्यांपैकी २ गाडयांचे तुप तपासणीसाठी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक येथे पाठविण्यात आलेले आहे.

सध्या माहे ऑक्टो-१२ ते मार्च-१३ अखेर प्रसादालय किराणा माल खरेदीची प्रक्रिया चालु असून, सदर खरेदीबाबतचा विषय मंजुरीकरिता विधी विभागामार्फत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करण्यात आलेला आहे. मा.न्यायालयाचे मंजुरीनंतर निविदा विक्री करुन, सॅम्पल निवडून, चर्चा वाटाघाटी करुन पुढील खरेदीबाबत निर्णय होईल. यासर्व कार्यवाहीकरिता साधरणतः १ महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे.

प्रसादालय विभागाने त्यांचेकडील दि.१४.०९.२०१२ रोजीचे डी.पी.अन्वये मागील पाच महिन्याच्या सरासरीनुसार दररोज अंदाजे २४७० किलो (२४.७० क्विंटल) गावरान तुपाची आवश्यकता असल्याबाबत कळविले आहे. म्हणजे दररोज साधरणतः २५ क्विंटल या प्रमाणे ३० दिवसांकरिता (०१ महिन्यासाठी) अंदाजे ७५० क्विंटल गावरान तुपाची खरेदी करणे गरजेचे आहे.

करिता गावरान तुपाअभावी साईभक्तांना लाडू प्रसाद देण्यास अडचण येऊ नये याकरिता मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचेकडून सोनाई ब्रॅण्डचे गावरान तुप मागील मंजुर दर रु.२३,७००/- + ५ % = रु.२४,८८५/-. (रु.चोवीस हजार आठशे पंच्याऐंशी) मात्र प्रति क्विंटल या प्रमाणे दररोज साधरणतः २५ क्विंटल याप्रमाणे ३० दिवसांकरिता (०१ महिना) एकुण ७५० क्विंटल तुप खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.१,८६,६३,७५०/- (अक्षरी रुपये एक कोटी शहाऐंशी लाख त्रेसष्ठ हजार सातशे पन्नास) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, गावरान तुपाअभावी साईभक्तांना लाडू प्रसाद देण्यास अडचण येऊ नये याकरिता मे.इंदापूर डेअरी ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, गोखळी यांचेकडून सोनाई ब्रॅण्डचे गावरान तुप मागील मंजुर दर रु.२३,७००/- + ५ % व्हॅट = रु.२४,८८५/-मात्र प्रति क्विंटल या प्रमाणे दररोज साधरणतः २५ क्विंटल याप्रमाणे ३० दिवसांकरिता (०१ महिना) एकुण ७५० क्विंटल तुप खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.१,८६,६३,७५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **साईआश्रम नं. १ व २ अंतर्गत असलेल्या इमारतींसाठी टी.व्ही खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** दि. ०६/०४/२०१२ रोजी झालेल्या व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय क्र.३३८ अन्वये साई आश्रम नं. १ व २ करिता सोनी कंपनीचे LED TV मॉ.नं. KDL ४६ EX ५२० वॉल मॉ. ब्रॅकेटसह २० नग अंदाजे ९५,०००/- रुपये दराने १९,००,०००/- रु.मात्र ( एकोणीस लाख ) खर्चास मान्यता मिळाली आहे.

परंतु सोनी कंपनीने वरील मॉ.नं. चे LED TV बंद करुन मॉ.नं. KDL ४६ EX ६५० या मॉडेलचे नविन EDGE LED TV काढले आहेत. दोन्ही मॉडेलच्या TV च्या किंमतीत काही फरक नाही, फक्त मॉ.नं. बदललेले आहेत.

तरी मॉडेल नं. KDL ४६ EX ५२० ऐवजी नविन मॉडेल नं. KDL ४६ EX ६५० या मॉडेलचे २० नग EDGE LED TV खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**निर्णय क्र.७९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख/अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव -२०१२ साजरा करणेस व त्यास येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव -** महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील.

त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात. सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री साईबाबांचा ९४ वा पुण्यतीथी उत्सव मंगळवार दि.२३/१०/२०१२ ते शुक्रवार दि.२६/१०/२०१२ असा चार दिवस साजरा करण्यात येणार आहे.

| अ.नं. | तपशील | उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे |
|---|---|---|
| १ | उत्सव निमंत्रण पत्रिका व प्रसाद | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या |

| | | |
|---|---|---|
| | | तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद पाठवावा लागतो.<br>यंदाचे श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १ लाख ६५ हजार निमंत्रण पत्रिका तसेच सन्माननीय पाहुण्यांसाठी १२०० पाकीटांसह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमीप्रमाणे प्रेस नोट ( न्यूज ॲटम ) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| २ | उत्सव व्यवस्था | अ) कलाकार कार्यक्रम |
| | मंगळवार दि.२३/१०/२०१२<br>( प्रारंभ दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. १०.३० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर |
| | बुधवार<br>दि.२४/१०/२०१२<br>( मुख्य दिवस) | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर.)<br>२) रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० पर्यंत कलाकारांची सेवा हजेरी कार्यक्रम.<br>या मुख्य दिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | गुरुवार<br>दि.२५/१०/२०१२<br>( तृतीय दिवस) | सायंकाळी ०७.३० ते ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर) |
| | शुक्रवार<br>दि.२६/१०/२०१२<br>(सांगता दिवस) | सायंकाळी ०७.३० ते ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर)<br>उत्सवांचे चारही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत. इच्छूक कलाकारांची पत्रे व तक्ता नंतर सादर केला जाईल. |

या उत्सवासाठी पुढील प्रमाणे तयारी करावी लागणार आहे.

| अ.नं. | तपशील | उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे |
|---|---|---|
| | | **ब) कीर्तन कार्यक्रम** |
| | मंगळवार दि.२३/१०/२०१२ ते शुक्रवार दि.२६/१०/२०१२ या कालावधीत नेहमीच्या वेळेप्रमाणे किर्तन कार्यक्रम होतील. | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवासाठी चार दिवस कीर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. किर्तनकार निश्चीती करावयाची आहे. |
| | | **क) विविध पुजा व आराधना विधी** |
| | मंगळवार दि.२३/१०/२०१२ ते शुक्रवार दि.२६/१०/२०१२ | भिक्षा झोळी मिरवणूक, त्यात सदस्यांचा सहभाग, पालखी व रथ मिरवणूक, आराधना विधी, विणा, व पोथी त्यातील सदस्यांचा सहभाग, सिमोल्लंघन, इ. कार्यक्रम नेहमीचे प्रथे प्रमाणे करण्यात येतील. |
| ३ | श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण ) पूजा व अभिषेक पूजा | उत्सवकाळात मंगळवार दि.२३/१०/२०१२ ते शुक्रवार दि.२६/१०/२०१२ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा बंद राहतील. |
| ४ | | उत्सव काळात दिनांक २३/१०/२०१२ रोजी सकाळी ०५.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल.<br>दिनांक २४/१०/२०१२ रोजी सकाळी ०५.०० वाजता पारायण समाप्ती होईल. मा.त्रिसस्य समितीचे ३ सदस्य पहिले तीन अध्याय वाचतील व राहिलेले ५० अध्याय प्रत्येकी एक असे ५० साईभक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक २२/१०/२०१२ रोजी अनाऊंसमेंट सेंटर मधील मंदिर कर्मचा-याकडे नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.<br>या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता त्रिसदस्य समितीचे सदस्य राहातील. तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन २०१२ मध्ये पोथी, विणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा घेतलेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सदस्याचे नावाचा तक्ताही सोबत जोडलेला आहे. |
| ५ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी दिनांक २३/१०/२०१२ रोजी श्रींचे पालखीची गांवातून रात्रौ ९.१५ वाजता मिरवणूक होईल, दिनांक २४/१०/२०१२ रोजी रात्रौ ०९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| ६ | विद्युत रोषणाई | समाधी मंदिर, द्वारकामाई , चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री पुण्यतिथी उत्सवात व्दारकामाई मंडळ,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्ट्याची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ७ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व |

| | | |
|---|---|---|
| | | सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| ८ | प्रसाद - भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये १०/- या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.त्रिसदस्यीय समितीचे सदस्यांचे कुटुंबिय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्ती , निमंत्रीत कलाकर, पोलीस कर्मचारी, उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजनाची व्यवस्था स्वतंत्र केली जाईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅंटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच चारही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन दिले होते, त्यानुसार श्री पुण्यतीथी उत्सवात येणा-या पालखीधारकांना एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन द्यावयाचे आहे.<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सन २०१२ तिनही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ म्हणून बुंदी ठेवण्यात आली होती.<br>या उत्सवामध्ये चारही दिवसात मिष्टांन्न म्हणून बुंदी देता येईल. |
| ९ | गावजेवण | उत्सवाचे शेवटचे दिवशी नेहमीप्रमाणे गावजेवण देण्यात येईल. |
| १० | लिलाव | श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री चारही दिवस करण्यात येईल . |
| ११ | देणगी काऊंटर्स | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. |
| १२ | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी कामगार अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |
| १३ | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईप्रसाद नं. १ व नं. २, साईऊदयान , मंगलकार्यालय, द्वारावती , भक्तनिवासस्थान, इ. इमारतीमधून तसेच साईनगर, साईप्रसाद निवासस्थान व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ. व मंडपही टाकावयाचे आहेत. त्यास मान्यता असावी. आवश्यकतेनुसार व गरजेनुसार त्यात वाढ करावी लागेल. |
| १४ | रुग्णालय व्यवस्था | संस्थानमार्फत दोन ठिकाणी चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील.तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात येईल. |
| १५ | पालखी व्यवस्था | श्री पुण्यतीथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था मंगल कार्यालय, साईउद्यान, परिसरात करण्यात येते व पालखी सोबत येणा-या भक्तांची व्यवस्था मंगलकार्यालय, साईउद्यान, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, इ. इमारतीत तसेच साईनगर मैदानात, जुन्या प्रसादालयाचे, न.भ.निवासाचे मोकळ्या जागेत मंडप/ शामियाने इ.मध्ये करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. दोन-तीन वर्षापासून पालखीधारकांतील पदयात्रींना संस्थानमार्फत शिर्डी येथे आलेवर एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येत आहे. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येईल. |
| १६ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १७ | कार्यक्रमाची सांगता | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १८ | खर्चाचे अंदाज पत्रक | श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव -२०११ मध्ये अंदाजपत्रकीय रुपये ५२,००,०००/- (अक्षरी रु. बावन्न लाख मात्र) इतक्या रकमेस मंजूरी देण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रुपये ५७,८४,९७९/-(अक्षरी रु. सत्तावन्न लाख चौऱ्यांशी हजार नऊशे एकोनऐंशी ) इतका खर्च झाला होता.<br>श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव २०१२ करीता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ७३,४०,०००/- (अक्षरी रु.त्र्याहत्तर लाख चाळीस हजार मात्र ) मंजूरीसाठी सादर केलेले आहे.<br>अंदाजपत्रकाचा तपशिलवार माहिती तक्ता सोबत माहिती करीता जोडला आहे. |

तरी श्री साईबाबा पुण्यतीथी उत्सव -२०१२ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ७३,४०,०००/- (अक्षरी रु.त्र्याहत्तर लाख चाळीस हजार मात्र ) चे खर्चास मान्यता असावी. अवलोकनार्थ व निर्णयार्थ सविनय सादर,

**निर्णय क्र.७९६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१२ मंगळवार दि.२३/१०/२०१२ ते शुक्रवार दि.२६/१०/२०१२ असा चार दिवस साजरा करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७३,४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही - प्रशासन शाखा वशी-५)

---

वरील निर्णय क्र. ७२२ ते ७९६ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर रात्रौ ०८.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (किशोर मोरे) | (डॉ.संजीवकुमार) | (जयंत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी